४) कर प्रशासनात सुधरणा होईल. स्वनियंत्रणामुळे फायदा होईल. इनपुट टॅक्स क्रेडीटमुळे जी.एस.टी.त स्वनियंत्रणाचा चांगला उपयोग होईल. कराचे विवरण मागण्याचा आधिकार राहील.केंद्र व राज्य यांचे दोन पातळीवरचे निरीक्षण ही चिंतेची बाब असली तरी त्यामुळे करस्पर्धा निर्माण होइल राज्य व केंद्राच्या अधिकाऱ्यामध्ये स्पर्धा लागून कर वसूली योग्य होईल. एकीकडून करचुकवगिरी लक्षात आली नाही तर ती दुसरीकडे लक्षात येईल.

५) विविध करामुळे जे गोंधळ सामान्य नागरीकांना सहन करावे लागत होते ते दुर होतील. जी.एस.टी.मध्ये केंद्र, राज्य व एकात्म जी.एस.टी. असे कर आहेत. त्यामुळे आंतराज्य व्यवहार सुरळीत होतील. जी.एस.टी. कर सुधारणांमुळे वस्तुंचा पुरवठा सेवा हस्तांतर, विक्र, विनिमय व भाड्याने देणे सोपे होईल. यात सी.जी.एस.टी. व एस.जी.एस.टी.चा समावेश राहील.

अ) केंद्र व राज्यांचा कर एकत्र केल्याने दुहेरी कर टळेल, सामाईक बाजारपेठ तयार होईल. ग्राहकांना कमी किंमतीत वस्तू मिळेल. सध्या जे २५ ते ३० टक्के आहे.

ब) वस्तूच्या किंमती कमी होतील व त्यात उत्पादक व व्यापारी यांना उत्पादन खर्च धरावा लागणार नाही.

क) प्रक्रीयात्मक खर्च कमी होईल व त्याचे पालन चांगले होईल. सी.जी.एस.टी. व एस.जी.एस.टी. तसेच आय.जी.एस.टी. यांची वेगळी नोंद ठेवावी लागणार नाही.

ड) परदेशी गुंतवणुकदारांना जी.एस.टी.मुळे चांगला संदेश जाईल व त्यांना उद्योग करणे सोपे जाईल.

ई) जी.एस.टी.मुळे उत्पादकांचे कराचे ओझे कमी होईल व उत्पादन वाढेल. दुहेरी कर उत्पादकांना लागणार नाही त्यांना कर्ज मिळणे सोपे होईल.

फ) एकाच करामुळै उत्पादकांना अंतीम विक्री किंमत कमी करता येईल तसेच सामान्य माणसाचे ओझे कमी होईल पारदर्शता येवून ग्राहकांना नेमका दर कळेल.

ग) जी.एस.टी.मुळे निर्यातीवरील सीमा शुल्क जाईल व परदेशी बाजारपेठेत स्पर्धात्मकता येऊन कमी पैशात व्यवहार होतील.

## जी.एस.टी.चे प्रमुख क्षेत्रावर होणारे परिणाम

**१) स्थावर मालमत्ता :** या क्षेत्रात अनेक परिणाम होतील त्यात बांधकाम क्षेत्र रोजगार निर्मितीत दुसऱ्या क्रमांकावर २०१५-१६ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार ७.४% देशा अंतर्गत उत्पन्न स्थावर मालमत्ता क्षेत्रातुन येते. फ्लॅट किंवा दुकान खरेदीवर १२% जी.एस.टी. भरावा लागेल. अगोदर हा कर ६% होता. त्यामुळे हे व्यवहार ठप्प होतील व याचा परिणाम सरकारचे उत्पन्न कमी होईल.

**२) आरोग्य :** औषध उत्पान क्षेत्रावर चांगला परिणाम होईल सद्या या क्षेत्रात आठ कर आहेत ते सर्व जावून एकच कर असेल. जी.एस.टी.मुळे पुरवठा सुधारुन औषध क्षेत्र दोन टक्क्यांनी वाढेल याचाच परिणाम म्हणून ग्राहकांना फायदा मिळेल. औषधांवर १२% काही औषधांवर ५% तर शस्त्रक्रीयेचे अवजारे, फर्निचर ई. १८% कर राहील. तरीपण एकाच करामुळे आरोग्य क्षेत्र सामान्य माणसांना निश्चितच फायदेशीर राहील.

**३) बँकींग व आर्थिक सेवा :** भारतात बँकिंग व आर्थिक सेवा यात सेवा कर जास्त आहे. सध्या ते १४.५% आहे. या कराला आता १८% तर काही करांना १५% च्या स्लॅपमध्ये ठेवले आहे. तयामुळे या क्षेत्रात होणारी महागाई ही ग्राहकांना जाणवेल व त्यांचा सामान्य माणसावर परिणाम होईल.

**४) प्रवास पर्यटन व आदातिथ्य उद्योग :** भारतात प्रवास, पर्यटन व आदरतिथ्य उद्योगावर अनेक कर होते. केंद्र व राज्याचे वेगळे कर आता जी.एस.टी.त येतील. त्यामुळे हॉटेल व रेस्टॉरेंट यावर एकच कर येईल. ए.सी. हॉटेलात खाद्यापदार्थावर १८% कर लागेल, तर पंचतारांकीत हॉटेलात २८% कर लागेल. त्यामुळे प्रवास पर्यटन व आदरतिथ्य उद्योग महागेल व त्याचा परिणाम सामान्य नागरीक, परदेशी नागरीक व येथील श्रीमंत नागरीक यांच्यावर होईल व उद्योगक्षेत्र कमी उत्पादन देईल व सरकारचे सुध्दा यामध्ये नुकसान होईल फक्त करप्रणाली सुटसुटीत होईल इतकेच.

**५) शिक्षण क्षेत्र :** शिक्षण क्षेत्रात जी.एस.टी. येण्याअगोदर अनेक करसवलती होत्या. शाळा व महाविद्यालयाच्या सेवांवर कर नाहीत. आता सुध्दा



Principal
Bharatiya Mahavidyalaya
Morshi, Dist.Amravati (M.S.)

जी.एस.टी.त शिक्षण क्षेत्रावर विशेष परीणाम झालेला नाही. शैक्षणिक संस्थाव्दारा विद्यार्थ्यांना, शिक्षकांना आणि कर्मचाऱ्यांना दिलेल्या सेवा करमुक्त फक्त खाजगी शिकवणीमध्ये विद्यार्थ्यांनी १८% दिलेल्या सेवेवर शुल्क द्यावे लागेल. शैक्षणिक साहित्यावर २१% काहीवर १८% तर फारच थोडया साहित्यावर २८% कर भरावा लागेल. एकंदरीत शिक्षण क्षेत्रावर फार मोठा परिणाम होणार नाही.

**६) सामान्य नागरिकांवर परिणाम :** जी.एस.टी.मुळे एकात्मिक कररचना असेल व त्यामुळे देशाअंतर्गत उत्पन्न काही प्रमाणात वाढेल. काही सेवा महागडया होतील. एकूण संमिश्र परिणाम दिसेल. अगोदर वस्तूवर १२.५% अबकारी कर तसेच ५ ते १५% व्हॅट म्हणजे मूल्यवर्धित कर आहे. जो ग्राहकावर टाकल्या जातो. जी.एस.टी.मुळे हा कर ५% ते २८% पर्यंत आहे. काही वस्तूंच्या किंमती कमी होतील. ग्राहकांना जिवनावश्यक वस्तू ०% तर काही वस्तू ५% मिळेल. त्यामुळे सामान्य माणसासाठी परिणाम चांगला असेल. गरिब व मध्यम वर्गाच्या अधिकांश वस्तूवर जी.एस.टी.चा दर शुन्य आहे. श्रीमंत वर्गाच्या वापरावयाच्या वस्तूवर सरकारने भरमसाठ कर लागून देशाच्या उत्पन्नात वाढ केली. तसेच गरीब व मध्यम उत्पन्न असणाज्या लोकांना दिलासा दिला.

या देशात सर्वात मोठा असणारा वर्ग शेतकरी व शेतमजुर या यांच्याकडे सुध्दा सरकारने याच दृष्टीकोनातुन वस्तु व सेवाकराची आकारणी केली. वस्तू व सेवाकराची आकारणी करतांना सामान्य माणसाला दृष्टीसमोर ठेवून एक देश एक कर ही संकल्पना देशाला सारात्मक्तेकडे नेईल. सामान्य माणसाचाच नव्हे तर देशाला त्याचा फायदा होईल. जी.एस.टी. मधून भारतीय अर्थव्यवस्था वाढीस मदत मिळेल व एकात्मीक बाजारपेठ एकात्मीक करामुळे तयार होईल. अर्थव्यवस्था वाढली की, सामान्य माणसाची आर्थिक वाढ आपोआप होईल.

**सारांश**

१ जुलै २०१७ पासून केंद्र सरकारचे जी.एस.टी. लागू केला. त्यामुळे प्रत्येक राज्याचा वेगवेगळा अप्रत्यक्ष कर एकच जी.एस.टी. म्हणून लागू झाला. या करामुळे केंद्र सरकारच्या उत्पन्नात वाढ झाली. करचुकवेगिरी कमी झाली. काही क्षेत्रावर या कराचा जास्त भार पडला तर काही क्षेत्रावर कमी भार पडला. परंतू सामान्य माणसावर या कराचा बोझा कमी पडला. जिवनावश्यक वस्तुवर ०% कर झाला. तसेच ज्या वस्तूची सामान्य नागरीकांना गरज आहे. अशा वस्तुवर ५% कर लावला. त्यामुळे सामान्य माणसांना आपले जीवन व राहणीमानात वाढ करता आली तर श्रीमंत माणसांना कराची जास्त रक्कम भरावी लागली. त्यामुळे त्यांच्यावर खुप भार पडला असे म्हणता येणार नाही. शेतकरी व शेतमजुर यांना करामुळे फायदा झाला व त्यांना शेती उपयोगी अवजारे व खते स्वस्त मिळु लागली. त्यामुळे हा बहुसंख्येने असलेला वर्ग जी.एस.टी. या करामुळे चांगल्या स्थितीत आला. परंतु एकंदारीत विचार केल्यास देशाच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी व देशाचा कारभार चालविण्यासाठी सरकारला जी पैशाची गरज होती ती पुर्ण होण्यास मदत झाली. सामान्य माणूस तर देश सुखी तर देश सुखी हे जी.एस.टी.मुळे साध्य होत आहे.

**संदर्भग्रंथ**


| | | |
|---|---|---|
| १) | वस्तू व सेवा कर कायदा | - प्रा. प्रविण कामथे, प्रा. मेघना पाटील. |
| २) | करंट अपेअर्स | - १५ डिसेंबर २०१७ |
| ३) | योजना मासीक | - नोव्हेंबर २०१६ |
| ४) | चाणक्य मंडल परीवार | - जुलै २०१५ |
| ५) | व्यापारी मित्र | - सप्टेंबर २०१७ |
| ६) | दैनिक लोकमत | - १ जुलै २०१७ |
| ७) | दैनिक लोकमत | - १ जुलै २०१७ |




Principal
Bharatiya Mahavidyalaya
Morshi Dist Amravati(M.S.)

Sales Tax

Purchase Tax

VAT

Entry Tax

Excise duty

Service Tax

M.I.& G.E.Society's

# Dr. (Sow.) I.B.P. Mahila Mahavidyalaya, Aurangabad.

**Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad. (M.S.)**

One Day Interdisciplinary National Conference on

# SOCIO-ECONOMIC IMPACT OF GST

**07th October 2017**

Organized by

**ECONOMICS & COMMERCE DEPARTMENT**

## Faculty / Research Scholar

This is to certify that Mr./Mrs./Miss./Dr. विनायक विष्णुपंत खांडेकर of सहाय्यक प्राध्यापक (वाणिज्य), भारतीय महाविद्यालय, मोर्शी has presented a paper in One Day Interdisciplinary National Conference on Socio-Economic Impact of GST on 07th October 2017, Organized by Dr. (Sow.) I. B. P. Mahila Mahavidyalaya, Aurangabad. (M.S.)

He/She presented/submitted his/her Research paper entitled ''वस्तु व सेवा कराचा प्रमुख क्षेत्र व सामान्य नागरीकावर होणारा परिणाम'' and his/her Paper has been included in the conference proceedings bearing the AJANTA - ISSN-2277-5730 - IMPACT FACTOR - 4.205 (www.sjifactor.com)

| Dr. Vasudha V. Purohit | Dr. Sunanda B. Chakranarayan | Dr. Sunita A. Bajpai | Dr. Anuya A. Chandorkar |
|---|---|---|---|
| In-Charge Principal & H.O.D. Economics | Convener & H.O.D. Commerce | Co-Convener | Organising Secretary |

Principal
Bharatiya Mahavidyalaya
Morshi, Dist. Amravati (M.S.)

H-35

2017-18 (JJS

प्रा. डॉ. भगवान जे. सावळे

(35)

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता®

रविवार, दि.२५ फेब्रुवारी २०१८

भारतीय विद्यामंदिर, अमरावतीद्वारा संचलित

## भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि.अमरावती

(संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्न)

व

**आधार सोशल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमंट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, अमरावती**

यांच्या संयुकत विद्यमाने आयोजित

जी.एस.मेश्राम
भारतीय महाविद्यालय,मोर्शी
ता.मोर्शी,जि.अमरावती

प्रा.विराग गावंडे
संचालक
आधार सोशल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट
ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, अमरावती

प्रा.डॉ.भगवान जे.सावळे
मराठी विभाग प्रमुख,
भारतीय महाविद्यालय,
मार्शी, जि.अमरावती

## मराठी विभाग

भारतीय महाविद्यालय, मोर्शी,जि.अमरावती

आणि

आधार सोशल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इनिस्टट्यूट, अमरावती

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

प्रा. भगवान जे. साबळे

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.62759
Vidyawarta®
February 2018 Special Issue 01

(36)

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका
विद्यावार्ता™

भारतीय विद्यामंदिर, अमरावती द्वारा संचालित
भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि.अमरावती
(संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्न)
व आधार सोशल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, अमरावती
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

राष्ट्रीय चर्चासत्र

# "मराठी साहित्य : चर्चा आणि चिंतन"

रविवार, दि. २५ फेब्रुवारी २०१८

श्री. जी. एस. मेश्राम
प्राचार्य, भारतीय महाविद्यालय, मोर्शी ता. मोर्शी, जि.अमरावती

मुख्य संपादक
प्रा. विराग गावंडे
संचालक, आधार सोशल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, अमरावती

संपादक
प्रा. डॉ. भगवान जे. साबळे
मराठी विभाग प्रमुख, भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि.अमरावती

आयोजक
मराठी विभाग
भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि.अमरावती
व
आधार सोशल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, अमरावती

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Principal
Bharatiya Mahavidyalaya
Morshi

तळाशी जाण्याचा प्रयत्न पण घडणीच्या प्रक्रियेत पात्राचे जगणे वास्तव पातळीवरचे असले तरी व्यापकतेचे, विराटतेचे आणि सखोलतेचे परिणाम त्याला लाभत नाही.

निष्कर्ष :-

१) नामदेव कांबळेच्या 'राघववेळ' कादंबरीला साहित्य अकादमीचा पारितोषिक मिळाले आहे.

२) 'उनसावली' या कादंबरीत 'मातंग' समाजातील समस्याचे वर्णन आहे.

३) 'उनसावली' या कादंबरीत रघू जाधवची महत्वाची भूमिका आहे.

४) रघू जाधव हा डॉ. आंबेडकरांच्या विचाराणे प्रभावित झालेला तरूण आहे.

५) नामदेव कांबळेची शैली वाचकांना मोहीत करणारी आहे.

संदर्भग्रंथ :-

१) राघववेळ-नामदेव कांबळे
२) उनसावली-नामदेव कांबळे
३) मोराचे पाय-नामदेव कांबळे
४) सांजरंग-नामदेव कांबळे
५) सेलझाडा-नामदेव कांबळे
६) दलित कादंबरी स्वरुप व समीक्षा-डॉ. इंगळे

❑❑❑

36

# मथुरा लभाण बोलीतील होळीगीते : एक आकलन

**प्रा. डॉ. भगवान जे. साबळे**
मराठी विभाग प्रमुख, भारतीय महाविद्यालय, मोर्शी

**********

प्रास्ताविक :-

'मराठी साहित्य : चर्चा व चिंतन' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या निमित्ताने 'मथुरा लभाण बोलीतील होळीगीते : एक आकलन' या विषयावरील शोधनिबंध सादर करताना मनस्वी आनंद होत आहे. मराठी साहित्यातील लोकसाहित्य हा एक समृद्ध वाङ्मय प्रवाह त्याचाच एक भाग म्हणून मथुरा लभाण बोलीतील लोकगीते होय. मथुरा लभाण गणाच्या 'होळी' या सण-उत्सवाप्रसंगी पुरूषांकडून गायिल्या जाणाऱ्या गीतांमधून मथुरा लभाण लोकजीवन व लोकसंस्कृतीचे दर्शन घडवावे व मथुरा लभाण संस्कृतीचे वेगळेपण अधोरेखित करण्याच्या हेतूने सदर शोधनिबंधाचे लेखन करण्यात आले आहे.

भारतीय परंपरेत सण, उत्सव साजरे करण्याची प्रथा प्राचीन आहे. मथुरा लभाण गणातही सण, उत्सव मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरे करण्यात येतात. 'सण आणि उत्सव हा मानवी संस्कृतीचा अविभाज्य असा भाग आहे. दैनंदिन जीवनातील कंटाळवाण्या घटना-प्रसंगातून, नित्याच्या जीवनातील तोचतोपणा यातून थोडीशी सुटका करून घेण्यासाठी आणि धर्माचरण पाळण्याचे समाधान मिळविण्यासाठी माणसांनी सण, उत्सवांचा आश्रय घेणे स्वाभाविक आहे. सण, उत्सव साजरे केल्याने देवादिकांना, पितरांना, निसर्गातील अद्भुत शक्तींना प्रसन्न करून त्यांची कृपा संपादन करता येते'.१ याशिवाय देवदेवतांच्या स्मरणाबरोबरच आपल्या संस्कृतीचे स्मरण करून तिचे चिंतन करण्याची प्रेरणा मिळावी हेही एक महत्त्वाचे कारण आहे. म्हणून तर लोकजीवनात सण, उत्सवांना महत्त्वाचे स्थान आहे.

मथुरा लभाण गण प्रत्येक सण उत्सवाप्रमाणे साजरा करतो. याप्रसंगी त्यांच्या आनंदाला सीमा नसते. हा आनंद व उत्साह लोकगीताच्या माध्यमातून उत्स्फूर्तपणे अभिव्यक्त होतो.

मथुरा लभाण गणाच्या सणाला आषाढी अमावस्येपासून प्रारंभ होतो. मथुरा लभाण बोलीत आषाढी अमावस्येला 'खिचडा



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

मावस' असे संबोधल्या जाते. अमावस्येपासून पाच दिवसांनी श्रावण शु. ५ ला 'नागपंचमी', श्रावण शु. ९ ला 'दोनी', श्रावण शु. पौर्णिमेला 'राखी' (रक्षाबंधन), रक्षाबंधनानंतर तीन दिवसांनी श्रावण कृ. ३ ला 'तिज', तिजनंतर दुसऱ्या दिवशी 'जोरो', चार दिवसांनी श्रावण कृ. ७ ला 'कन्हैय्या दुला' (श्रीकृष्ण जन्माष्टमी), पाच दिवसांनी 'आठें' (गोपाळकाला), नंतर 'पोळा', पोळ्यापासून चाळीस दिवसांनी 'दसराव' (दसरा) व पुढे विस दिवसांनी 'दावळी' (दिवाळी), दिवाळीपासून साडेचार महिन्यांनी 'होळी', होळीनंतर पंधरा दिवसांनी 'पाडमो' (गुढीपाडवा) आणि गुढीपाडव्यापासून साडेतीन महिन्यांनी पुन्हा आषाढी अमावस्या. असे मथुरा लभाण गणाकडून वर्षभरात साजरे करण्यात येणारे सण व उत्सव आहेत.

मथुरा लभाण गणाच्या वरील सण, उत्सवांपैकी 'होळी' या सण व उत्सवाप्रसंगी पुरूषांकडून गायिल्या जाणाऱ्या लोकगीतांचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केलेला आहे.

**मथुरा लभाण बोलीतील होळीगीते :-**

मथुरा लभाण गणाचा 'होळी' हा महत्त्वपूर्ण सण होय. हा सण उत्सवाप्रमाणे साजरा करण्यात येतो. आपल्या कामात सदैव मग्न असलेल्या मथुरा लभाण गणासाठी होळी हा उत्सव तसा पर्वणीच ठरतो. कारण रोजच्या कटकटीतून शिणलेल्या मनाला ताजेतवाने करण्याची ही नामी संधी. म्हणूनच होळी या सणाची चाहूल लागताच पंधरा दिवस आधीपासूनच संध्याकाळी नाईकाच्या अथवा कारभाऱ्याच्या घरी तांड्यातील स्त्री-पुरूष एकत्र येऊन बैठक गीते सादर करतात. तसेच उत्तररात्रीपर्यंत खेळनृत्यात मग्न होऊन गाणीही गायिल्या जातात.

पुरूषमंडळी फेर धरून खेळनृत्य सादर करतात. याप्रसंगी गायिल्या जाणारे 'डोया' एक लोकगीत पुढीलप्रमाणे-

"ये पाणी भरेरे रणझेण होय नेन्हा ऽऽ डोया ऽऽ
डोयाकी दांडी दस घुंगे ऽऽ री ।।धृ।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले नाच्योतो आबे डोया तां ऽऽ डलो
था ऽऽ री नगरीकी नाची आबे नेन्हा डोया ऽऽ
डोयाकी दांडी दस घुंगे ऽऽ री ।।१।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले कावे भेरीलो डोया तां ऽऽ डेलो
थारी कावो भेरीली हा ऽऽ र नेन्हा ऽऽ डोया ऽऽ
डोयाकी दांडी दस घुंगे ऽऽ री ।।२।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले गव्वा ऽऽ भेरीलो डोया तां ऽऽ डेलो
थारी चेणा भेरीली हा ऽऽ र नेन्हा ऽऽ डोया ऽऽ
डोयाकी दांडी दस घुंगे ऽऽ री ।।३।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले च्यारी भैय्या उका सारेखा
ये बेतो चाले होडा हो ऽऽ ड नेन्हा ऽऽ डोया ऽऽ
डोयाकी दांडी दस घुंगे ऽऽ री ।।४।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले रेंडी भेंगाऱ्या डोया सा ऽऽ रेखा
ये बेतो चा ऽऽ लेने न्हा ऽऽ टे मुड नेन्हा ऽऽ डोया ऽऽ
डोयाकी दांडी दस घुंगे ऽऽ री ।।५।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले बारा गोणीका डोया घरे भऱ्या ऽऽ
बोतो तेराकी सणे हा ऽऽ र न्हेना ऽऽ डोया
डोयाकी दांडी दस घुंगे ऽऽ री ।।६।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले नोई बोढ्याको डोया पिसेणो
थारा चुने चेन्हैय्या खा ऽऽ य नेन्हा ऽऽ डोया ऽऽ
डोयाकी दांडी दस घुंगे ऽऽ री ।।७।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले नोई बोठ्याको डोया रांधेणो
उको बटला घेरीये खा ऽऽ य नेन्हा डोया ऽऽ
डोयाकी दांडी दस घुंगे ऽऽ री ।।८।।"

शब्दार्थ : डोया = नगराळू, घुंगेरी = घुंगरू, तांडेलो = तांडा, होडा-होड = चढा-ओढ, नोई बोढ्या = नवीन सून, चून = ज्वारीचे पीठ, चेन्हैय्या = चिमणी, रांधेणो = स्वयंपाक, बटला = पातेलं इत्यादी.

**भावार्थ :** वरील लोकगीतामध्ये 'डोया' हा शब्द पुरूषाचं प्रतीक म्हणून आलेला आहे. या डोयाला दहा घुगरं बांधलेली आहेत. हा पुरूषरूपी डोया होळीचा सण साजरा करण्यासाठी उतावीळ झाला असून तो नाचत-नाचत तांड्यात येतो असा धृपदाचा अर्थ अभिप्रेत आहे. या गीतामधून प्रतिमा-प्रतीकाचा प्रत्यय येतो.

ज्या तांड्यात हा 'डोया' होळीचा सण साजरा करण्यासाठी आलेला आहे. त्या तांड्यामध्ये कोण-कोणत्या गोष्टी आहेत असा प्रश्न उपस्थित करून उत्तरा दाखल या तांड्यामध्ये गायी-गुरे आहेत, हरभऱ्याच्या गोणीने घर भरलेले आहेत. तसेच चौघे भाऊ सारखे असून ते चढा-ओढीने एकमेकांच्या पुढे चालण्याचा, प्रगती करण्याचा प्रयत्न करतात. हे चौघे भाऊ म्हणजे तांड्यातील लोकांचे प्रतीक म्हणून आलेले असून ही लोक सख्या भावांप्रमाणे गुण्यागोविंदाने राहतात व एकजुटीने कामही करतात. असा हा तांडा समृद्ध आहे हा आशय व्यक्त होतो. शिवाय या तांड्यामध्ये नुकतेच लग्न झालेली 'नवीन बोढ्या' म्हणजे सून दळण दळायला बसलेली असून तिने दळलेले ज्वारीचे पीठ चिमण्या खात आहे. शिवाय या पीठापासून बनविलेला स्वयंपाक घरातील सगळी मंडळी थट्टा-मस्करी करीत संपवून टाकतात व तिची फजिती करतात. असाही आशय पुढच्या कडव्यातून व्यक्त होतो.



Principal
Bhartiya Mahavidyala
Barshi

(40)

अशाप्रकारे होळीप्रसंगी गायिल्या जाणाऱ्या या लोकगीतांमधून होळी सणाची उत्सुकता, या निमित्ताने करण्यात येणारी थट्टा-मस्करी, तांड्यातील लोकांचे गुण्यागोविंदाने नांदणे, गायी-गुरे व धान्यांनी भरलेली घरे एकंदरीतच होळी या सणाचे महत्त्व व तांडा संस्कृतीचे प्रतिबिंब याचा प्रत्यय येतो.

होळी या सणाच्या निमित्ताने वर्षभरात तांड्यामध्ये ज्यांच्या घरी मुलगा जन्मला असेल अथवा तांड्यामधील एखाद्या कुटुंबाचा सदस्य मृत्यू पावला असल्यास अशांच्या घरी होळी या सणाच्या आधी संध्याकाळी स्त्री-पुरूषांकडून होळीनृत्य सादर करून गाणी गायिल्या जातात. मुलाच्या जन्माचा आनंद साजरा करणे अथवा मृत्यूमुळे होणाऱ्या दु:खाचा विसर पडावा हा हेतू होळीनृत्य व याप्रसंगी गायिल्या जाणाऱ्या लोकगीतांमागे दिसून येतो. हे या तांडा संस्कृतीचे महत्त्वपूर्ण वैशिष्टय आहे. याप्रसंगी पुरूषांकडून गायिल्या जाणाऱ्या गीतांपैकी 'नायक बुधा' हे एक होळी खेळनृत्य गीत पुढीलप्रमाणे,

"ये गेरू साहेबेराके टेक नायक बुधा ऽऽ
लिंगा मसन गेरू पिटे ऽऽ पे ।।धृ।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले दन दसेरावे महाराजेका ऽऽ
जहा सतकोही बा ऽऽ टे परेसाद नायक बुधा ऽऽ
लिंगा मसन गेरू पिटे ऽऽ पे
ये गेरू साहेबेराके टेक नायक बुधा ऽऽ
लिंगा मसन गेरू पिटे ऽऽ पे ।।१।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले ग्यारसकु काढ्या तडा तांगेडा ऽऽ
थारा बारसकु होयो मेल्हाण नायक बुधा ऽऽ
लिंगा मसन गेरू पिटे ऽऽपे ।।२।।
जांयो जांयो रे ला ऽऽ ले पणसेपती को नरसिंगो उतऱ्यो
थारी बाळद पे पडी लले ऽऽ कार नायक बुधा ऽऽ
लिंगा मसन गेरू पिटे ऽऽ पे ।।३।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले न्हाट्या गेवाळ्या बुधाके घर आया
बेतो आया तांडा ऽऽ के माय नायक बुधा ऽऽ
लिंगा मसन गेरू पिटे ऽऽ पे ।।४।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले नथ्थु बेठयोरे बुधा काव्हो करे
थारी बाळदपे पडी ललेकार नायक बुधा ऽऽ
लिंगा मसन गेरू पिटे ऽऽपे ।।५।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले सोळा पेटीको झगेल्यो पेऱ्हो
थारे माथे सुमेल पग नायक बुधा ऽऽ
लिंगा मसन गेरू पिटे ऽऽ पे ।।६।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले सगळा बेठया मत्तो करे
थारे हा ऽऽ ते झमुकडी तले ऽऽ वार नायक बुधा ऽऽ
लिंगा मसन गेरू पिटे ऽऽपे ।।७।।
जांयो जांयोरे ला ऽऽले हाते सोरे बुधा नखेळ्यो
जीके भैय्या भेतिजा सबे सा ऽऽ थ नायक बुधा ऽऽ
लिंगा मसन गेरू पिटे ऽऽ पे ।।८।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले लारे लाहार बुधायकेरे
थारो नरसिंगो लिजो बेता ऽऽ य नायक बुधा ऽऽ
लिंगा मसन गेरू पिटे ऽऽपे ।।९।।
जांयो-जांयोरे ला ऽऽ ले पेल्ही चो ऽऽ ट नरसंगकेरे
थारी बुधाने लियेणी धेर नायक बुधा ऽऽ
लिंगा मसन गेरू पिटे ऽऽपे ।।१०।।
जांयो-जांयोरे ला ऽऽ ल दुजी चो ऽऽ ट बुधाकीरे
थारो नरसिंगो लिणो मार नायक बुधा ऽऽ
लिंगा मसन गेरू पिटे ऽऽपे
ये गेरू साहेबेराके टेक नायक बुधा ऽऽ
लिंगा मसन गेरू पिटे ऽऽपे ।।११।।"

**शब्दार्थ :** गेरू पिटेपे = गुरूनानकाचा आशीर्वाद असणे, दसेराव = दसरा, तडा-तांगडा = घरगुती सामान, मेल्हाण = लदेणी, बाळद = गायीची झुंड, न्हाट्या गेवाळ्या = गडी माणसं पळत येणे, नखेळ्यो = निघाला, पेल्ही चोट = पहिला वार करणे, सोळा पेटी को झगल्यो व सुमेल पग = मोठा झग्गा व पगडी इत्यादी.

**भावार्थ :** बुधा हा तांड्याचा नाईक म्हणजे मुखिया आहे. या नाईक बुधाला गुरू गोविंदसिंगचा आशीर्वाद प्राप्त झालेला आहे. असा भावार्थ धृपदामध्ये अभिप्रेत आहे.

नाईक बुधाने दसरा सण साजरा केला आणि आपल्या फौज फाट्यासह पुढच्या प्रवासाला निघाला. सोबत तडा-तांगडा म्हणजे गृहपयोगी साहित्य घेऊन लदेणी केली. बुधा जिथे निवाऱ्यासाठी थांबला होता त्या माळरानावर त्याच्या गायी चरत असताना नरसिंगा नामक वनाधिकारी त्या गायींना हाकलून नेतो. बुधाला गडी माणसांकडून हा निरोप मिळतो. तो आपला पेहराव परिधान करतो आणि गुरू नानकाचे स्मरण करून लढाईसाठी निघतो. हातात तलवार व सोबत आप्तेष्टांना घेतो व तरवारीने दोन वार करून नरसिंगाला पराजितही करतो. तेथून आपल्या गायींना सोडवून परत आणतो हा भावार्थ या गीतामधून अभिव्यक्त होतो.

सदर गीतामधून तांड्यातील नाईकाचा पराक्रम, लदेणीचे वर्णन, गायी पाळण्याचा व्यवसाय, गायींच्या संरक्षणासाठी प्रसंगी वनाधिकाऱ्याशी लढाई करणे आदींचा प्रत्यय येतो. होळी या सणाप्रसंगी गायिल्या जाणाऱ्या या गीतांमुळे आपल्या पूर्वजांच्या इतिहासाला उजाळा मिळावा हा हेतू दिसून येतो.

'होळी' या सणाची उत्सूकता दिवसेंदिवस शिगेला पोहचते. प्रत्यक्ष होळीच्या दिवशी तर उत्साहाच, चैतन्याच वातावरण निर्माण



Principal
Bhartiya Mahavidyalay
Morshi

होते. संध्याकाळी होळी पूजनासाठी स्त्री-पुरूष एकत्र जमतात व सामूहिकपणे होळीचे दहन करतात. 'एक तांडा एक होळी' असे हे सामूहिक होळीपूजन तांडा संस्कृतीचे मूत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. होळी दहन करून पूजन केल्यानंतर तांड्यामधील स्त्री-पुरूष स्वतंत्रपणे फेर धरून नृत्य सादर करतात. याप्रसंगी पुरूषांकडून गायिल्या जाणारे 'होळी खेले नंगरको लोके कन्हैय्या' हे एक गीत पुढीलप्रमाणे,

"होळी खेले नंगरको लोके कन्हैय्या ऽऽ
कान्हा गुजर होळी खेले ऽऽ सी।।धृ।।
जांयो ऽऽ जांयोरे ला ऽऽ ले कोणे नंगरकीये गुजेरी
बातो कोणे नंगर वाटे जाये कन्हैय्या ऽऽ
कान्हा गुजर होळी खेले ऽऽ सी।।१।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले गोकळपरकी गु ऽऽ जेरी
थारो बंदराबण वाटे जाये कन्हैय्या ऽऽ
कान्हा गुजर होळी खेले ऽऽ सी।।२।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले गोकळपरकी गौळणन्के
बोतो सरकीये मारे टेरे कन्हैय्या ऽऽ
कान्हा गुजर होळी खेले ऽऽ सी।।३।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले बिचे बचाळे गौळणके
बोतो बन्सीका सुरे बेजाये कन्हैय्या ऽऽ
कान्हा गुजर होळी खेले ऽऽ सी।।४।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले अतरी तो झुठी झनबोले
झुठो झुठो थमारो लोके कन्हैय्या
कान्हा गुजर होळी खेले ऽऽ सी।।५।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले तू झन जायरी एखली
म्हा ऽऽ रा गुजरा छेसो साठे कन्हैया ऽऽ
कान्हा गुजर होळी खेले ऽऽ सी।।६।।
जांयो जांयोरे ला ऽऽ ले घुमे घेमाळो थारो घागेरो
बातो केन्हया रळकती डो ऽऽ रे कन्हैय्या ऽऽ
कान्हा गुजर होळी खेले ऽऽ सी।।७।।"

**शब्दार्थ :** गुजेरी = बाजार हाट, मारे टेरे = शिळ वाजविणे, झन जायरी एखली =एकटी जाऊ नकोस, केन्हया रळकती डोर = कंबरेवर घागराची डोर लोबंकळत आहे इत्यादी.

**भावार्थ :** श्रीकृष्ण आणि गोकुळनगरी हे तर मथुरा लभाण गणाचे श्रद्धास्थान होय. सदर लोकगीतामधून कृष्णाचा उल्लेख करून तांड्यामधील लोकं कृष्णासोबत होळी खेळत असल्याचा भाव व्यक्त होतो. या गीतामधून कल्पनासौंदर्याचा प्रत्ययही येतो.

तांड्यातील सर्व लोकं होळीनृत्यात मग्न आहेत. प्रश्नोत्तरी रवरूपाच्या या लोकगीतात कोणत्या गांवात गुजेरी म्हणजे बाजार हाट आहे व त्या गावचा रस्ता कोणत्या दिशेने आहे असा प्रश्न उपस्थित करून उत्तरादाखल गोकुळनगरीची बाजारहाट असून वृंदावनमधूनच या नगरीकडे जाण्याचा रस्ता आहे. या वाटेने जाणाऱ्या गोळणींची कान्हा छेड काढतो असा आशय व्यक्त होतो. गोकुळनगरीमध्ये साजरा करण्यात येणाऱ्या या होळी उत्सवाबद्दल एका स्त्रीला तर विश्वासच बसत नाही. हे दृश्य प्रत्यक्षपणे पाहण्याकरिता ती गोकुळनगरीकडे जायला निघते. त्यावेळी तर तिला हटकण्यात येते. तू एकटी जाऊ नकोस कारण वाटेत कान्हा तुझी छेड काढेल. शिवाय तुझ्या कंबरेवर घागराची डोर लोंबकळत असून ते अधिकच मन आकर्षित करून घेत आहे हा आशय व्यक्त होतो.

अशापद्धतीने मथुरा लभाण गण थट्टा-मस्करी करीत खेळनृत्य सादर करतात. याप्रसंगी गायिल्या जाणाऱ्या गाण्यांमूळे स्त्री-पुरूष मग्न होऊन होळी या सणाचा आनंद लुटतात आणि हा सण उत्साहाने साजरा करतात. असा 'होळी'चा सण लभाण गणासाठी आनंदाची एक पर्वणीच असते. रोजच्या कटकटीतून विसावा मिळावा, थट्टा मस्करीतून मनोरंजन व्हावे व आपल्या आनंदाला, उत्साहाला या लोकगीताच्या माध्यमातून व्यक्त करावे हा हेतू या लोकगीतांमधून प्रतित होतो. याशिवाय मथुरा लभाण संस्कृतीचा परिचय होतो.

**निष्कर्ष :-**

अशाप्रकारे मथुरा लभाण गणाकडून या सण, उत्सवप्रसंगी अनेक लोकगीते गायिल्या जातात. उदाहरणादाखल फक्त काही गीतांचाच येथे उल्लेख करण्यात आलेला आहे. या लोकगीतांद्वारे मथुरा लभाण गणाकडून सण साजरे करण्याची आगळी-वेगळी पद्धत, याप्रसंगी गाणी म्हणण्याची प्रथा, ईश्वराप्रती असणारी श्रद्धा, त्यांची जीवनपद्धती, गायी पाळण्याचा व्यवसाय, गायींच्या संरक्षणार्थ वनाधिकाऱ्यांशी केलेला संघर्ष, आपल्या पूर्वजांच्या वीर-शूरपणाचे स्मरण यासोबतच मथुरा लभाण संस्कृतीच्या विविध पैलूंचे दर्शन घडते. या दृष्टीने सण, उत्सवप्रसंगी पुरूषांकडून गायिल्या जाणाऱ्या गीतांचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो. विशेष म्हणजे ही सण, उत्सव सामूहिकतेने साजरे करण्यात येतात. याशिवाय याप्रसंगी गायिल्या जाणाऱ्या गीतांमधून समूहमन व्यक्त होते. म्हणूनच 'हा लोकसमूह एकूण संस्कृतीचे धारण करून संस्कृतीचे सातत्य टिकवीत असतो.'[२] त्यामुळे ही सण, उत्सव साजरे करणे व याप्रसंगी गायिल्या जाणाऱ्या गाणींमूळे लोकसंस्कृतीचे दर्शन तर घडतेच शिवाय लोकसंस्कृतीचे जतन व संवर्धनही होते.

**संदर्भसूची :-**

१. डॉ. व्यवहारे शरद, 'मराठी स्त्री गीते', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २ ऑक्टोबर १९९१, पृ.क्र. ११३

२. प्रा. डॉ. मोरजे गंगाधर, 'लोकसाहित्य आकलन आणि आस्वाद', दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे, आवृत्ती १९९३, पृ.क्र.७



Principal
Bhartiya Mahavidyala
Morshi

2017-18 (5) L

5TH YEAR - EDITION 18 TH

National Research Journal

ISSN 2319-6289

JULY - DECEMBER 2017

आर्थिक घडामोडीचे त्रैमासिक

# अर्थविश्व

EDITOR :
DR. SANGITA TAKKAMORE







Principal
Bhartiya Mahavidyalaya

# मेक इन इंडिया : एक विश्लेषण

डॉ. लाजवंती आर. टेंभुर्णे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी.
जि अमरावती.

भारत हि जगातील मोठी अर्थव्यवस्था असणारा देश आहे. दहा मोठया देशांमध्ये ज्याचा जी.डी.पी नाममात्र आहे, परंतु क्रयशक्ती ; PPP Purchesing power parity) मात्र जास्त आहे अशा देशात भारताचा क्रमांक लागतो. भारतामध्ये श्रमशक्तीसुद्धा मोठया प्रमाणात आहे. ज्ञान, कुशलता जास्त आहे परंतु या श्रमशक्तीचाा उपयोग पाहिजे त्या प्रमाणात होतांना दिसून येत नाही. या श्रमशक्तीचा उपयोग योग्य व पुरेशा प्रमाणात झाला पाहिजे. देशातील लोकांना पुरेशा प्रमाणात वस्तु व सेवा उपल्ब्ध झाल्या पाहिजे यासाठी त्यांना त्यांच्या जीवनमानाइतके उत्पन्न मिळावे की, जेणेकरून गरिबांच्या राहणीमानात वाढ होईल.

मोदी सरकारने २५ सप्टें. २०१४ ला मेक इन इंडिया या योजनेची सुरूवात केली. यामागचा उद्देश हा की लोकांना दैनंदिन व्यवहारात उपयोगी पडणाऱ्या वस्तुंची निर्मिती भारतातच व्हावी व लोकांना मोठया प्रमाणात रोजगार प्राप्त व्हावा जेणेकरून ते आपल्या राहणीमानात वाढ करू शकतील. कमीतकमी खर्चात अधिक उत्पादन होउन लोकांना वस्तु व सेवा कमीत कमी किंमतीत प्राप्त झाल्या पाहिजे. या योजनेच्या माध्यमातून देशभरातून मोठया कंपन्यानी भारतात येउन गुंतवणूक करण्याची संधी भारताने विदेशी कंपन्यांना निर्माण करून दिली आहे. योजनेला सुरूवात झाल्यापासूनच भारतात नोंव्हें २०१५ पर्यंत देशभरातून इलेक्ट्रानिक कंपन्यानी भारतात प्रपोजल पाठवून कंपन्या सुरू करण्यासाठी परवानगी मागितली आहे. सप्टें २०१४ ते नोंव्हें २०१५ च्या आकडेवारीनुसार १.२० लाख करोड रू भारत सरकारला बाहेरच्या कंपनीकडून प्राप्त झाले आहे.

## उद्देश

मेक इन इंडिया योजना सुरू करण्यामागे खालील उद्देशाने करण्यात आली आहे.

१. देशात रोजगार वाढून बेकारी व गरिबी कमी होईल.

२ देशातील युवक वर्गाला आपली शक्ती, कार्य कुशलता सर्वांना दाखविण्याची संधी मिळेल.



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

- नागरिकांमध्ये कार्याप्रति आत्मविश्वास निर्माण करणे.
- राष्ट्रप्रेम, कर्मप्रेम जागृत करणे.

वरिल ठळक उद्दिष्टे समोर ठेवून सुशासनाची प्रक्रिया राबविल्यास भारताचा, आर्थिक विकासाचा वेग वाढणे सहज शक्य आहे.

वरील निष्कर्शावरून असे स्पष्ट होते की, भारतीय जनतेचेमतपरिवर्तन करणे गरजेचे आहे व त्यासाठी नैतिक मुल्यांची व कार्याविषयी निष्ठेचे संस्कार व शिकवण बालपणापासून त्यांच्यावर रुजविण्याची गरज आहे.

* शिफारसी :-

वरिल निष्कर्षाच्या आधारे काही शिफारसी सुचविता येतील.

- सुशासनाचे महत्व जनतेपर्यंत योग्य पद्धतीने पोहचविणे गरजेचे आहे.
- 'कर्म हेच ध्येय', 'कर्म हिच पूजा' याबाबत जागरूकता आणली जावी.
- देशभक्ती व देशप्रेमात चालना देणारे उपक्रम योग्य खापर करता यावे त्यासाठी विविध संधी निर्माण केल्या जाव्यात.
- समाजातील आदर्श व ज्येष्ठ व्यक्तींचा सन्मान व सत्कार केला जाऊन त्यांचे अनुकरण केले जावे.
- शासनाप्रति विश्वास निर्माण व ण्यासाठी जनतेसाठी सकारात्मक वातावरण तयार केले जावे. त्यांच्या मुलभूत गरजांची पूर्तता केली जावी.
- आंतरराष्ट्रीय बाजारात लहानात लहान उत्पादकाला संधी प्राप्त करून देण्यात यावी.
- देशाचा विकास हे एक पवित्र कार्य आहे. असा मानस तयार करण्यात यावा. कर्मचाऱ्याने आपले कार्य राष्ट्रकार्य समजावे.
- प्रामाणिकपणा, समानता आणि स्पर्धेत टिकून राहण्याची चिकाटी निर्माण केली जावी.
- योजना व सुधारणांचा फायदा सर्वसामान्यांना अधिक प्रमाणात मिळवून देण्यासाठी त्याचे स्वरूप सुलभ व पारदर्शी केले जावे.

वरिल शिफारशींचा विचार करून आर्थिक विकासाचे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न केल्यास सुदृढ राष्ट्रनिर्मितीस हातभार लावता येईल. एका नविन पिढीची निर्मिती करण्यासाठी, मी हे कार्य करू शकतो करीन. आपण हे केलेच पाहिजे असा आत्मविश्वास निर्माण करण्यात यश आल्यास सुशासनाचे आव्हान पेलणे अधिक सुलभ होईल. विकसित भारताचा नागरिक म्हणविण्याचा अभिमान प्रत्येकास वाटेल. सुशासनासाठी आपापल्या पातळ्यांवर कार्याबाबत सामुहिक शपथ, घेवून निष्ठेने कार्यारंभ केल्यास मा. अटलबिहारींचे सुशासनासंबंधीचे विचार प्रत्यक्षात आणता येतील. सुशासनाचे आव्हान स्विकारता येईल फक्त त्यासाठी 'सेवाभाव' व 'कर्म हिच पूजा' हे विचार रुजविणे तेवढे गरजेचे आहे.

* संदर्भ सूची :

१) निवडक संभाषण – प्रकाशन विभाग, सूचना व प्रसार मंत्रालय, भारत सरकार.
२) योजना – २०१५.

◆◆◆



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

३. जास्तीत जास्त वस्तू भारतात बनविल्या गेल्या पाहिजे की, ज्यामुळे त्यांच्या किंमती कमी होतील व निर्यातीला प्रोत्साहन मिळेल.

४. देशाची निर्यात वाढून त्याचा फायदा देशाच्या अर्थव्यवस्थेला होईल.

५. उद्योगांना आवश्यक असे कुशल कामगार बनविणे.

६. २५ क्षेत्रांमध्ये उत्पादनाची उच्च गुणवत्ता आणि पर्यावरणावरील प्रमाण कमी करणे.

भारतात युवकांची संख्या जास्त असल्यामुळे त्याचा वापर करून देशात वस्तुंचे उत्पादन व निर्मित वस्तुना प्रोत्साहन देणारी ही योजना आहे. यामुळे देशविदेशातील गुंतवणूकदारांना भारतात व्यापार करण्याचे दरवाजे खुले करून देण्यात आले आहे. यासाठी सरकारने पंचवीस क्षेत्रांची निवड केली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ऑटोमोबाईल्स | बायोटेक्नॉलॉजी | केमिकल | फुड प्रोसेसिंग |
| इन्फॉमेशन टेक्नॉलॉजी | लेदर | माइनिंग | मिडिया व इंटरनेट |
| ऑईल व गॅस | रेल्वे | पोर्टस अॅण्ड शिपिंग | थर्मल पावर |
| टेक्सटाईल अॅण्ड गारमेंटस | टुरिझम | इलेक्ट्रीकल मशीनरी | रोड व हाइवे |
| विमान उद्योग | अंतरिक्ष आणि अॅस्ट्रानॉमी | आदरातिथ्य | संरक्षण |
| ऑटोमोबाइल्स कंपोनेन्ट | इलेक्ट्रानिक सिस्टीम | कन्स्ट्रक्शन | फार्मासिटीकल |
| वेलनेस | | | |



भारतीय अर्थव्यवस्थेत शेती, सेवा, उद्योग यांचे अनन्यसाधारण महत्व आहे. यामध्ये सर्वात जास्त योगदान हे सेवाक्षेत्राचे म्हणजेच छप्पन टक्के आहे, तर खालोखाल शेतीक्षेत्राचे असलेले दिसून येते. सर्वात कमी योगदान हे उद्योगक्षेत्राचे म्हणजे फक्त सोळा टक्केच आहे याचा अर्थ असा की उद्योगक्षेत्रामध्ये गुंतवणूक मोठया प्रमाणावर करणे आवश्यक आहे.

देशामध्ये मेक इन इंडियाची सुरूवात करण्यामागे आपल्याच देशात मोठया प्रमाणावर वस्तू व सेवा निर्माण करून त्याची मोठया प्रमाणात निर्यात करणे हा जरी असला तरी देशामधून आपण कोणत्या वस्तुची किती निर्यात करतो याचा आढावा घेणेसुद्धा आवश्यक ठरते.



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

भारतातील निर्यात वस्तू (२०१३-१४) वस्तू

| वस्तू | टक्केवारी |
|---|---|
| रत्न व जडजवाहिर | १३ |
| वाहतुकीचे पार्ट | ७ |
| यंत्राचे सुटे भाग | ५ |
| औषधी श | ५ |
| धातू उत्पादन | ३ |
| विणलेले कापड व कापड | ७ |
| इलेक्ट्रानिक | ३ |
| प्लॅस्टीक | २ |
| पेट्रो उत्पादन | २० |
| इतर | २५ |

भारतात मेक इन इंडिया का कार्यक्रम फक्त विनिर्माण क्षेत्र आणि अन्य क्षेत्रात उद्यमशिलतेला प्रोत्साहन देण्याकरिता सुरू केलेला कार्यक्रम आहे. हा कार्यक्रम चार स्तंभावर आधारीत असलेला दिसून येतो.

### १. नविन कार्यपद्धतीचा विकास :-

मेक इन इंडिया चे म्हणणे आहे की, उद्योगशिलतेला प्रोत्साहन देण्यासाठी सर्वात महत्वाची गोष्ट आहे ती म्हणजे देशात व्यापार करण्याच्या सुविधा निर्माण करून देणे. उद्योगशिलतेला स्पष्ट आणि सरळ बनविण्यासाठी अनेक नविन कार्यात्मक पद्धती सुरू केल्या पाहिजे. अशा नविन कार्यपद्धतीचा वापर करून नविन उद्योग स्थापन करण्यावर भर देण्यात आला आहे.

### २. नविन पायाभूत सुविधा निर्माण करणे :-

उद्योगांच्या मोठया प्रमाणात विकासासाठी आधुनिक सोईसुविधा, पायाभूत सुविधा उपलब्ध करणे सुद्धा आवश्यक आहे. जितक्या पायाभूत सुविधा जास्त तितका उद्योगाचा विकास जास्त म्हणून सरकार आज आधुनिक हायवेज व कम्युनिकेशन आणि इंटिग्रेटेड सुविधा करून देण्यासाठी प्रयत्न करेल.

### ३. नविन क्षेत्रांची ओळख :-

मेक इन इंडियामध्ये विनिमयक्षेत्र, पायाभूत सुविधा आणि सेवा गतिविधीसाठी पंचविस नविन क्षेत्रांची ओळख करून देत आहे.

### ४. नविन कल्पना :-

उद्योगक्षेत्रांमध्ये नवनविन कल्पना वापरून जास्तीत जास्त उत्पादन व उद्योजकाद्वारे जास्तीत जास्त गुंतवणूक होण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे यावर जास्त भर देण्यात आला आहे.

### मेक इन इंडियामुळे भारताला होणारे फायदे :

भारताला या योजनेमुळे खालील फायदे प्राप्त होऊ शकतात.

### १. रोजगारात वाढ :-

भारतातील या उपक्रमामुळे उद्यमशिल कुशल व गुणवत्तापूर्ण असलेल्या युवकांना मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. जवळपास दहा लक्ष मिलियन लोकांना रोजगाराच्या संधी प्राप्त होतील अशी आशा आहे. यासाठी सरकार मुद्रायोजनासारख्या कार्यक्रमाच्या माध्यमातून वित्तिय मदत देईल.



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Mo...

इतक्या मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या तर आणखी काही क्षेत्रात वस्तु व सेवांची मागणी वाढेल की ही एकूण अर्थव्यवस्थेला समृद्धीच्या मार्गावर नेऊन अधिक विकासाला प्रोत्साहन मिळेल.

२. आर्थिक विकासाला प्रोत्साहन :-

मेक इन इंडिया उपक्रमात उत्पादन हे भारतातच होत असल्यामुळे निर्यात आणि विनिर्माण क्षेत्रात वाढ होईल आणि आयातीचे प्रमाण कमी होईल. उत्पादन हे देशातच होत असल्यामुळे भारत स्वयंपूर्ण होऊन निर्यातीचे प्रमाण वाढेल व यामुळे अर्थव्यवस्थेत सुधारणा घडून येतील. भारताची आर्थिक स्थिती सुधारेल.

३. वस्तुंच्या किंमती कमी :-

भारतामध्येच अनेक वस्तूंचे उत्पादन मोठया प्रमाणावर होत असल्यामुळे वस्तूंच्या किंमती कमी होण्यास मदत होईल की, ज्यामुळे निर्यात वाढविण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.

४. पायाभूत सुविधेत सुधारणा :-

मेक इन इंडियाच्या उपक्रमामुळे जी पायाभूत सुविधा मजबूत नाही अशी पायाभूत सुविधेत सुधारणा होण्यास मदत मिळेल.

५. मॅन्युफॅक्चरिंग हब तयार करणे :-

भारतामध्ये तयार केले जाणारे उत्पादन हे जगात कुठेही विकले जावे याकरिता भारताला एक गुंतवणूक हबच्या रूपात विकसित करावयाचे आहे. या माध्यमातून विदेशी कंपन्यांना भारतात करात सूट, एफ.डी.आय मध्ये गुंतवणूकीचे प्रमाण वाढवून देउन विदेशी कंपन्यांना भारतात उद्योग स्थापन करण्यासाठी प्रोत्साहित केल्यामुळे सकल घरेलू उत्पादनात वाढ होईल.

६. अधिक विदेश गुंतवणूक आकर्षित करणे :-

भारतामध्ये या उपक्रमाद्वारे बहुक्षेत्रीय उद्योगामध्ये मोठया प्रमाणात विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी त्यांना अनेक प्रकारच्या सुविधा देणे जेणेकरून भारतात मोठया प्रमाणात गुंतवणूक होउन भारताला त्याचा फायदा मिळेल.

अशाप्रकारे मेक इन इंडिया या उपक्रमामुळे २५ अधिक क्षेत्रात रोजगारनिर्मिती आणि गुणवत्तापूर्वक कार्यकुशलता वृध्दीवर लक्ष केंद्रित करणे हा उद्देश आहे.

मेक इन इंडिया पुढिल अडचणी/समस्या

मेक इन इंडिया कार्यक्रम राबविण्यामध्ये अनेक समस्या निर्माण होऊ शकतात.

१. भ्रष्टाचार :-

मेक इन इंडिया उपक्रमात नविन गुंतवणूकदार गुंतवणूक करित असतांना भ्रष्टाचार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे भारताच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील ओळखीला नुकसान पोहचेल. म्हणून या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी जुन्या आणि नविन गुंतवणूकदाराचा विश्वास संपादन करणे आवश्यक आहे.

२. पायाभूत सुविधा :-

मेक इन इंडिया प्रोजेक्ट साठी सर्वात मोठी अडचण म्हणजे भारतातील पायाभूत असुविधा होय. भारतात असलेले रस्ते, सडका , पाणीपुरवठा, वीज या सुविधा मुबलक



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

प्रमाणात उपलब्ध नाही. भारतात जर मॅन्युफॅक्चरिंग हब तयार करावयाचे असेल, वस्तुचे उत्पादन मोठया प्रमाणात वाढत असेल, तर ते उत्पादन गंतव्यपर्यंत पोहचविण्यासाठी ट्रान्सपोर्ट सुविधा मोठया प्रमाणावर आवश्यक आहे, त्याचप्रमाणे उर्जेची समस्यासुद्धा भारतात गुंतवणूकदारासाठी चिंतेचा विषय आहे.

### ३. लाल फितशाही :-

भ्रष्टाचाराव्यतीरिक्त भारतात सरकारी ऑफिसेस मध्ये असलेली लाल फितशाही ही समस्या होय. या प्रक्रियेत गुंतवणूकदार जटील प्रक्रियेच्या जाळामध्ये फसून आपला वेळ वाया घालविणे पसंद करणार नाही. त्यामुळे सरकारला अशी प्रक्रिया राबवावी लागेल की, व्यवस्था ही सोपी आणि सिंगल विंडो सिस्टीमवर जोर दिला पाहिजे.

### ४. राज्य केंद्र समन्वय :-

मेक इन इंडियाचा प्रोजेक्ट राबवितांना केंद्र व राज्यसरकारमध्ये समन्वय असणे गरजेचे आहे. परंतु राज्य आणि केंद्र सरकारचे गुंतवणूकीसंबंधीचे विचार वेगवेगळे असल्यामुळे यामध्ये मोठी अडचण निर्माण होईल.

### ५. टॅक्सव्यवस्था :-

भारतात अजूनही टॅक्स प्रक्रियेमध्ये जटीलता आहे. यातून आतापर्यंत टेलीकॉम पासून अन्य क्षेत्रातील कंपन्या टॅक्ससंबंधी बाबतीत भारतीय कोर्टाच्या चकरा मारून चुकल्या आहेत. अशा स्थितीत सोपी व सुलभ पारदर्शी टॅक्सव्यवस्था असणे आवश्यक आहे. सध्या जी.एस.टी करासारखा एकच कर सरकारने लावल्यामुळे यात पारदर्शकता येउ शकते ती नाकारता येउ शकत नाही.

अशाप्रकारे भारतात मेक इन इंडियाची सुरुवात झाल्यामुळे भारतातच अनेक वस्तुंचे उत्पादन होईल. भारतात ज्ञानाला कमी नाही त्यामुळे या ज्ञानाला काम मिळेल हे खरे जरी असले तरी सन १६०० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीसुद्धा भारतात व्यापार करण्याच्या उद्देशाने आली होती व सर्व काही घेउन गेली. मेक इन इंडियामुळे सुद्धा देशाला कमी व विदेशालाच फायदा होईल. यापासून कर सरकारला मिळेल व जवळी सगळा धन हा विदेशातच जाईल. म्हणजेच एकप्रकारे या प्रोजेक्टमुळे विदेशी व्यापाराला प्रोत्साहन मिळेल व भारतात विदेशी कंपन्यांची संख्या वाढून येथिल उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर लागतील ही शक्यता नाकारता येत नाही.

### ❋ संदर्भ ग्रंथ


१. संपा. अविनाश धर्माधिकारी, 'चाणक्य मंडल परिवार', वर्ष १०, अंक १०, पुणे, नोव्हें. २०१४.

२ मुख्य संपा. दिपिका कच्छल, 'योजना', वर्ष ४३, अंक १५, नवी मुंबई, ऑक्टो २०१५.

३ मुख्य संपा. दिपिका कच्छल, 'योजना', वर्ष ४४, अंक ११०, नवी मुंबई, मे २०१५.

४. www.slideshare.net

५. Make in India, wikipedia


◆◆◆



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

2017-18 (J) L

Special Issue February 2018

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawrta®

## International Multilingual Research Journal

Bharatiya Vidya Mandir Amravati's

**Bharatiya Mahavidyalaya, Morshi Dist.Amravati**

(Affiliated To Sant Gadge Baba Amaravati University,Amravati )

## One Day National Conference

On

# Impact of Demonetization on Indian Economy

24th February 2018



**Principal**
G.S.Meshram

**Chief Editor**
Prof. Virag Gawande

**Editor**
Dr. Lajwanti R.Tembhurne

Organized By

**Department Of Economics**

Bharatiya Mahavidyalaya, Morshi Dist. Amravati

In Collaboration With

Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका
विद्यावार्ता™

February 2018, Special Issue

Bharatiya Vidya Mandir Amravati's
Bharatiya Mahavidyalaya, Morshi Dist. Amravati
(Affiliated To Sant Gadge Baba Amaravati University,Amravati )
One Day National Conference
On

# Impact of Demonetizationon Indian Economy

24th February 2018

Principal
G.S.Meshram
Bharatiya Mahavidyalaya, Morshi Dist. Amravati

Chief Editor
Prof. Virag Gawande
Director, Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati

Editor
Dr. Lajwanti R. Tembhurne

Organized by
Department of Economics
Bharatiya Mahavidyalaya, Morshi Dist. Amravati
&
Aadhar Social Research & Development Training Institute Amravati

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Principal
Bhartiya Mahavidyalaya

14) निश्चलनीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास
प्रा. पंढरी जी. मोरे., ओंकारनगर नागपूर. || 51

15) विमुद्रीकरण आणि काळापैसा
प्रा.हेमराज चौधरी, आर्वी जि. वर्धा. || 53

16) निश्चलनीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम
डॉ. अे. जी. वानखडे, रिसोड जि. वाशिम || 56

17) सर्वसमावेशी शाश्वत विमुद्रिकरण आवश्यक
प्रा. रविंद्र बा.शेंडे, वरोरा. || 58

18) निश्चलनीकरण आणि भ्रष्टाचार आणि काळापैशाचे प्रतिबंध
प्रा. डॉ. व्ही.व्ही. लाडे, तुकूम, चंद्रपूर || 61

19) विमुद्रिकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम
प्रा. डॉ. रवि सोरते, पवन महंत || 65

20) विमुद्रीकरण आणि सामान्य जनता
सौ. दिपाली पडोळे, उत्तमनगर अमरावती || 69

21)नोट बंदीचे विधायक व विघातक परिणाम
प्रा. डॉ. मंमता आर. साहु, रोहणा, जि. वर्धा || 72

22) विमुद्रीकरण : एक आर्थिक/ अध्ययन
प्रा. डॉ. लाजवंती आर. टेंभुर्णे, मोर्शी || 74

23) विमुद्रीकरणाचा सर्वसामान्य व्यक्तिंवर परिणाम
प्रा.जगदीश वाटामोडे, नागपूर || 77

24) विमुद्रीकरण आणि काळ्या पैशावरील त्याचे परिणाम
ज्ञानेश्वर बापूराव जांभुळे, परेल मुंबई || 80

25) नोटबंदीचे उद्देश, फायदे / नुकसान
प्रा. एम. यु. अर्जुने, नेर || 83

26) Demonetization Special effect on Banking sector [Bank loan]
Dr. Jyoti Pande [ Rai], Distt. – Bhandara || 86

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

केली उदा. दोन हजार रूपये हा पैसा याला मोठया प्रमाणात कमी आणले साठवले शक्य होत आहे.

५. सामाजिक त्याग :–

नोट बंदी व नविन चलन पदरात पाडुन घेणे किंवा नोटा बदली करणे या गरजे पोटी समाजातील जवळ जवळ सर्वातील नागरीकांनी आपले दैनंदिन कामकाज सोडुन बँकामध्ये व ए.टी.एम समोर लांब लांब रांगा लावल्यामुळे रोजनदारी वर काम करणाऱ्यांना मोठया त्रासला समोर जावे लागले. हा एक प्रकारचा त्यागच आहे या रांगामध्ये अनेक ठिकाणी काही लोक मृत्यु मुखी पडले.

६. स्थुल राष्ट्रीय उत्पन्ना घट :–

नोटा बंदीच्या निर्णयामुळे आगामी काळावधीतील चलन टंचाईमुळे मंदी सदृश्य परिस्थीत रोजगारात घट निर्माण होवुन स्थुल राष्टीय उत्पादनात घट होणाची शक्यता आहे. या निर्णयामुळे स्थूल राष्टीय उत्पादनात २ टक्के पर्यत घट होईल. असे मत अर्थतज्ज व माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी व्यक्त केले.

७. आर्थिक विकासावर परिणाम :–

माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम यांच्या मते नोट बंदीच्या निर्णयामुळे फायदा पैक्षा अर्थव्यवेस्थवर प्रंचड भार टाकणाऱ्या या निर्णयाने किमान वर्षभर अर्थवृद्धीचा मार्ग भरटकेल अशा इशारा त्यांनी दिला.

निष्कर्ष

लोकांना कॅशलेस व्यवहार करण्याऐवजी बँकलेस व्यवहार होण्याची भिंतीबाटत आहे. शासनाच्या आर्थिक धोरणामुळे लोकशाही देशातील बहुसंख्या गरीब, मध्यम वर्ग, कामगार, कष्टकरी, शेतकरी, स्वरोजगारी, आणि खाजगी नौकरदार यांच्यावर विपरीत परिणाम नोट बंदीमुळे झाले. यातुन मात्र एक नकी झालेकी लोकांच्या जिवाळाच्या मुळ प्रश्नांना बगल देण्यात सरकारी यशस्वी झाले.

संदर्भ सुची


१. महासब डी, पैसा झाला काळा
२. दैनिक लोकसत्ता, नागपूर
३. दैनिक तरूणभारत, नागपूर
४. राजेन्द्र शहणाणे, दै. पुढारी, १३ नोव्हेंबर २०१६, पृष्ठ संख्या ०७
५. रूद्रदत्त–सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था, एस, चॉद पब्लीकेशन, ५९ आवृत्ती २००९


22

# विमुद्रीकरण : एक आर्थिक/ अध्ययन


प्रा. डॉ. लाजवंती आर. टेंभुर्णे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख भारतीय महाविद्यालय,मोशी


८ नवंबर २०१६ मे जब सरकार ने ५०० और १००० रु की नोट चलन मे से समाप्त करने का निर्णय जाहिर किया तब सबको बडा धक्का लगा। जब किसी देश की सरकार पुरानी मुद्रा को कानुन के तौरपर बंद करती है या, समाप्त करती है और नई मुद्रा लाने की घोषणा करती है उसका विमुद्रीकरण कहा जाता है। इस विमुद्रीकरण के बाद पुरानी मुद्रा की कोई किंमत नही रहती।

विमुद्रीकरण क्यो ?

जब कालाधन बढ जाता है और अर्थव्यवस्था को खतरा बन जाता है, तो इसे दूर करने के लीए विमुद्रीकरण का प्रयोजन किया जाता है। कालाधन, नकली नोट, भष्टाचार और आतंकवाद की गतिविधीपर नियंत्रण रखने के लीए सरकार विमुद्रीकरण का फैसला लेती है। जिसके पास कालाधन है वो उसके बदले मे नई मुद्रा लेने का साहस नही जुटा पाता। अवैध गतिविधियो से संलग्नित लोग नोटो को अपने पास रखते है ऐसे मे विमुद्रीकरण की सिधी चोट उसे पहुचती है। कई बार नगद लेन देन को हस्तोत्साहीत करने के लीए भी विमुद्रीकरण किया जाता है। केंद्र सरकार को भी उम्मीद थी की नोटबंदी से कालाधन, नकली नोट, आंतकवाद को अंकुश बैठेंगा, विमुद्रीकरण का उददेश केवल कालेधन पर नियंत्रण ही नही बल्की जाली नोटो से छुटकारा पाना भी है। विमुद्रीकरण का सरकार का एक और उददेश था की, कम से कम रोख प्रयोग करनेवाले अर्थव्यवस्था निर्माण करना जिससे सभी आर्थिक व्यवहारोकी जांच करते आने का चाहे

Principal Bharatiya Mahavidyalaya Moshi

से कॅशलेश अर्थव्यवस्था मे पारदर्शकता लायी जायेगी।

### भारत मे नोटबंदी कब–कब हुई।

भारत की स्वतंत्रता के बाद जनवरी १९४६ मे १००० और १०,००० के नोट बंद करने का निर्णय लिया गया और १०००,५००० के नये नोट १९५४ मे पुन: शुरु किये गये। सन १९७८ मे मोरारजी देसाई की जनता सरकारने कानूनी नियम बनवाकर फिर से १०००,५००० और १०,००० के नोटो का विमुद्रीकरण किया। ताकी जालसाजी और कालेधन पर अंकुश लगाया जा सके, २००५ मे मनमोहन सिंग सरकारने भी ये किया और ८ नवंबर २०१६ को तत्कालीन प्रधानमंत्री (बीजेपी सरकार)व्दारा विमुद्रीकरण का ऐलान किया गया। इससे २८ अक्टुबर २०१६ को भारत मे रु ७.७७ लाख करोड मुद्रा सक्युलेशन मे थी। मूल्य के आधार पर ३१ मार्च २०१६ को आई आरबीआय के रिपोर्ट के अनुसार सक्युलेशन मे नोटो की कूल किंमत रु १६.४२ लाख करोड है जिसमे ८६% याने की १४.१८ लाख करोड ५०० और १००० के नोट मे है।

### नोट बदलने की प्रक्रिया समाप्त होने तक चली प्रक्रिया

१) ए.टी.एम.से किसी एक दिन मे रु २,५०० तक निकाल सकते है।

२) एक दिन मे ग्राहक बॅक काउंटर रु २४,००० से ज्यादा नही निकाल सकता।

३) किसी एक हप्ते मे एक ग्राहक रु २४,००० तक बॅक से निकाल सकता है।

४) एक बार मे २००० रु एक ही बॅक मे बदल सकते है। बॅक मे एक फॉर्म भरने के बाद ही पुरानी नोट बदल सकते है।

५) एक दिन मे एक व्यक्ती एक दिन मे २,००० रु के नोट बदल सकता है। एक ही आयडीपर दोबारा पैसे जमा नही होंगे।

६) ई बॅकींग लेन देन पर कोई रोक नही है और कोई व्यक्ती आर.टी.जी.एस., एन.इ.एफ.टी. पेटीएम, मोबाईल बॅकींग वगैरे के जरिए जितने चाहे पैसे किसी दुसरे को दे सकता है।

७) धिरे धिरे से सभी परेशानीया कम होने लगी और अर्थव्यवस्था मे सुधार आने लगा।

विमुद्रीकरण की वजह से पुरानी बाद हुई चलनी नोट ठेव स्वरुप मे बॅक की तरफ बडे प्रमाण मे आई किंतु सरकारकी अपेक्षा के विपरीत बाद की हुई ५०० और १००० रु मुल्य की ९९% नोट बॅकोमे वापस आ गयी इस की वजह से सालभर मे बॅको ने कर्ज के उपर व्याज दर मे साधारण: १ १/२ कपात की हुई दिखाई देती है।

विमुद्रीकरण व्दारा रोख व्हीन अर्थव्यवस्था निर्माण करना यह उद्देश से किया गया लेकीन इससे उनके क्षेत्र प्रभावित हो गये।

### १) ग्रामीण अर्थव्यवस्था

विमुद्रीकरण के समय ५०० और १००० रु के नोटो की तादाद शहरो की तुलना मे गॉव मे कम थी, लेकीन ग्रामीण भागो मे रोजगार का भूगतान नोटो से होने के कारण यह आकिडा बढ गया। विमुद्रीकरण के बाद ग्रामीण बॅक और डाकघरो मे शहरो की तुलना मे कम धन जारी किया गया था। असंघटीत मजदुरो को जबरदस्ती ५०० और १००० के पुराने नोटो मे ही भुगतान किया गया। उनसे कहा गया की अगर उनको काम करना है तो इसी मुद्रा मे भुगतान लेना होगा। गरीब, मजदूर किसान परेशान हुआ, उनके घर मे चुल्हा नही जला। सब्जीवाले की सब्जीया सड गयी। कृषी व्यवसाय संकट मे आ गया विमुद्रीकरण के बाद सांगली, सातारा, कोल्हापुर, लातूर यह चार जिल्हे मे सरासरी १२,००० करोड रु की पुरानी चलन मे की नोट विविध बॅक मे जमा कर दी गयी। मात्र उसके बदले मे उपलब्ध होनेवाला चलन कम हुआ। याने २२०० से २८०० कोटी का है। इससे उर्वरित साडे आठ हजार कोटी रु कमी की वजह से यह भाग परेशान हुआ। शेती की कर्जपुर्ती भी कम हुई, ग्रामीण अर्थव्यवस्था बडे पैमानेपर नगदी से चलता है। ग्रामीण अर्थव्यवस्थापर ८० करोड लोग या भारतीय आबादी ६५% फिसदी निर्भर है। किसान बीज, खाद और बाकी के छोटे मोटे काम नगद देकर करते है किंतु विमुद्रीकरण की वजह से इनके सब व्यवहार ठप्प हो गये। वे आसानीसे से खरीद नही पाया। उसकी संचित पुंजी को खतरा है क्योंकी वह आसानीसे बॅकतक नही पहुंच सकता। कईयो का तो बॅक मे खाता ही नही है।

विमुद्रीकरण की वजहसे सब्जियो की किमतो मे गिरावट आई और सब्जी उत्पादक किसान उसके लागत मूल्य से वंचित हो गये थे। पुरे देश मे उन्होने सब्जियो को सडको पर फेककर अपना विरोध जताया। नोटबंदी का असर केवल फसलो के विक्रय मूल्यपर पडा ऐसा नही तो आनेवाली सीजन की फसलो पर भी पडा इसका परिणाम उत्पादन मे गिरावट आ गयी। इसका अर्थ की वर्ष २०१६–१७ के साथ ही वर्ष २०१७–१८ मे कृषी उत्पादन मे गिरावट आयेगी। बॅक किसी गाव से कुछ किलोमीटर की दूरीपर होते है। ऐसे मे बॅक जाने और वहा घंटो कतार मे खडे रहने की लागत करिब ५० रु प्रतिदीन हो सकती है। और इससे किसी भी मजदूर के मेहनताने का नुकसान हुआ।

### जनजीवनपर प्रभाव

विमुद्रीकरण का सकारात्मक प्रभाव यह रहा की, जो महिलाएं धन और बॅक संबंधित कार्यो के लीए अपने पती या अपने घरपर निर्भर थी वे भी घर से बाहर निकलकर बॅको मे जाना, नोट परिवर्तन करना सीख गई। सरकार के इस फैसले के कारण जिनके पास कालाधन है ऐसे कई लोगो ने अपने घर की छतपर या तहखाने मे जला दिया। इसीसे भारत नगदरहित बनने की ओर अग्रेसर हो रहा है, बॅको मे ज्यादा पैसा जमा होने की वजह से, ब्याजदर कम करके सभी बॅको मे वित्तपूर्ती करने मे सुलभता आई। बुडीत कर्जो का सामना करने के लीए बॅको को इससे कुछ दिलासा मिल गया। मकान कि किमतो मे आई गिरावट के कारण आम आदमी का घर का सपना पुरा होगा।

### आतंकवाद एवं भ्रष्टाचार

विमुद्रीकरण की वजह से आतंकवाद एक आर्थिक आतंकवाद के साये मे आ गया। उसका पोषण करनेवाले हवाला कारोबारियो की कमर टूट गई। इसका सबसे बडा नुकसान इन हवाला कारोबारियो का हुआ। हवाला कारोबारी आतंकवादी, शस्त्रोके अवैध व्यापारी, नशे की दवाओ की तस्कर, सट्टाबाज नकली नोटो इ.के बॅक थे इन सबकी टांग टूट गयी।

जिनके पास कालाधन था, जिन्होने भ्रष्टाचारद्वारा अपने को और अपने परिवार को बर्बाद किया था, वे भी यह धन नही रख पाये। अंत एक सिमा के बाद भ्रष्टाचारी घूस लेने से मना कर देते। वे अपना कालाधन जमा करने बॅक मे नही जा सकते।

### पर्यटन उद्योग

विमुद्रीकरण का प्रभाव सिर्फ आम जनतापर ही नही कारोबार, पर्यटन इसपर भी पडा। सबसे ज्यादा विमुद्रीकरण का प्रभाव पर्यटन उद्योगोपर पडा। अनेक लोग पर्यटन के लीए अलग अलग भागो मे जाते है। पर विमुद्रीकरण की वजह से भारत मे पर्यटन उद्योग इस कदर मंदा गया की देश की प्रमुख पर्यटन गंतव्यो के अधिकांश होटल और गेस्ट हाउस खाली पडे रहे। नवंबर कि नोटबंदी से जो अक्टूबर – नवंबर के समय शुरु होनेवाला पर्यटन विमुद्रीकरण की वजह से कम हो गया। इस मौसम मे उत्तरप्रदेश, गुजरात केरल, राजस्थान, गोवा जैसे लोकप्रिय स्थलोपर पर्यटको का जमावडा दिखता था। हिल स्टेशन भर जाते थे। वे इस विमुद्रीकरण की वजह से कम हो गये भारत मे आनेवाले आंतरराष्ट्रीय पर्यटको की बुकींग मे भी तेज गिरावट आ गयी थी। वस्तुत: पर्यटन के दौरान सैलानियो की बडी मात्रा मे छोटी नगद की आवश्यकता होती है। किंतु विमुद्रीकरण के कारण छोटी मुद्राओ की किल्लत हुई। ऐसे मे विदेशी पर्यटको को भारत के नजदिकी पर्यटन गंतव्य जैसे की सिंगापूर और थाईलंड जैसे अन्य दक्षिण आशियाई देशो मे पर्यटन सुविधाजनक प्रतित हुआ। भारत का दौरा विदेशी पर्यटकोव्दारा रद्द किया गया। परिणाम स्वरुप देश का पर्यटन उद्योग मंदी के चपेट मे आ गया।

### निष्कर्ष

१) सरकारने जाली नोट और कालेधन को लगाम लगाने के लीए विमुद्रीकरण किया। किंतु यह दोनो भी काम नही हो सकते। क्योकी कालेधन का बडा हिस्सा कहीना कही लगाया जाता है, उसका सर्क्युलेशन होता रहता है। इसलिए विमुद्रीकरण से कालाधन खत्म नही होता।

२) लोग अनेकप्रकार से कालाधन सफेद करने के अनेक तरिके निकाले है, उससे जो हिस्सा मिलना चाहीए वो सरकारको नही मिलेगा और अर्थव्यवस्था का नुकसान होगा।

३) देश मे ३५% लोग गैरसंघटीत क्षेत्र मे है

Principal Bhartiya Mahavidyalaya Morshi

2017-18 111

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

Volume-VII, Issue-I, Part - I
January - March - 2018

IMPACT FACTOR / INDEXING
2017 - 5.2
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Bhartiya Mahavidyalaya
Morshi

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | **डॉ. सुनंदा एकनाथराव आहेर** | मोलमजुरी करणाऱ्या महिलांसमोरील समस्या: एक चिकित्सक अभ्यास (संदर्भ बीड शहर) | ७-१२ |
| ४ | **डॉ. अभिजीत वेरुळकर** | आधुनिक काळातील स्त्रियांच्या सामाजिक समस्या | १३-१५ |
| ५ | **प्रा. डॉ. आसाराम पवार** | जी. एस. टी. चा शेती क्षेत्रावर होणारा परिणाम | १६-१८ |
| ६ | **श्रीमती शितल नागनाथ कांबळे** | द. वा. पोतदार व्यक्तित्व आणि विचार | १९-२१ |
| ७ | **नम्रता राधाकृष्ण कुलकर्णी**<br>**डॉ. चिंचोलीकर के.एल.** | औरंगाबाद शहरातील मराठी माध्यमाच्या इ. ५ वी च्या विद्यार्थ्यांचा इंग्रजी श्रवण व भाषण कौशल्य संपादणुकीचा शोध | २२-२४ |
| ८ | **डॉ. अनिल दत्तराम बनकर** | हवा व जल प्रदूषण एक जागतिक समस्या, कारणे व उपाययोजना | २५-२७ |
| ९ | **श्री. शिवाजी हरी चौगुले** | सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वराची गड्डा यात्रा | २८-३० |
| | **HINDI** | | |
| १ | **डॉ. आर. जी. बम्बोले** | विनोबाजी का ब्रम्हचर्य एक अध्ययन | १-४ |
| २ | **दुर्गा प्रसाद सिंह** | मार्कंडेय की कहानियों में भूमि-समस्या | ५-८ |
| ३ | **डॉ. विजयप्रसाद के. अवस्थी** | भारतीय शिक्षा प्रणाली: कल आज और कल | ९-१४ |
| ४ | **इंदिरा रजेसिंग गिरासे**<br>**डॉ. कुमार भुजंगराव कदम** | वीर शिरोमणी, अगम्य साहस और शौर्य का प्रतिक, स्थापत्यकला का जनक – महाराणा कुंभा | १५-१६ |
| ५ | **डॉ. वन्दना चौबे**<br>**अमित गंगानी** | गंगानी परिवार के आधर स्तंभ – पं. कुन्दनलाल गंगानी | १७-१९ |


**'अजिंठा'** या त्रैमासिकात प्रसिध्द झालेली मते मुख्य संपादक, संपादक मंडळ व सल्लागार मंडळास मान्य असतीलच असे नाही. या नियतकालिकात प्रसिध्द करण्यात आलेली लेखकाची मते ही त्याची वैयक्तिक मते आहेत.

तसेच शोधनिबंधाची जबाबदारी स्वत: लेखकावर राहील. हे नियतकालिक मालक मुद्रक प्रकाशक विनय शंकरराव हातोले यांनी अजिंठा कॉम्प्युटर ॲण्ड प्रिंटर्स जयसिंगपूरा विद्यापीठ गेट औरंगाबाद येथे मुद्रित व प्रकाशित केले.

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

AJANTA - VOLUME - VII ISSUE – I - ISSN 2277-5730 (I.F.- 5.2) JANARY-MARCH - 2018

१

# विनोबाजी का ब्रम्हचर्य एक अध्ययन

**डॉ. आर. जी. बम्बोले**
राजनीति विज्ञान विभाग, भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि. अमरावती.

and Nemad (Madhya Pradesh) are at West side. Akola district (Maharashtra) is on South side. The river *Taapi* flows on the border of Maharashtra and Madhya Pradesh from Northeast to West (Junghare S. A., 2008). Melghat is a cluster of 317 villages and has two tribal blocks – 1] Chikhaldara and 2] Dharni, dominantly inhabited by the Korku tribe. Melghat has total area of 3,157 sq. kms. And the forest land covers 2,941 sq. kms. The total population of Melghat is 1,89,600 (Chikhaldara 76,136 and Dharni 1,13,464) and tribal population is 1,43,360 (Chikhaldara 57,798 and Dharni 85,565) which contributes 75.6 per cent of the total population *(Mohite, 2002).*

**Statement of Problem**

**The government having multiple schemes for tribal development but due to failure of effective implementation of the programme like PDS, ICDS, and NRHM are not meeting to the expectations.**

Agricultural shift in traditional food grains to commercial cropping pattern and natural farming to conventional farming lay down the *Adivasis* food culture. It's difficult for hard working tribal people to recover 2400 calories in a day. Government has food programme (PDS also known as FPS) but it has unsatisfactory work. Government provides 35 kg food per month to a BPL family. In Melghat, in a tribal family on an average 6 to 8 people lives. If it divides by mean 7, only 5 kg food comes per head in a month. Dividing 30 days by 6 kg, per head will get near about 150 grams food per day. How to live healthy with 150 gram food?

**Objective of the Study**

To study the malnutrition among children up to Six years of age in the context of livelihood challenges.

**Methodology**

The research paper is purely based on secondary data sources. The data retrieved from government websites, various departments of the State government and the library sources. The study focuses on two villages of Melghat, Dhakana (Chikhaldara Tehsil) and Zillangpati (Dharani Tehsil) which comes under Bijudhawadi Public Health Centre (PHC).

**Results and discussion**

The following inferences reflect on child feeding practices and child malnutrition existed in Melghat (Ganorkar, 2015).

1. *Feeding formula to child after birth:* Forty percent respondents given Jaggery water to a baby after birth. Twenty five percent respondents given milk which is other than breast. Twenty percent given honey. It is also found in study that ten percent has given janam ghutti and two percent given infant formula. Only three percent not has given no thing to a child after his birth.
2. *Reasons to stop breastfeeding:* The column chart focuses on breastfeeding and the reasons to stop the breastfeeding. 37.5 percent respondents stopped breastfeeding because of Mother goes to work outside and children stays at home and stopped due to complementary feeding age. 9.4 percent responded due to pregnancy they stopped breastfeeding. Also 3.1 percent respondents stopped due to mother's sickness or weakness, child's sickness or weakness, breast problems, no enough milk, and any other reasons respectively.
3. *Child Malnutrition:* As per the data, within last two years 97 percent children hospitalized. The reasons of hospitalization are as following column chart. 33.3. percent children hospitalized from last two years due to under nutrition. 28.2 percent children suffered by diarrhea. 17.9 percent due to high fever. 15.4 percent hospitalized because of pneumonia. And 2.6 percent admitted because of accident / injury and other reasons respectively.
4. *Children admitted for Under-Nutritional treatment:* The ratio of malnutrition child admitted in NRC is very high. It is 67 percent. As per the record July, 2014 of Nutritional Rehabilitation Centre, District Civil Hospital, Amravati total 64 scheduled tribe patients admitted in Dharni NRC. The data received from 'Report of Children from CTC Centre SDH and RH district Amravati of the month April to August, 2014 – Total SAM / MAM children are 197. Out of it total tribal children are 31 (Rural Hospital, Chikhaldara – 20 and Rural Hospital, Churni – 11). The data from CTC Centre SDH and RH Amravati District shows; from April, 2013 to March, 2014 total 44 SAM / MAM tribal children admitted and Non-tribal are 153.
5. *Percentage of children suffered from diseases:* 33.3 percent children are under-nutrate. 28.2 percent suffered by Diarrhea. 17.9 percent child suffered by high fever and 15.4 percent suffered by Pneumonia. Similarly, 2.6 percent child loosed their heath due to accident and other causes. The data received from District Hospital, Amravati, reveals about Dharni and Chikhaldara Block diseases and people suffered from week 1 to 52 – 2013. The following table reflects the people suffered from the diseases.



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

| Sr. No | Disease | Dharni | Chikhaldara |
|---|---|---|---|
| 1 | Malaria | 313 | 82 |
| 2 | Acute Diarrhoeal Disease (including acute gastroenteritis) | 1468 | 1629 |
| 3 | Bacillary Dysentery | 977 | 478 |
| 4 | Enteric Fever | 2522 | 246 |
| 5 | Fever of Unknown Origin (PUO) | 1805 | 3239 |
| 6 | Pneumonia | 616 | 250 |
| 7 | Dog Bite | 184 | 14 |
| 8 | Snake Bite | 332 | 84 |
| 9 | Fever < 7 days (Only Fever) | 10,925 | 4,043 |
| 10 | Cough with or without fever (< 3 weeks) | 1426 | 1127 |
| 11 | Loose watery stool < 2 weeks (with blood) | 3,360 | 86 |

(*Source:* District Hospital, Amravati.)

6. *Under nutritional treatment received*: The maximum respondents received the treatment from PHC. The percentage of under nutritional treatment received at PHC is 61.5. The chart also shows that still 25.6 percent respondents received treatment from other sources; means the treatment from local traditional doctors, Bhumka or Padihar do the under nutritional treatment and the community have a faith on.

7. *Nutritional Status of Children*:

| | Mean | Std. Deviation |
|---|---|---|
| Birth weight of child [in Grams] | 2115.3846 | 237.81053 |
| BMI | | |
| | 14.4329 | 2.81422 |

The above table reveals fact about nutritional status of children. According to World Health Organization terms any newborn weighing less than 2.5 kg as a Low Birth Weight baby. Here the data shows the mean is 2115.3846 which shows that new born baby are Low Birth Weight.

As per the WHO instructions, the category of BMI range less than 15 is considered as Very Severely Underweight. The responded data reveals that all children are Very Severely Underweight. It shows the sever existence of malnutrition in the community.

**Conclusion**

No adequate land and exclusion from basic facilities enhances life challenge of innocent tribals inhabited in Melghat. Unavailability of livelihood alternatives and inefficient government programmes like Public Distribution Schemes made sorrowful life of Korku community due to which the ANC and PNC mothers suffered from food security it causes to their health and children became malnutrite.

**Bibliography**

Ajit K. Singh., G. P. (1998). *Forest and Tribals in India.* New Delhi: Classical Publishing Company.

Bhatia, A. (2002). *Malnutrition Related Deaths of Tribal Children in Nandurbar District of Maharashtra State, TR & TI, Pune.* Pune.

Clark, T. (1991). Malnutrition. *Public Health Reports, 36*(17), 923 - 930.

Datar., &. K. (2002). *Status of Tribal Women in Maharashtra, TISS, Bombay.*

Deogaonkar, S. (1990). *The Korku Tribals.* Delhi: Publishing Company.

Ganorkar, N.V. (2015). Forest Act, Livelihood Issues and Malnutrition: A Study of Korku Tribe in Melghat, TISS, Mumbai.

Junghare, S. A. (2008). *Amravati Zillyatil Melghatatil Aathawadi Bazaranche Jale Pranaliche Bhogolik Vishleshan.* Amravati: Amravati University.

Kavita, S. Richard, L. Keith, S. (2006). Women's Empowerment and Domestic Violence: The Role of Socio-Cultural Determinants in Maternal and Child Under nutrition in Tribal and Rural Communities in South India. Food and Nutrition Bulletin. Vol.27, no.2. The United Nations University.

Maharashta, G. O. (2006). Functional Review of the Maharashtra State Departments Detailed Report - III. Tribal Development, Government of Maharashtra.



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

Mats, M. Dinh, T. Sarah, T. (2012). Causes and Determinants of inequity in Maternal and Child Health in Vietnam. BMC Public Health.

*Melghat Tiger Reserve*. (n.d.). Retrieved February 11, 2015, from http://melghattiger.gov.in/

Sapkal, M. (2007-08). *A Geographical Study on Nutritional Status in Chikhaldara Tahsil.* Amravati: Sant Gadge Baba Amravati University.

Vella, V. Tomkins,A. Borghesi,A. Migliori, G.B. Adriko, B.C. Crevatin,E. (1992). Determinants of Child Nutrition and Mortality in North-West Uganda. Bulletin of the World Health Organization, 70(5): 637-643. WHO.

**List of Web sites / Web Links**

- http://www.fao.org/docrep/field/003/ab470e/ab470e06.htm
- http://www.innerbody.com/nutrition/micronutrients
- http://www.fao.org/hunger/en/
- http://epaper3.esakal.com/26Dec2014/Enlarge/PuneCity/page8.htm
- http://www.worldometers.info/world-population/
- http://www.fao.org/hunger/en/
- http://www.fao.org/docrep/field/003/ab470e/ab470e06.htm
- http://www.who.int/nutrition/topics/WHO_FAO_ICN2_videos_malnutrition/en/



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

Special Issue, January 2018
International Multilingual Research Journal
Vidyawarta®
MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318



Organised by :

Shri Shivaji Education Society, Amravti's

# Dhanwate National College

Congress Nagar, Nagpur-440012 (Maharashtra)

College with Potential for Exellence, the status by UGC, New Delhi

Accredited 'A' Grade, CGPA 3.25 by NAAC

Center of Higher Learning and Research, Institutional Member of APQN, Shanghai

## Development of Smart City : Impact and Transformation due to Urbanization

Convenor
**Dr.Kalpana Deshmukh**

MAHARASHTRA BHUGOLSHSTRA PARISHAD'S

*35th Annual International Conference*

44

# नागपूर महानगराचे झाल्लर क्षेत्र

मुकेश खारकर
भूगोल विभाग,
धनवटे नॅशनल कॉलेज,महाविद्यालय,नागपूर

सावन देशमुख
भूगोल विभाग,
भारतीय,मोर्शी, जिल्हा अमरावती

**सारांश**

महानगराच्या सभोवताल ग्रामीण जमीनीवर अतिक्रमण करून शहरा सभोवताल असे क्षेत्र निर्माण होते की जेथे नागरी व ग्रामीण जिवनशैलीची सरमीसळ झालेली दिसुन येते. ग्रामीणा भागातून शहराकडे स्थलांतरील झालेला लोकसमुह व शहरातील जडउद्योग तर काही प्रदेश टाउनशिप साठी वापरल्या जातो. शहरी जीवनाला कंटाळुन उच्चभू शहरातील काही लोक समुह शहराबाहेर अशा जागेत मोठे निवासथान बांधुन निवास करतांना दिसतात. वैशिष्टयपूर्ण निर्माण झालेल्या या प्रदेशास अनेक भूगोल तज्ञांनी वेगवेगळी नावे दिली असली तरी महानगराचे झाल्लर क्षेत्र म्हणून हा भाग ओळखला जातो. या दृष्टीकोणातून नागपूर महानराच्या क्षाल्लर क्षेत्राचा अभ्यास व सिमांकण या शोध निबंधातुन केला आहे.

**बिज संज्ञा:** ग्रामीण, नागरी, सिमांकन पट्टा, संक्रमन पट्टा, झाल्लर क्षेत्र

**प्रस्तावना**

ग्रामीन—नागरी झाल्लर क्षेत्र (Rural – Urban Fringe) हे दोन शब्द आधिग्रहीत क्षेत्रास सुचवितात ज्याचे स्वरूप भिन्न असते. तसेच हे क्षेत्र म्हणजे नागरी भागास ग्रामिण क्षेत्रापासून वेगळे करणारा सक्रमण पट्टा आहे.नगर प्रशासन नियोजनात महानगरासभोवताल पसरलेल्या या झाल्लर क्षेत्राचे नियोजन महत्वपूर्ण आहे. नागरीकरण प्रकियेत नगराच्या आकारात वृध्दी होते ही वृध्दी नागरी सीमांच्या बाहेर व प्रमुख महामार्गाच्या किनारी भागात, दुर्तफा पसरत जाते. या पट्टयात अनेक सेवा सुविधाचा अभाव असतो. येथील सामाजिक व आर्थिक सरचना व भूमी उपयोजन नगरापेक्षा वेगळे असते. अनेक समस्यांचा येथे उद्भव होतो. हा प्रदेश शहराचे झाल्लर क्षेत्र म्हणून ओळखल्या जातो अशा प्रदशाचे सिमांकन करण्याचा प्रयत्न एखाद्या नगरासभोवताल असे सिमांकन करण्याचा प्रयत्न वेहरवीन १७४२ मध्ये नगराचे लोकसंख्या घनत्वाचे आधारावर सिमा निर्धारण केले. मुखर्जी १९७३ कोलकाता येथील भुगोल पत्रिकेत एक लेख लिहला. सिन्हा १९८० परत महानगराचे झाल्लर क्षेत्रास दोन भागात विभागले. या संशोधनाचा आधार घेवुण नागपूर महानगराचे झाल्लर क्षेत्र सिमांकण या शोध निबंधात केले आहे.

**अभ्यास पद्धती :**

प्राथमिक व द्वितीय स्तरावरील आकडेवारी संकलित करुन टक्केवारीच्या आधारे सिमांकण मुल्य निश्चित केले. नगरासाठी ६० टक्के हे मुल्य निर्धारित करुन ग्रामिणसाठी ४० टक्के मुल्या सिमांकणासाठी निश्चित केले. प्रत्येक गमकाचे आधारे नकाशे तयार करुन त्यात गमकाचे सिमांकन करुन हे नकाशे अभ्यारोपीत केले. जेथे ३ गमकांपेक्षा जास्त गमके एकत्रित येतात ती स्थाने नकाशावर सममान मुल्य पद्धतीने जोडून सिमांकण केले.

**उद्दिष्ट :**

१) पूर्व अभ्यासाचा आधार घेवून गमक निश्चित करणे.

२) गमकाच्या मुल्य निश्चितीच्या आधारावर महानगराचे इयाल्लर क्षेत्र निश्चित करणे.

३) झालर प्रदेशाची वैशिष्टे व समस्याचे अध्ययन करणे

**अभ्यास प्रदेश:**

नागपूर महानगर हे भारताचे मध्यवर्ती ठिकाण असून २०—३० ते २१ ४५ अक्षवृत्त व ७८ १५ पूर्व ते ७९ ४५ पूर्व रेखावश्त रेखावृत्ताच्या दरम्यान वसले असून येथील नागरी लोकसंख्या २०११ जनगणनेनुसार

२४,०५,६६५ इतकी आहे. १७०० ते २००० या कालखंडात नागपूर शहराची क्षेत्रफळ वृद्धी होवून नगराचा आकार वाढत गेला तसेच लोकसंख्या वृद्धीही होत गेली. तसेच आर्थिक क्रियाचा विकास होत गेला. म्हणजेच नागपूर शहरात नागरीकरणाची प्रक्रिया होण्यास सुरुवात झाली. अशी हि नगरे सांस्कृतिक विकासाची केंद्रे म्हणून ओळखल्या जाऊ लागली. त्यामुळे लोकांना शहराचे आकर्षण वाटले व स्थलांतरीत होऊन शहरात स्थिरावले. वाढती लोकसंख्या व उद्योगधंदे यामुळे शहरातून गर्दी होवू लागली व शहर सिमेबाहेर विस्तारु लागले.

खालील तक्त्यात महानगरतील लोकसंख्या व क्षेत्रफळ वृद्धी व लोकसंख्येची घनता या वैशिष्टयावरुन महानगराची वृद्धी लक्षात येते

**नागपूर महानगराची क्षेत्रफळ वृद्धी**

| अ.क्र. | वर्ष | क्षेत्रविस्तार | वृद्धी |
|---|---|---|---|
| १ | १७०० | २.३ | – |
| २ | १८०० | ११.८ | ९.५ |
| ३ | १८५० | १३.४२ | १.६२ |
| ४ | १९०० | ५७.३९ | ४३.९७ |
| ५ | १९५० | ९४.२६ | ३६.८७ |
| ६ | १९६१ | १७७.११ | ८२.८५ |
| ७ | २००० | २१७.५६ | ४०.४५ |

स्त्रोत: जनगणना पुस्तिका, महाराष्ट्र व नागपूर जिल्हा

१७०० मध्ये नागपूरचे क्षेत्रफळ २.३ चौ. किमी. इतके असून २००० मध्ये २१७.५६ चौ. किमी. इतके क्षेत्र विस्तारले म्हणजेच २००० मध्ये क्षेत्रफळात ४०. ४५ चौ. किमी. इतकी वृद्धी झाली.

**नागपूर शहर लोकसंख्या वाढ (१९०१—२००१)**

| वर्ष | नागपूर शहराची लोकसंख्या | | |
|---|---|---|---|
| | लोकसंख्या | लोकसंख्येतील वाढ / घट | टक्केवारी |
| १९०१ | १२७७३४ | ० | ० |
| १९११ | १०१४१५ | –२६३१९ | –२०.६ |
| १९२१ | १४५१९६ | ४३७७८ | ४३.१७ |
| १९३१ | २१५१६५ | ६६९६९ | ४८.१९ |
| १९४१ | ३०१९५७ | ८६७९१ | ४०.३४ |
| १९५१ | ४४९०९९ | १८७१४३ | ४८.७३ |
| १९६१ | ६४३६५९ | १९४५६० | ४३.३२ |
| १९७१ | ८६९९४४ | २२२४८५ | ३४.५६ |
| १९८१ | १२१५४२५ | ३४१२८१ | ४०.३२ |
| १९९१ | १६२४७६२ | ४०९३३७ | २५.२९ |
| २००१ | २०५१३२० | ४२६५५८ | २०.७९ |

**स्त्रोत:** जनगणना पुस्तिका, महाराष्ट्र व नागपूर जिल्हा

वरील संकलित आकडेवारी वरुन लोकसंख्येतील वश्द्धी दर लक्षात येते १९०१ मध्ये नगराची एकूण लोखसंख्या १२७७३४ तर २००१ मध्ये २०५१३२० इतकी म्हणजेच लोकसंख्यत २०.७९ टक्के वाढली. पण त्या तुलनेत सेवा व सुविधांमध्ये वाढ होत गेली असली तरी लोकसंख्या वश्द्धीच्या तुलनेत सेवा व सुविधा कमी प्रमाणात उपलब्ध करुन देता.

**नागरिकरणाची प्रक्रिया :**

महानगरात लोकसंख्या आकार व आर्थिक क्रियांच्या परिणामामुळे महानगरातील भुमिउपयोजन बदलले. इमारत बांधणी, रस्तेमार्ग, उद्योगधंदे या खालील क्षेत्रात वाढ झाली. जागेच्या किमंती शहरात वाढू लागल्या. त्यामुळे शहराबाहेर कमी मुल्य असल्याने अनेक जड उद्योग – शहरात काम करण्यास येणारे स्थलांतरीत लोकसमुह, शहराबाहेर व शहरासभोतालच्या बाहेरील जागेत स्थिरावत गेला व शहराचा क्षेत्र विस्तार वाढत गेला. पण त्याप्रमाणात मात्र सेवा सुविधा मात्र उपलब्ध होवू शकल्या नाही. त्यामुळे आगळवेगळे वैशिष्ट असलेला शहर व ग्रामिण जीवन शैली सरमिसळ असलेला संक्रमण पट्टा उदयास आलेला दिसतो. कलकत्ता, मुंबई, दिल्ली अशा महानगरांच्या सभोवतालही ही संक्रमण पट्टा दिसून यतो (न्तइंद.त्नतंस ) याला झालर क्षेत्र असे म्हणतात.

**नागपूर महानगराच्या झालर क्षेत्राचे सीमांकन**

नागपूर महानगराचे झालरक्षेत्र निश्चित करण्यास पुढील गमके विचारात घेतली आहेत.

१) जमिन उपयोग

अ. बांधणीखालील क्षेत्र,

ब. पडीत क्षेत्र,

क. कश्षी क्षेत्र

२) जमिनीचे मूल्य

अ. १९९१ सालचे जमिन मूल्य

ब. २००१ सालचे जमिन मूल्य

क. ९१ – २००१ दरम्यान जमिन मूल्यात

झालेली वश्ष्टी

३) लोकसंख्या

अ. घनता

ब. लोकसंख्येतील वाढ

क. लिंगप्रमाण

ड. द्वितीय व तश्तीय कामगराची संख्या

इ. साक्षरता

४) सामाजिक जीवनषैली

अ. सामाजिक सुविधा

ब. वैयक्तिक जीवनषैली

क. शहरात दैनंदिन ये जा लोक

**नागपूर महानगराचे एकूण किंवा संयुक्त झालर क्षेत्र**

वेगवेगळे चल किंवा गमक वापरून त्यांच्या आधारे अंतर्गत व बाहय झालर क्षेत्र निश्चित केले आहे. नागपूर महानगराचे एकूण किंवा संयुक्त झालर क्षेत्र निश्चित करण्याकरिता हे सर्व नकाशे एकमेकांवर अध्यारोपित केले व त्यावरून संयुक्त झालर क्षेत्राची अंतर्गत व बाहय सीमा निश्चित केली आहे. हे सीमांकन करीत असतांना हे स्थानिक मूल्य विचारात घेऊन सीमा ठरविली आहे. अंतर्गत झालर क्षेत्र व बाहय झालर क्षेत्र सिमांकीत करतांना ३ गमकांच्या रेषा जेथे एकत्र येतात त्या स्थानाचा विचार अंतर्गत व बाहय झालर क्षेत्र सीमांकित करण्यास केला आहे. या सीमांचे अध्यारोपन केले आहे.

**नागपूर महानगर इयाल्लर क्षेत्रास प्रभावित करणारे घटक :**

१) नगराचे झालर क्षेत्र विखंडीत पट्टयाच्या स्वरुपात असून भुपश्ट रचना, नदयांचे प्रवाह व महानगरातुन गेलेले रस्ते यांच्या प्रभाव इयाल्लर क्षेत्रावर दिसून येतो

२) झालर क्षेत्राचा विस्तार व आकारावर शहरातुन जाणारे मुख्य रस्ते व रेल्वे मार्गाचा प्रभाव दिसतो.

३) शहर भागातुन ग्रामिण भागाकडे जिवनशैली बदलत जावून हळूहळू शहराचा प्रभाव कमी होतो.

**नागपूर महानगर झालर क्षेत्राची वैशिष्टे :**

महानगराचे झालर क्षेत्र एकूण २२४७.७१ चौ.किमी. इतके असून यात अंतर्गत नागरी झालर क्षेत्राचा विस्तार ५६३.७१ चौ.किमी. तर बाहय क्षेत्राचा विस्तार १६८३.९८ चौ. कि. मी इतके आहे. झालर क्षेत्रात शहर गटात मावनेर, कळमेश्वर या शहरांचा व अन्य सात जनगणना मान्यता शहरांचा समावेश होतो. या शहरात ५९८ गावे समाविश्ट असुन २२३ हि अंर्तगत झालर क्षेत्रात तर ८७५ खेडी बाहय झालर क्षेत्रात आहे.

इयाल्लर क्षेत्रात एकूण लोकसंख्या १०,३०,१६९ (१९९१) इतकी असुन यापैकी अंतर्गत झालर क्षेत्रात १४२६५९ तर बाहय झालर क्षेत्रात ३४३८८१ इतकी लोकसंख्या वास्तव्यास आहे. झालर क्षेत्रातील अंर्तगत व बाहय क्षेत्र लोकसंख्या व विस्तार या दश्टीने वाढले असले तरी नागरी सेवा–सुविधाबाबत मात्र विकसित झाले नाही आणि म्हणूनच या झालर क्षेत्रातून अनेक समस्या घेवून हे क्षेत्र निर्माण झाले आहे.

**झालर क्षेत्रातील समस्या :**

१) लोकसंख्यात्मक वैशिष्टे पाहता साक्षरता, लोकसंख्येचा आर्थिक स्तर कमी आढळतो.

२) झालर क्षेत्रात असंबध आकारात अनियोजित असे घरे व उद्योग विकसित झालेले आढळतात

३) झालर क्षेत्रात सेवासुविधेचा अभाव असल्याने सांडपाणी, पिण्याचे पाणी, विद्युत व्यवस्था , कच्चे रस्ते, अस्वच्छ परिसर हया समस्यामुळे येथील लोक ग्रस्त आहे

**निष्कर्ष :**

शहरनियोजन आराखडा तयार करतांना प्रक्षेपित शहर लोकसंख्या वाढ व शहर विस्तार लक्षात घेऊन या प्रदेशातही नियोजन आराखडा तयार करुन अशा क्षेत्रीय विस्तारासंदर्भात प्रशासनाने काही निधी राखून इयाल्लर क्षेत्राचा विकास करणे गरजेचे आहे. तसेच शहरा सभोवताल शहरासारखी छोटी शहरे विकसित केल्यास इयाल्लर क्षेत्रात वास्तव्यास असणारी लोकसंख्या कमी करता येईल.

संदर्भ :

· Abercrombie, S.P. (1961): Town and Country Planning, London, Oxford University

43) शहरीकरण : पर्यावरण व मानवी आरोग्य
प्रा. सुभाष आर. गोंडाणे , भंडारा || 163

44) नागपूर महानगराचे झाल्लर क्षेत्र
मुकेश खारकर ,सावन देशमुख || 165

45) बीड शहरातील पूर प्रवण क्षेत्राचे भौगोलिक विश्लेषण आणि शाश्वत जल व्यवस्थापन'
प्रा. प्रकाश आर. कोंका', प्रा. शिवाजी एम मोरे'. || 168

International Multilingual Research Journal

Printing Area

9850203295 7588057695

Editor Dr.Bapu G.Gholap


VOL-06
Special Issue March 2018
Vidyawarta®
International Multilingual Research Journal
Chief Editor
Prof. Virag Gawande
Published By
Aadhar Social Research Development Training Institute, Amravati.

होणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष देण्यात यावे.

२. मेळघाट वन परिक्षेत्रातील खुल्या जागांवर तसेच रस्त्यांच्या दुतर्फेस मोठ्या प्रमाणात वृक्षांची लागवड करण्यात यावी तसेच त्यांचे संवर्धन करण्यात यावे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. डॉ. पाटील वाय. डी. व इतर (२०१४), पर्यावरण अभ्यास, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे.

२. डॉ.घारपूरे विठ्ठल (२००५), पर्यावरणशास्त्र, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर

३. डॉ.घारपूरे विठ्ठल (२००५), जैविक भूगोलशास्त्र, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर

४. डॉ. प्रादिपकुमार (२००७), जीव भूगोल, डिस्कवरी पब्लिकेशन हाऊस, नई दिल्ली

५. डॉ. अग्रवाल लक्ष्मीचंद (२००७), जैव भूगोल, रोहिणी बुक्स, जयपूर

६. डॉ. देशमुख सावन एम्. (२०१५), अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिक्षेत्रातील जैवविविधतेचा भौगोलिक अभ्यास, अप्रकाशित पीएच्. डी. शोध प्रबंध, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

७. http/www.conservation.org

❑❑❑

**10**

# २१ वे शतक – राष्ट्रविकासात स्त्रियांचे योगदान

प्रा.राजेंद्र कोरडे
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
कला व वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकाल

**********

स्त्री शिक्षण, स्त्रियांमधील जागृती तसेच देशाच्या स्वातंत्र लढ्याच्या निमित्ताने घराबाहेर पडलेली भारतीय स्त्री आज सर्वच क्षेत्रांमध्ये सर्वोच्च स्थान मिळविण्याच्या प्रयत्नात आहे. याच पार्श्वभूमीवर २१ व्या शतकात तिचे भारतीय विकासातील नेमके स्थान काय असेल, याचा वेध घेताना असे लक्षात आले की, १९ वे शतक हे स्त्रियांना कुटुंबात स्थान व प्रतिष्ठा मिळवून देण्यात खर्ची पडले. या शतकाच्या प्रारंभी ज्योतिबा फुले, महर्षी कर्वे, आगरकर आदीपुरूषांनी स्त्री सुधारणा व स्त्री उन्नतीसाठी अथक प्रयत्न केले. त्यांच्या कष्टप्रद प्रयत्नातून स्त्रियांना आत्मबळ प्रकट करण्याची शक्ती प्राप्त होवून कर्तृत्व सिध्द करण्याची संधी त्यांना मिळाली. त्यामुळे २० व्या शतकात स्त्रीचं कुटुंबातील आणि पर्यायाने समाजातील स्थान उंचावले.

२१ व्या शतकात कुटुंब विकास, समाज विकास आणि राष्ट्र विकासाच्या दिशेने स्त्रियांची वाटचाल सुरू झाली. औद्योगिक, वैद्यकीय, अभियांत्रिकी, संगणक, माहिती तंत्रज्ञान, पत्रकारिता, लष्करी सेवा, कायदा व सुव्यवस्था, विमानसेवा, रेल्वे–मोटार चालक, माऊंट एव्हरेस्टसारख्या शिखरावर चढाई, उच्च शिक्षण, सांस्कृतिक क्षेत्र तसेच क्रिडा क्षेत्रातील जलतर, वेट लिफटींग, ॲथेलेटिक्स, नेमबाजी, बॉक्सिंग यासारख्या पुरूषी मक्तेदारी मानल्या गेलेल्या क्षेत्रात. कोणत्याही प्रकारचे आरक्षण, सवलत न मागता शिक्षण आणि बुध्दिमत्तेच्या जोरावर स्त्रियांनी आपल्या दमदार पाऊलखुणा उमटवल्या आहेत आणि स्त्री ही कुठल्याही क्षेत्रात कर्तृत्वाने आणि क्षमतेने कमी नसल्याचे सिध्द केले आहे. ऑल्विन ऑफलर म्हणतो, 'करिअरिस्ट स्त्री जेव्हा नोकरीत उच्च पदस्थाने पद प्राप्त करते, तेव्हा

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

## || Index ||


01) जागतिकीकरणाचा ग्रामिण मराठी भाषेवरील प्रभाव.
**प्रा. अनिल जा. दौलतकार** || 22

02) जागतिकीकरणाचा माहिती व संपर्क तंत्रज्ञान क्षेत्रावर पडणाऱ्या.....
**प्राचार्य. देवेंद्रकुमार कृष्णकुमार रंभाड** || 25

03) ओझोनचा क्षय जागतिक तापमान वाढीचा गंभीर परीणाम
**प्रा.डॉ.सौ. अरुणा प्र. पाटील** ||27

04) "आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये समाजसुधारकाचे योगदान"
**प्रा.सुजाता आर नाईक (गवई), जि.यवतमाळ** || 29

05) ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचे योगदान
**प्रा. डॉ. दिलीप का. खुपसे** || 32

06) जागतिकीकरण आणि व्यवसाय क्षेत्रातील आधुनिक प्रवाह
**डॉ. किरण नेरकर** || 35

07) सामाजिक स्त्री प्रतिमा आणि आजच्या स्त्रिचा आहार आरोग्य एक अभ्यास !
**प्रा. रंजना एच. जिवने, पुसद** || 38

08) पश्चिम विदर्भातील लघुउद्योजकांच्या विकासाचे विश्लेषणात्मक अध्ययन
**डॉ. प्रा. राजेंद्र मेघराज तातेड** || 41

09) "अमरावती जिल्हयतील मेळघाट परिक्षेत्रातील जैवविविधतेचे .....
**प्रा. डॉ. सावन मा. देशमुख** || 44

10) २१ वे शतक – राष्ट्रविकासात स्त्रियांचे योगदान
**प्रा.राजेंद्र कोरडे, वरवट बकाल** || 49

11) जागतिक युगक्रांतीची आंबेडकरी कविता
**प्रा. डॉ. विश्वजीत कांबळे, जि. यवतमाळ** || 52

12) जागतिकीकरणाच्या शेती क्षेत्रावर पडलेल्या परिणामाचे अध्ययन
**प्राचार्य. मुरलीधर रावजी पवार** || 56

३. कुलश्रेष्ठ आर. एस., औद्योगिक अर्थशास्त्र, सा भवन, प. आगरा, २००५.

४. वर्मा पी. के., भारतातील औद्योगिक विकास, दीप ॲण्ड दीप प्रकाशन, दिल्ली, १९८९.

५. तरुण व्ही. एन., स्माल स्केल इंडस्ट्रीज ॲण्ड इंडियाज इकॉनॉमिक डेव्हलपमेंट, दीप ॲण्ड दीप प्रकाशन, दिल्ली, १९८९.

६. तातेड राजेंद्र, पश्चिम विदर्भातील ग्रामीण विकासात लघुउद्योगांच्या योगदानाचे विश्लेषणात्मक अध्ययन (इ.स. २००० ते २०१०), अप्रकाशित शोधप्रबंध, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

❑❑❑

09

# "अमरावती जिल्हयतील मेळघाट परिक्षेत्रातील जैवविविधतेचे भौगोलिक विश्लेषण"

**प्रा. डॉ. सावन मा. देशमुख**
भूगोल विभाग प्रमुख, भारतीय महाविद्यालय, मोर्शी

**सारांश**

पृथ्वीला वैभवशाली नैसर्गिक विविधतेची देणगी मिळालेली असुन यात विविध वनस्पती, प्राणी, जीव जंतू तसेच हवा, पाणी, माती, पर्वत, नद्या, सरोवर, सागर, महासागर इत्यादी घटक आढळतात. पश्थ्वीवर जे विविध घटक आढळतात त्या सर्वांना जैविक घटक असे म्हणतात.जैविक घटकात प्रामुख्याने प्राणी, वनस्पती, जीवजंतू त्याच प्रमाणे मानव यांचा समावेश होतो. सर्व सजीवांचे आकार – प्रकार, संरचना इत्यादीमध्ये विविधता असून या सर्वाचा अभ्यास जैव भूगोलात करण्यात येतो.

मानवाच्या प्राथमिक गरजा या पृथ्वीवरील अप्रत्यक्षरित्या जैवविविधतेशी निगडीत असतात. वन परिसंस्थेवर अवलंबून राहणाऱ्या आदिवासी जमातींना जैवविविधतेचे अस्तित्व अत्यंत आवश्यक आहे. कारण त्यांच्या गरजा वनांमधील संपदांवर आधारित असतात. नैसर्गिक पर्यावरणातील परिसंस्थेच्या प्रक्रिया टिकवून ठेवण्याकरीता जैवविविधतेचे अस्तित्व आवश्यक आहे, म्हणून मानवी जीवन सुखी व संपन्न करण्याकरीता जैवविविधतेचे संरक्षण करणे महत्वाचे आहे.

**बीजसंज्ञा** जैवविविधता, परिसंस्था, विचरण, वनसंवर्धन, जैवविविधतेचा ऱ्हास.

**प्रस्तावना**

पृथ्वीवरील निसर्ग म्हणजे बहुमोल अशी देणगी होय. निसर्ग हा सर्व सजीवांच्या दृष्टीने बहूमुल्य आहे.

या भूतलावर अनेक प्रकारचे जीवन आढळून येते. यालाच जैविक किंवा जैवविविधता असे म्हणतात. जैवविविधता ही आपल्या वैभवशाली जीवनाला निसर्गाने दिलेली अनुपम भेट आहे. पृथ्वीवरील हिरवीगार वने, विविध प्रकारचे प्राणी, जीवजंतु, माती, पाणी, पर्वत, पठार, मैदाने, नद्या, झरे, सरोवर, सागर, धबधबे इत्यादी सर्व निसर्गाची देन आहे. हे सर्व निसर्गाचे उपहार असून ते मानवी जीवनाच्या अस्तित्वाकरीता व मानवी विकासाकरीता अत्यंत आवश्यक आहे व हे सर्व घटक आर्थिक समुहाचे घोतक आहे.

विविधता व बदल हा निसर्गाचा नियम आहे. या नियमाचे सातत्य हे सार्वत्रिक व सर्वकालीन आढळून येते. विविधता व बदलांचे स्वरुप अल्पकाळात व सिमित अभिक्षेत्रात सुद्धा दिसून येतात. बदलाची मात्रा व स्वरुप आपल्या अनुभवात येण्यासाठी व दृश्य स्वरुपात प्रतित होण्याकरीता दिर्घकाळ लोटावा लागतो. तव्दतच व्यापक क्षेत्रात सातत्याने व निरंतर बदल रेखीय किंवा चक्रीय स्वरुपाचे असतात. सजीवांची विविध रुपे व त्यांचे विचरण हे जैवविविधता या संकल्पनेत मोडतात.

जैवविविधतेमध्ये सर्वप्रकारच्या सजीवांचा अभ्यास केला जातो. ज्यामध्ये वनस्पती, पशुपक्षी प्राणी व मानव यांच्या सर्वप्रकारच्या प्रजातींचा अभ्यास केला जातो. परंतु अलिकडच्या काळात वाढत्या लोकसंख्येमुळे मोठ्या प्रमाणात वनस्पती व प्राण्यांच्या प्रजाती वेगाने नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. केवळ वनस्पतींच्या किंवा प्राणी प्रजातीच नष्ट होत नाही तर अलिकडे वनस्पती व प्राण्यांच्या जीवन पद्धतीमध्ये सुद्धा बदल होत आहे. याचे कारण म्हणजे जैव विविधतेचे होणारा ऱ्हास होय. या कारणामुळे जंगलातील वैशिष्ट्यपूर्ण नैसर्गिक वनस्पती कुणे व त्यावर उपजिविका करणारे पशुपक्षी यांचा सुद्धा पर्यायाने ऱ्हास होत आहे. किंवा त्यांची संख्या ओघाने कमी कमी होत आहे. त्यामुळे जे सजीव आहेत, त्या सर्वांचे संरक्षण व त्याच बरोबर संवर्धन करणे महत्वाचे आहे. जैवविविधतेचा ऱ्हास होणे ही पर्यावरणाकरीता फार धोकादायक घटना असून सर्व वन्य सजीवांचे संरक्षण करणे महत्वाचे आहे.

विदर्भातील मेळघाटचे अरण्य हे 'हॉट स्पॉट' म्हणून ओळखल्या जाते. येथे वनस्पती व प्राणी विविधता व्यापक स्वरुपात आहे. मेळघाटातीलजैविक विविधता व तिला आधार देणाऱ्या विविध परिसंस्था असून जैवविविधतेचे समग्र व परिपूर्ण दिग्दर्शन करण्याकरिता शोध निबंधात मेळघाटातील जैवविविधतेचे भौगोलिक विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**शोध निबंधाची वैशिष्टे**

मेळघाट प्रदेशातील नैसर्गिक पर्यावरणात असलेलीजैव विविधता व तिला आधार देणाऱ्या विविध परिसंस्थांचे समग्र व परिपूर्ण दिग्दर्शन होण्यास मदत होईल व पुढील पिढीकरीता वनसंवर्धनाच्या व जैवविविधतेच्या संगोपनाच्या विविध योजना कार्यान्वित होण्यास मदत होईल.

**शोध निबंधाची उद्दिष्टये**

१. जैवविविधता संकल्पना अभ्यासणे.

२. मेळघाट परिक्षेत्रातील जैवविविधतेचे भौगोलिक विश्लेषण करणे.

३. मेळघाट परिक्षेत्रातील जैवविविधता ऱ्हासाच्या प्रमुख कारणांचा आढावा घेणे.

४. मेळघाट परिक्षेत्रातील जैवविविधतेचा ऱ्हास रोखण्याकरीता उपाय सुचविणे.

**गृहितके**

मेळघाट प्रदेशात पर्यावरणीय एकजिनसीपणा तसेच एक प्रकारची पर्यावरणीय परिस्थिती आहे. या वनस्पतींच्या वितरणाच्या विविधतेवर तेथिल पर्यावरणीय घटकांचा परिणाम होतांना आढळतो व अशा पर्यावरणीय परिस्थितीशी समायोजन करून त्या प्रजाती समुहाने राहतांना आढळतात. त्यामुळे तेथिल काही विशिष्ट भागात वेगवेगळी परिस्थितीकी जैवविविधता आढळून येते.

**अभ्यास पद्धती व माहिती संकलन**

प्रस्तूत शोध निबंधाकरीता अमरावती जिल्हयतील मेळघाट परिक्षेत्रातील जैव विविधतेच्या अध्ययनाकरीता नैसर्गिक वनस्पती, प्राणी व मानवी समुदाय यांची प्राथमिक व दुय्यम स्वरुपाची माहिती घेण्यात आलेली आहे. वनातील माहिती करीता जी.पी.एस. तसेच जी. आय.एस या सॉफ्टवेअरचा वापर करुन सांख्यकीय व नकाशा शास्त्रीय पद्धतींच्या सहाय्याने विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

## अभ्यास क्षेत्र

महाराष्ट्राचे प्रमुख सहा प्रशासकीय विभाग असून पश्चिम विदर्भ म्हणून अमरावती प्रशासकीय विभाग ओळखला जातो. या पश्चिम विदर्भामधील अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिक्षेत्राची या संशोधनाकरिता निवड करण्यात आलेली असूनया प्रदेशाचा अक्षवृत्तीय विस्तार हा २०°१४' उत्तर ते २१°४६' उत्तर अक्षांश असून रेखावृत्तीय विस्तार हा ७६°४२' पूर्व ते ७७°३२' पूर्व रेखांशाच्या दरम्यान आहे. या प्रदेशाने अमरावती जिल्ह्याचे सुमारे (जी.आय.एस नुसार) ३९७० चौ.कि.मी. क्षेत्रास व्यापलेले आहे.

प्रस्तुत प्रदेश हा सातपुडा पर्वताच्या गाविलगड रांगेच्या दरम्यान वसलेले असून तो बराच डोंगराळ आहे या प्रदेशाची सरासरी उंची ११०० मीटर असून येथे खोलदऱ्या, सुळके व कडे आढळतात. येथे सर्व साधारणपणे १००० ते २५०० मि.मी. पाऊस पडतो, त्यामुळे येथे दाट जंगल क्षेत्र असल्याचे दिसते. हा प्रदेश डोंगराळ असल्यामुळे थोडा दुर्गम असून वनसंपदेने नटलेला आहे. येथे मोठ्या प्रमाणात जैव विविधता आढळून येते. या जैवविविधतेचा प्रस्तुत संशोधनात अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.



## जैव विविधता

पृथ्वीवरील पर्यावरण ही बहुमुल्य नैसर्गिक देणगी असून येथे अनेक प्रकारचे जीवन आढळून येते, यालाच जैव विविधता असे म्हणतात. भूतलावर अनेक सजीवांच्या प्रजाती असून या सजिवांचे इतरांशी घनिष्ठ नाते असते व त्याव्दारे ते आपले जीवन व्यतीत करीत असतात. ही जैवविविधता निसर्गाचा अमुल्य ठेवा आहे. जैविक भूगोलातील ही व्यापक संकल्पना असून जैव विविधतेसंदर्भातील खालील व्याख्यांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

''विविध परिसंस्थामधील जैविक घटकामधील विविधता व प्रकार म्हणजे जैवविविधता होय''. (पाटील व इतर (२०१४) पृ.क्र. ४८)

विविधता व बदल हा निसर्गाचा नियम आहे या नियमाचे सातत्य हे सार्वत्रिक व सर्वकालीन आढळते विविधता व बदलांचे स्वरुप अल्पकाळात व मिमित अभिक्षेत्रात सुद्धा दिसून येते. बदलाची मात्रा व स्वरुप आपल्या अनुभवात येण्यासाठी व दृश्य स्वरुपात प्रतित होण्यास दिर्घकाळ लोटावा लागतो. तद्वतच व्यापक क्षेत्रात सातत्याने व निरंतर बदल होत गेल्याने आपल्याला त्याची अनुभूती होते. जैवविविधता ही सर्वत्र समान नाही. त्यामुळे सर्वत्र समान जैविक संसाधनांची निर्मिती होत नाही. जैवविविधता प्राथमिक स्वरुपाचे जैविक संसाधन पुरविते की, ज्यामुळे मानवाच्या विविध जिवंत आहेत. त्यामुळेच सजीवांचे मानवी विविध जातींचे वंश परिस्थितीत आढळून येतात. जैवविविधता हे राष्ट्रीय स्वरुपाचे महत्वाचे वैशिष्ट असून तसेच ते मानवी समाज टिकून ठेवणारे संसाधन आहे.

## जैव विविधतेचे मूल्ये

जैवविविधता विविध प्रकारच्या पर्यावरणीय सेवा पुरवितात.व या सेवा जागतिक, राष्ट्रीय व स्थानिक स्तरावरच्या असतात. जैवविविधता ही प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या महत्वाची मानली जाते. म्हणूनच जैवविविधतेचे संरक्षण तसेच संवर्धन केले पाहिजे की, त्यामुळे मानवी जीवनाचा स्तर उच्च प्रतीचा राहण्याकरीता व ते पुर्णत्वास नेण्यास मदत होईल. जैवविविधतेचे मूल्ये मुख्यत: दोन प्रकारची आहेत की, या दोन स्तरावर जैवविविधतेचा अभ्यास केला जातो. ती खालील प्रमाणे आहेत.



वरील प्रमाणे जैव विविधतेचे मूल्ये असून या मूल्यांच्या सोबतच जैव विविधतेच्या स्तरांचे सुद्धा अध्ययन करणे गरजेचे आहे जैवविविधता म्हणजे वेगवेगळ्या सजीवांचा वेगवेगळ्या भागातील सहभाग होय. यात लहान लहान सुक्ष्म जीव, चारपायाचे हिस्त्रपशु आणि प्रचंड उंचीची झाडे तसेच लहान लहान गवत व मानव यांचा समावेश होतो. जैव विविधतेचे प्रामुख्याने पुढील स्तर आढळतात.



जैवविविधता हे एक मुल्यवान नैसर्गिक व अनुवांशिक संसाधन आहे व ती परिस्थितीक तंत्राच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक, धार्मिक व नैतिक मुल्यांचे संरक्षण करते, तसेच जैवविविधता मानवी जीवनात सुद्धा महत्वाची आहे म्हणूनच भूगोलात जैवविविधतेचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

पृथ्वी ही विविध जैविक संपदेने नटलेली आहे. पृथ्वीवर विविध आवासात आढळणाऱ्या जैवविविधतेवर तेथिल वातावरणाचा परिणाम होत असतो. त्यामुळेच जागतिक, राष्ट्रीय व स्थानिक स्तरावरील जैवविविधतेत व त्यांच्या वितरणात बरीच भिन्नता आढळते. या स्थानिक भिन्नतेचा अभ्यास करण्याकरिता प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेण्यात आलेले असून त्या करिता अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिक्षेत्राची निवड करण्यात आलेली असून जैवविविधतेच्या विविध स्तरांपैकी मेळघाट परिक्षेत्रातील परिस्थितीकी जैवविविधता अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**मेळघाट परिक्षेत्रातील परिस्थितीकी जैवविविधता**

मेळघाटातील भ्रमंतीत असे संकेत मिळाले की, मेळघाटहे विविध वनस्पतींचे आगार आहे. मेळघाट चे अरण्य हे प्राणी शास्त्रज्ञांना भूरळ घालते. प्रजातीच्या वितरणात भूपृष्ठक्रम महत्वाचा आहे. तव्दतच उतार, उतारमानाचे स्वरूप व दिशा याला महत्व आहे. भूपृष्ठक्रमाव्दारे भूपृष्ठ स्वरूप, उंची, उताराची दिशा, उताराचा खंड, मातीचे स्वरूप व नदी प्रवाह या घटकांमध्ये विविधता आढळते. प्रजातीच्या अभिक्षेत्रिय वितरणाच्या बाबतीत प्रजाती संख्या, प्रजाती समुह व परिसंस्था संघटन यात विविधता आढळते. २०१० नुसार मेळघाट प्रदेशाच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी जंगलाखालील क्षेत्र हे १७१ चौ.कि.मी असल्याचे आढळते. मात्र या परिक्षेत्रातील जंगलव्याप्त क्षेत्र हे प्रामुख्याने चिखलदरा येथे सर्वाधिक असून धारणी तालुक्यात त्याचे प्रमाण कमी आढळते.

**नकाशा – मेळघाट प्रदेशील जंगलांचे विविध प्रकार व जंगल विरहित क्षेत्र (२०१०)**



मेळघाट प्रदेश हा गाविलगड डोंगर रांगानी व्यापलेला आहे. त्यामुळे या डोंगर उतारावर विविध प्रकारची जंगले आढळतात.मेळघाट प्रदेशातील जैवविविधतेचा अभ्यास करतांना प्रथम येथिल विविध जंगलांचे प्रकार अभ्यासणे व त्यात आढळून येणाऱ्या विविध वनस्पती / वृक्ष यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. या प्रदेशातील जंगलाचे पुढील प्रमाणे वर्गिकरण करण्यात आलेले आहे.

सारणी क्र. १.१

मेळघाट प्रदेश – जंगलांचे विविध प्रकार व जंगल विरहित क्षेत्र

| अ.क्र | जंगलांचे विविध प्रकार व जंगल विरहित क्षेत्र | व्याप्त क्षेत्र (हेक्टर मध्ये) | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १ | दाट जंगल क्षेत्र | १५४३.५६ | ३९.८५ |
| २ | खुले जंगल क्षेत्र | ६९६.७८ | १७.५५ |
| ३ | झुडपी जंगल क्षेत्र | १४८.७५ | ३.७४ |
| ४ | जंगल विरहित क्षेत्र | १५८२.६० | ३९.८५ |
| | एकूण | ३९७१.५८ | १००.०० |

स्त्रोत: संशोधक स्वत:




दाट जंगलांनी मेळघाट प्रदेशाचा बराच भाग व्यापलेला असून या जंगलात मुख्य वृक्ष साग आहे. त्याच बरोबर येथे मोह, बेहाडा, सालई, सिसम, तिवसा, धावडा इत्यादी प्रकारची वृक्ष आढळतात. मेळघाट मध्ये खुल्या जंगलांनी सुमारे १७.५५: क्षेत्रास व्यापलेले असून ही जंगले डोंगर पायथ्याजवळ आढळतात. या जंगलात प्रामुख्याने साग तसेच बांबु त्याच प्रमाणे नीम, रिठा, आपटा, खैर, आंबा व जांभूळ इ. तर झुडपी जंगल क्षेत्र हे या प्रदेशात फारच कमी असून ही जंगले या प्रदेशातील डोंगर उताराच्या खालच्या बाजुला ज्या भागात कमी पाऊस पडतो त्या प्रदेशात आढळतात. या जंगल क्षेत्रात प्रामुख्याने बाभूळ, पळस, कडुनिंब इ. वृक्ष आढळतात तर या प्रदेशात तिखाडी, तिकारी, बोरू, हगळी, दुर्वा व कुसल इ. प्रकारचे गवत आढळते. मेळघाट प्रदेशात जसे जंगलव्याप्त क्षेत्र आढळते त्याच प्रमाणे जंगल विरहित क्षेत्र सुद्धा आढळते. या क्षेत्राने अभ्यास प्रदेशाचे सुमारे १५८२.६० चौ.कि.मी (३९. ८५:) क्षेत्रास व्यापलेले आहे.



एकंदरित, मेळघाट प्रदेशात जंगल विरहित क्षेत्राने प्रमाण जास्त असून या क्षेत्राने धारणी तालुक्याचा सर्वाधिक भाग व्यापलेला आहे. याशिवाय चिखलदरा या तालुक्याच्या आग्नेय व पश्चिम भागात सुद्धा जंगलविरहीत क्षेत्र असल्याचे आढळते हे जंगलविरहित क्षेत्राचे प्रमाण कमी करणे गरजेचे असुन अलिकडील काळात पारिस्थितीकी जैवविविधतेचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत आहे. त्यामुळे या पारिस्थितीकीय जैवविविधतेचे संरक्षण करणे महत्वाचे आहे.

## निष्कर्ष

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिक्षेत्रात पारिस्थितीकीय जैवविविधता आढळते त्यामुळे येथे जंगल प्रकारानुसार नैसर्गिक वनस्पतींच्या वितरणात विविधता आढळते. मेळघाट प्रदेशात पर्यावरणीय एकजिनसीपणा तसेच एक प्रकारची पर्यावरणीय परिस्थिती आहे अशा प्रदेशात पर्यावरणीय परिस्थितीशी समायोजन करून या प्रदेशातील नैसर्गिक वनस्पतींच्या प्रजाती समुहाने राहतांना आढळतात. व या वनस्पतींच्या वितरणाच्या विविधतेवर तेथिल पर्यावरणीय घटकांचा परिणाम होतांना आढळतो.

मेळघाट परिक्षेत्रात विविध वनस्पतींच्या प्रजाती आढळून येतात. परंतु यातील बऱ्याच वनस्पतींच्या दुर्मिळ प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे येथिल वनक्षेत्रावर होणारे अतिक्रमण व त्यामुळे जंगलांचा होणारा ऱ्हास होय.

## उपाययोजना

पृथ्वीवरील सजीव सृष्टीचे अस्तित्व टिकविण्याकरीता नैसर्गिक संसाधनांची मुलभूत गरज आहे. समृद्ध नैसर्गिक संसाधनाशिवाय सजीवांना जगता येणार नाही. म्हणून सजिवांकरीता नैसर्गिक संसाधनाच्या संगोपनाची गरज आहे. परंतु भौतिक सुखाच्या लालसेपोटी वनवाशींची अवैध जंगलतोड व त्यामुळे होणारा जंगलाचा ऱ्हास परिणामी वनवाशी लोक आपला स्वत: चा विनाश ओढवतआहे. म्हणून हे सर्व थांबविणे गरजेचे आहे त्याकरिता खालील उपाययोजना करणे काळाची गरज आहे.

१. मेळघाट वन परिक्षेत्रातील अवैध जंगलतोडीवर बंदी असावी. तसेच अवैध जंगलतोड

Special Issue March 2018

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Vidyawarta®

International Multilingual Research Journal

Bharatiya Vidya Mandir Amravat's

**BHARATIYA MAHAVIDYALAYA, MORSHI DIST. AMRAVATI**

(Affiliated To Sant Gadge Baba Amaravati University,Amravati )

One Day National Conference

# Social Sciences,Commerce & Language

24 & 25 th February 2018

Principal
**Mr.G.S.Meshram**

Chief Editor
**Prof. Virag Gawande**

Organized by
**Bharatiya Mahavidyalaya, Morshi Dist. Amravati**
**&**
**Aadhar Social Research & Development Training Institute Amravati**

14) Goods and Service Tax (GST) and Indian Federation
**Adv. Swapnil B Waware—Dr. R.B. Waware** || 49

15) पर्यावरणातील वन्य जिवांचे सवंर्धन :- एक भौगोलिक संकल्पना
**डॉ. साळवे सुरेश गेणुराव, इस्लामपूर जि. सांगली.** || 54

16) निश्चलीकरण निर्णयाची अंमलबजावणी:एक विश्लेषण
**प्रा.श्रीमती आर.एम.वाठ, कळंब (जि.यवतमाळ)** || 56

17) विश्वास पाटील यांच्या झाडाझडती कांदबरीतील ग्रामीण समाजजीवन
**मोहिते सारिका विष्णूदास, कुर्डवाडी,** || 60

18) विमुद्रीकरणाचा भारतीय शेती क्षेत्रावर प्रभाव
**प्रा. विकास काशिनाथ देशमुख, धारणी, जि. अमरावती** || 63

19) पर्यावरण समतोलातील बंजारा समाजाचे योगदान
**प्रा. डॉ. नंदकिशोर तुकाराम बोकाडे, ता. मेहकर जि. बुलडाणा.** || 65

20) बँकिंग क्षेत्रातील सुधारणा
**प्रा. डॉ. सुनिल एन. ढेरे, बोरी अरब ता. दारव्हा जि. यवतमाळ** || 67

21) अमळनेर शहरातील बोरी नदी जलप्रदुषनाचा तुलनात्मक अभ्यास
**प्रा. डॉ. राहुल देविदास इंगळे, अमळनेर जि. जळगांव** || 71

22) यवतमाळ जिल्ह्यातील वाढत्या मृदा प्रदूषणाचे भौगोलिक विश्लेषण
**डॉ. सौ.कल्याणी अभय देशपांडे, यवतमाळ** || 73

23) अमरावती जिल्ह्यातील वर्धा नदीच्या उर्ध्व खोऱ्याच्या पाणलोट क्षेत्रातील नदी.....
**श्री. अमोल प्रकाशराव वारे—प्रा. डॉ. सीमा एस्. मालेवार (सावरकर)** || 76

24) महाराष्ट्रातील मानवी विकासाकरीता जल स्त्रोतांचे संधारण व संवर्धनकाळाची गरज
**प्रा.सावन देशमुख—प्रा.साकेत चिंचमलातपुरे—प्रा. मिलिंद उभाळे** || 80

25) आधुनिक काळातील ई—गव्हर्नन्स प्रणाली त्यात ग्रंथालये व ग्रंथपालाची भूमिका
**प्रा. मंगेश गोपीचंद वाहाणे, पवनी, जिल्हा—भंडारा** || 83

26) स्त्रीलिखित पौराणिक कादंबरी: संकल्पना व स्वरूप
**प्रा.वंदना सोनवले, हडपसर** || 86

http://www.printingarea.blogspot.com
www.vidyawarta.com/03

24

# "महाराष्ट्रातील मानवी विकासाकरीता जल स्त्रोतांचे संधारण व संवर्धनकाळाची गरज"

प्रा. सावन एम्. देशमुख
सहा. प्राध्यापक, भारतीय महाविद्यालय, मोर्शी

प्रा. साकेत चिंचमलातपुरे
सहा. प्राध्यापक, भारतीय महाविद्यालय, मोर्शी

प्रा. मिलिंद एम्. उभाळे
भूगोल विभाग प्रमुख,
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

**********

**सारांश**

भूतलावर अनेक महत्वाचे घटक असून त्यांचा उपयोग व परिणाम सर्वच सजीव सृष्टीवर व विशेषत: मानवी जीवनावर होत असतो. नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिरेकी प्रमाणात व अविवेकी स्वरूपात उपयोग केल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून असमतोल निर्माण झाला आहे. पृथ्वीवरील जलावरणात ९३ टक्के भाग महासागराचा असून फक्त ५ टक्के जमिनीवरील पाण्याचा आहे. त्यापैकी २ टक्के पाणी ध्रुविय प्रदेशात बर्फाच्या स्वरूपात आहे. भूपृष्ठावर सरोवर, तलाव, नद्या, ओढे, झरे व भूमीगत पाण्याच्या स्त्रोत असून या स्त्रोतांच्या माध्यमातून सजिव सृष्टीच्या विकासास आवश्यक पाण्याचा पुरवठा होतो.

घरघुती वापर, उद्योगधंदे, शेती यासाठी तसेच प्राणी, वनस्पती यांचे पोषण व संवर्धन, विद्युत निर्मिती, अवशिष्ठांची विल्हेवाट व करमणूक इ. कारणांसाठी पाण्याचा उपयोग होतो. लोकसंख्या वाढीमुळे तसेच उद्योगधंद्यांच्या विकासामुळे पाण्याच्या मागणीत मोठ्या प्रमाणात वाढ होत असून आज पाण्याचा तुटवडा निर्माण होत आहे. निसर्गत: उपलब्ध असलेल्या हवा जल साधनसंपत्तीचे योग्य संधारण व संवर्धन होणे गरजेचे आहे.

प्रस्तुत संशोधन निबंधात मानवी विकासाकरीता जल स्त्रोत संधारण व संवर्धनाचे भौगोलिक अध्ययन करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**बीजसंज्ञा :** जलसंवर्धन, जलसंधारण, जल प्रदूषण

**प्रस्तावना**

भारतीय शेती ही मुख्यत: पावसाच्या पाण्यावर अवलंबून असून अनियमित व कमी पर्जन्यामुळे दुष्काळ, अवर्षण तसेच पाण्याचे दुर्भिक्षामुळे आज शेतकऱ्यांना नापीकी, कर्जबाजारीपणा या समस्या निर्माण झाल्या आहे त्याचा परिणाम स्वरूप आज शेतकऱ्यांच्या आत्महत्तेत वाढ होत आहे. तसेच आज पिण्याच्या पाण्याची कमतरता या सारख्या समस्या उन्हाळयात जाणवतात. भारतात जलसंपदा विपुल प्रमाणात उपलब्ध असून त्या जलसंपदाचे नियोजन, संधारण व संवर्धनाचा अभाव असल्याचे दिसून येते. उपलब्ध जलसाठ्यांच्या वापरात नियोजनाचा अभाव असून आज अनेक तळी व सरोवरे नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. भूमीगत जलाचा अमर्याद वापर होत असून दिवसेंदिवस भूजलपातळी खोल खोल जात आहे. एकूण पावसाच्या पाण्यापैकी फक्त १० टक्के पाणीच वापरले जाते. या जल स्त्रोतांचे व पावसाच्या पाण्याची साठवण, संवर्धन व नियोजन करणे काळाची गरज आहे.

**शोध निबंधाचा उद्देश**

जलसंपदा ही मानवास मिळालेली अमुल्य नैसर्गिक देणगी असून पाण्याशिवाय मानवी जिवनाची कल्पना सुद्धा अशक्य आहे. आज मानवी हस्तक्षेपामुळे जलसंपदांचा ऱ्हास होत असून या जलसंपदांचे संवर्धनाचा खालील उद्देशांच्याव्दारे अभ्यास या शोध निबंधात करण्यात आलेला आहे.

१. जलसंवर्धन संकल्पना अभ्यासणे.
२. जलसंपदांच्या ऱ्हासाची कारणे तपासणे.
३. जलसंपदाऱ्हासामुळे होणाऱ्या समस्यांचा आढावा घेणे.
४. जलसंपदा संवर्धनाकरिता उपाय सुचविणे.

**अभ्यास पद्धती व माहिती संकलन**

प्रस्तुत शोध निबंधाकरीता प्राथमिक तसेच द्वितीय स्तरावरील माहितीचे संकलन करण्यात आलेले आहे. ही माहिती एकत्रित करुन या माहितीच्या विश्लेषणाकरीता पारिस्थितीकी व वर्तणूक पद्धतींचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**अभ्यास क्षेत्र**

भारतासारखाच महाराष्ट्र हा वैविध्यपूर्ण घटकांनी नटलेला आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० या दिवशी झाली. भारतातील महाराष्ट्र हे एक प्रगतिशील राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्र राज्याचा अक्षवृदत्तीय विस्तार हा १५°३५'४६'' उत्तर ते २२°०२'१३'' उत्तर अक्षांश असून रेखावृत्तीय विस्तार हा ७२°३८'४५'' पूर्व ते ८०°५३'१७'' पूर्व रेखांशाच्या दरम्यान आहे.

महाराष्ट्र राज्याच्या वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्यप्रदेश, पूर्वेस छत्तीसगढ ही राज्ये आहेत. तर गोवा कर्नाटक आणि तेलंगणा ही राज्ये दक्षिणेस आहेत. महाराष्ट्राचे पूर्व–पश्चिम व उत्तर–दक्षिण अंतर सुमारे अनुक्रमे ८६० कि.मी. व ७३० कि.मी. इतके आहे. महाराष्ट्राला सुमारे ७२० कि.मी. लांबीचा सागरी किनारा लाभलेला आहे. भारतीय द्विपकल्पाच्या पश्चिम किनाऱ्यावर हे राज्य असून महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रफळ ३,०८,५८० चौ.कि.मी. आहे.

**अभ्यास क्षेत्र : स्थान व विस्तार**




संपूर्ण जीवावरणासाठी पाणी हे अत्यावश्यक संसाधन आहे. सर्व जीवमात्रांची ती मुलभूत गरज आहे. एखाद्या प्रदेशातील पाण्याची उपलब्धता ही प्रदेशाच्या हवामानावर अवलंबून असते. आपल्याला पावसापासून पाणी उपलब्ध होत असून पश्चवीवरील पर्जन्य हा एकमेव जलापुर्तीचा स्त्रोत आहे. पर्जन्याद्वार मिळणाऱ्या पाण्याला एकत्र आणावे लागते, नंतरच ते वेगवेगळ्या गोष्टींसाठी पुरवता येते. जल हे पुनर्नवीकरण संसाधन होय.



ifpe ?kVr 3000 feehi{ks kt kLr it Ø rj it Ø Nk B ki ksa kr 450 fe-eh i{ks dehv kgs egkjk VV i lol KG~ HP k pkj efg.; kr eku Cdh s .dwkit Ø k Sh 80 VDdsit Ø gks v l Y; keG s mo Zr dKGk r ik; kph Vpa koZ Hkkx rs; ki fj fLFkrh P k fuolh. kdjh r ki lol HP ki k; kphl KBo.kdj.ksa l p miy Ck t y L=ksa pa si aö k jk{ks kq r l p l a/kZ d:u] miy Ck ik; k rsdk Vdl jhusok j.ksxjt p s v kgs lk kZj.kkr ful xZ% miy Ck v l y Y; k t y l aR kps; k{ks l a{kj.k gksks v kt P k dKGk xjt p s v kgs Hkw Bkoj miy Ck v l y Y; k ik; kps l jk{k.k l a/kZ o fodk dj.kso R kphmi; Dr rk ok-fo.ks; k kBhik; kpsdsa s sO oLFkku Eg.k s t y l a{kj.k gks-

**महाराष्ट्रातील जल संसाधने**

महाराष्ट्रातील भूपृष्ठीय जल व भूजल अशा प्रकारे जल संसाधनांचे वर्गिकरण करता येते. नदीच्या पात्रातून जे पाणी वाहते ते सागरांना किंवा सरोवरात किंवा जलाशयात साठविले जाते. त्यांचा समावेश पृष्ठीय जल संसाधनात केला जातो. तर जे भूपृष्ठावर पडणारे पावसाचे पाणी जमीनीत मुरते आणि काही खोलीवर साठून राहते त्या जलाचा समावेश भूजल संसाधनात होतो. महाराष्ट्रात प्रामुख्याने बेसॉल्ट खडक आढळत असून बेसॉल्ट खडकात पाणी मुरण्याचे प्रमाण हे खुपच कमी असल्याचे दिसते.

१० मीटर किंवा त्यापेक्षा अधिक उंच धरणांचा समावेश मोठ्या धरणात केला जात असून देशातील

सर्वात जास्त मोठी धरणे महाराष्ट्रात असून त्यांची संख्या ही १८०० इतकी आहे. या सर्व धरणातील स्थूल पाणी साठा हा ३७ अब्ज घन मीटर इतका आहे तर भूजलाचा स्थूल साठा हा ३२.९६ अब्ज घन मीटर इतका असल्याचे आढळते.

महाराष्ट्रात प्राकृतिक वैशिष्ट्यांमुळे काही मर्यादित भाग वगळता भूपृष्ठाखाली जलपातळी ३० मीटरपेक्षा खोल आढळत नाही. त्यामुळे नलिकाविहिरींना पावसाळ्यात भूगर्भातील जल साठ्याव्दारे पाणी पुरवठा मुबलक प्रमाणात होतो मात्र वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे या प्रदेशातील ही भूजल पातळी खाली गेल्याचे आढळून येते. त्यामुळे कशीकरीता तसेच मानवाच्या पाण्याच्या गरजेपोटी तो आज १०० मीटर पेक्षाही खोल बिंधन विहिरी खोदल्या जात आहेत. या विहिरी उन्हाळ्यात कोरड्या पडतात. महाराष्ट्रात खोदण्यात आलेल्या नलिकाविहिरींपैकी ८० ते ९० टक्के विहिरी आटलेल्या दिसून येतात. त्यामुळे या जल स्त्रोतांचे संवर्धन करणे काळाची गरज आहे.

**निष्कर्ष**

१. महाराष्ट्रात पर्जन्याचे वितरण असमान आढळते. त्यामुळे या प्रदेशात मोठ्या प्रमाणात काही भाग वगळता पाण्याचे दुर्भिक्ष मोठ्या प्रमाणात आढळते.

२. महाराष्ट्रात उपलब्ध पर्जन्य व जल स्त्रोतांचे योग्य संवर्धना अभावी मोठ्या प्रमाणात जल दुर्भिक्ष आढळत असून महाराष्ट्रात सुमारे ६२००० चौ.कि.मी. क्षेत्रात अवर्षण प्रणव स्थिती आढळते.

३. उपलब्ध जल स्त्रोतांमध्ये जल प्रदूषके मोठ्या प्रमाणात मिसळल्या जात असल्यामुळे अनेक भूपृष्ठावरील जल स्त्रोत निरूपयोगी होत असून जेव्हा पर्जन्य कमी होते तेव्हा पाण्याची टंचाई भासते व पाण्याच्या उपलब्धतेकरीता मानवाला टँकरव्दारे पाणी पुरवठा करावा लागतो.

पर्जन्य हा महाराष्ट्रातील जलसंसाधनाचा प्रमुख स्त्रोत असून या प्रदेशातील अनिश्चित पर्जन्याचे विस्तृत क्षेत्र आहे. त्यामुळे जल स्त्रोताचे संवर्धन करणे काळाची गरज आहे. त्यासाठी खालील उपाय करणे गरजेचे आहे.

१. भूपृष्ठावर पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीमध्ये मुरला पाहिजे याची काळजी घेणे तसेच नद्या, ओढे, नाले यांना बांध घालणे गावतळी, शेततळी, पाझर तलाव निर्मिती करणे.

२. पुरामुळे, अवर्षणामुळे पाणी दिल्याने पाणी दुषीत होते. याकरीता अवर्षण पुरासारख्या घटना घडू नये म्हणून जंगलतोड, वन चराईवर पूर्णत: नियत्रण आणावे. पावसाचे पाणी वाहून जाऊ नये म्हणून सपाटीकरण, बांधबंदिस्ती, कंटूर बंडिंग हे राष्ट्रीय उपक्रम राबवावेत.

३. भूपृष्ठावरील जलस्त्रोतांमधिल पाण्याची वाफ होते म्हणून सरोवराच्या पाण्यावर सिटील अल्कहोल सारखे बाष्पीभवन प्रतिबंधक रसायने वापरावीत.

४. जलस्त्रोतांमधिल गाळाचा उपसा करुन पाणीसाठ्याचे प्रमाण वाढविणे तसेच जल गळती थांबविणे.

५. कारखान्यातील दुषकामुळे जल स्त्रोतांमधील जल प्रदुषीत होणार नाही याकरिता कायद्याने बंदी घालून त्यांची अतिशय काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. जेणे करून जल स्त्रोतांचे संवर्धन होवून स्वच्छ जलापूर्ती होणे सहज शक्य होईल.

६. ओढे, नाले यांनी वाहून आणलेले पाण्याचे शुद्धकरण करुनच ते मुख्य नदीला सोडण्यात यावे जेणे करुन शहरातील सांडपाण्याचे प्रमाण कमी होईल.

वरील प्रमाणे निसर्गत: उपलब्ध जल स्त्रोतांचे संधारण व संवर्धन केल्यास महाराष्ट्रातील जलसंसाधनाचा विकास होवून अवर्षण, जलदुर्भिक्ष या सारख्या समस्येवर मात करणे सहज शक्य होईल.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१. Ground Water Resources: Maharashtra Remote Application Centre (MRSAC)
२. पर्यावरणशास्त्र:डॉ.घारपूरे विठ्ठल
३. पर्यावरण भूगोल:डॉ. सुभाषचंद्र सारंग
४. नैसर्गिक आपत्ती व व्यवस्थापन:डॉ. आर. जी पाटील
५. साधनसंपत्ती भूगोल:डॉ. घारपूरे विठ्ठल
६. साधनसंपदा व पर्यावरण:डॉ. अरूण कुंभारे


❑❑❑

Special Issue February 2018

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

International Multilingual Research Journal

# Impact of GST




✦ Editor ✦
Prof.Virag S.Gawande
Dr.Sanjay j. Kothari
Dr. Dinesh W.Nichit

✦ Published By ✦
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage Walgaon, Dist . Amravati
&
Aadhar Social Research Development Training Institute, Amravati.

Principal
Bharatiya Mahavidyalaya
Morshi,Dist.Amravati(M.S.)

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

# || Index ||


01) IMPACT OF GST ON INDIAN ECONOMY
**Shri. Karande Ramesh Hanmant, Pethvadgaon, Dist: Kolhapur.** || 08

02) Impact of GST on Economic Growth of India
**Prof. Madhuri R. Umekar, Warud** || 11

03) GST Goods and Services
**Dr. M.B.Rathod,Panharkawada** || 14

04) GOODS AND SERVICE TAX [GST]
**Prof. Anand Gomaji Chavan, Akola.** || 17

05) GOODS AND SERVICE TAX (G.S.T.)-IT'S IMPACT ON INDIAN ECONOMY: A GLANCE
**Prashant M. Puranik, Chandrapur** || 22

06) THE IMPACT OF GST (GOODS AND SERVICES TAX) IN INDIA
**Mangalavati G. Pandey, Amravati** || 25

07) IMPACT OF GST
**Ku. Jayaprabha M. Bhagat, Wanoja** || 29

08) Impact of GST on Indian Economy
**Harshad Arvind Ekbote, Patur, Dist. Akola.** || 31

09) India's Economic Performance of Agriculture
**Dr. P. N. Ladhe, Malkapur.** || 34

10) IMPACT OF GOODS AND SERVICE TAX
**Dr. Jayant Prabhakar Bobde, Akola.** || 39

11) MPACT OF GST
**DR. RAJKUMAR R. RATHOD, Barshitakli, Dist-Akola** || 42

12) Goods and Service Tax – Challenge and Opportunities
**Dr. Aruna S. Wadekar, Amravati.** || 50

13) IMPACT OF GOODS AND SERVICE TAX (GST) ON END CONSUMERS .....
**PrabhakarMotghare, Dr. Gopal Zade, Mouda** || 53




Principal
Bharatiya Mahavidyalaya
Morshi, Dist. Amravati (M.S.)

27) वस्तू व सेवाकर प्रणाली अंमलबजावणीनंतर जी.एस.टी.परिणाम .....
प्रा. डॉ. प्रदीप दामोदरराव दरवरे, यवतमाळ ||105

28) वस्तु व सेवकांराचे अर्थव्यवस्थेवर परिणाम
प्रा.डॉ. शंकर आर. चव्हाण, वलगाव || 108

29) सामान्य व्यक्ती व प्रमुख क्षेत्रावर जी.एस.टी.चा परिरणाम
विनायक विष्णुपंत खांडेकर, मोर्शी || 111

30) सामान्य जनतेवर जी.एस.टी.चा होणारा परिणाम
प्रा. दिपक एन. काळे. मोर्शी || 114

31) Goods and Services Tax and Export of Goods and Services
Nitin Singhavi, , Dhamangaon (Rly.) || 116

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.com

International Multilingual Research Journal

Printing Area

9850203295 7588057695

Editor Dr.Bapu G.Gholap



Principal
Bharatiya Mahavidyalaya
Morshi, Dist. Amravati (M.S.)

30

# सामान्य जनतेवर जी.एस.टी.चा होणारा परिणाम

प्रा. दिपक एन. काळे.
(सहाय्यक प्राध्यापक)
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

**********

भारतीय अर्थव्यस्थेत दोन प्रकारच्या करप्रणाली अस्तित्वात आहे. १) प्रत्यक्ष कर २) अप्रत्यक्ष कर म्हणजे (VAT-Value Added Tax) जकात कर, आयात कर, वस्तु व सेवा कर. जी.एस.टी. राज्य सरकारचे कर आणि केंद्र सरकारचे कर, पुरवठ्यावील कर अशाप्रकारे विविध राज्यात संपत्ती कर वेगवेगळया करप्रणाली अस्तित्वात होती परंतु प्रत्यक्षात भारतीय अर्थव्यवस्थेत अप्रत्यक्ष करामध्ये प्रत्येक राज्यामध्ये एकवाक्यता नव्हती. इ.स. २००२ मध्ये वस्तु व सेवा करावर चर्चा झाली. सन २००३ मध्ये डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली वॅटच्या तत्वावर टास्क फोर्सने संकल्पना अहवालात मांडली. वॅट आधारित तत्वावर एकीकृत वस्तु व सेवाकराची संकल्पना तयार झाली.

त्यानंतर २००६ मध्ये तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी संकल्पना मांडली आणि त्याची अमलबजावणी २०१० मध्ये करण्याची मुदत ठरविली. त्याकरिता २००९ मध्ये संसदेत चर्चेसाठी दस्तऐवज ठेवली. त्यानुसार २०११ मध्ये जी.एस.टी. लागु करण्याविषयी प्रथम विध्येयक मांडल त्यांनी २०१३ मध्ये अहवाल दिला. परंतु त्या दरम्यान भारतीय जनता पार्टीने या विध्येयकाला विरोध केला होता. सन २०१४ मध्ये श्री. नरेन्द्र मोदी पंतप्रधान झाले. आणि त्यांनी या विध्येयकाला राष्ट्रहिताचे विधेयक सांगुन पाठपुरावा केला. आणि २०१५ मध्य जी.एस.टी. विधेयक लोकसभेत संमत झाले. परंतु राज्यसभेत कॉग्रेसने ते अडवुन ठेवले.

| 54 | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे पुनर्भांडवलीकरण | डॉ. संगीता जांगिड | 236 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452 (2015), (GIF)-0.676 (2013)
Issue 87(D)- Indian Financial Sector : Challenges and Prospects
UGC Approved Journal
E-ISSN : 2348-7143
January-2019

# भारतातील बॅंकाची बुडीत कर्जे कारणे, परिणाम व उपाययोजना

डॉ. टेंभुर्णे लाजवंती आर.
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती

प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेत मग ती विकसित असो वा अविकसित अशा सर्वच राष्ट्रांच्या बॅंकांना अनन्य साधारण महत्व आहे. कोणत्याही देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी बॅंका हया महत्वपूर्ण भूमिका निभावित असतात. त्यांच्यावर विशेष असे दायित्व सोपविल्या गेले. स्वातंत्र्यानंतर प्रमुख बॅंकांचे राष्ट्रीयकरण १९६९ व नंतर १९८० मध्ये करण्यात आले. त्यानंतर त्यांचे कार्यक्षेत्र वाढतच गेले. कृषि, व्यापार, उद्योग, सेवाक्षेत्र यामध्ये बॅंका मोलाची भर घालतात. परंतु आधुनिक काळात भारतीय बॅंकींग क्षेत्रामध्ये ज्या समस्या निर्माण झाल्यात त्यात सर्वात मोठी आणि आव्हानात्मक समस्या म्हणजे बॅंकापुढे असलेला थकीत कर्जाचा भला मोठा डोंगर होय. बॅंका हया आर्थिक प्रगतीच्या केंद्रस्थानी असतात. ज्याप्रमाणे मानवी शरीराची त्वचा खराब झाली तर त्याच्या दुखण्याने मूळ केवळ त्वचेपुरतेच मर्यादित असते असे नाही, तर ते अर्थव्यवस्थेत असू शकते. त्याचप्रमाणे बॅंकेच्या संकटाचे मूळ ते त्याच बॅंकेत सडलेले असते असे नाही तर ते अर्थव्यवस्थेत अन्यत्रही राहू शकते.

भारतामध्ये बॅंकींग व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याची व नियमित मार्गदर्शन करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बॅंक ही सर्वोच्च बॅंक असून भारतीय बॅंकाचे वर्गीकरण प्रामुख्याने तीन भागात केले जाते.
(१) व्यापारी बॅंका (२) सहकारी बॅंका (३) विकास बॅंका

## संशोधनाचे उद्देश :

१. बॅंकींग क्षेत्रातील सुधारणा माहिती करणे.
२. बुडीत कर्ज म्हणजे काय समजून घेणे.
३. एन.पी.ए. च्या कारणांचा अभ्यास करणे.
४. एन.पी.ए.मुळे होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
५. एन.पी.ए.कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

## बॅंकींग क्षेत्रातील सुधारणा ::

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील बॅंकींग व्यवसायाला कोणतीही दिशा नव्हती. परिणामी बॅंका बुडण्याचे प्रमाण जास्त होते. १९२९–३२ च्या काळात अनेक बऱ्याच संस्था बुडाल्या. सन १८०० ते १९५४ या कालावधीत ४० पेक्षा जास्त बॅंका स्थापन झाल्या पण नंतर या काळात अनेक नवीन बॅंका अस्तित्वात आल्या परंतु त्यांना आपली कुवत ओळखता आली नाही. परिणामी १९४५ नंतर भारतातील बॅंकींग व्यवस्था अडचणीत आली व याचा परिणाम अनेक बॅंका बुडण्यात झाला.

स्वांत्र्यानंतर बॅंकांचे राष्ट्रीकरण करण्यात आले व त्यानंतर बॅंकाची शोडीपार प्रगती झाली. १९९१ मध्ये भारत सरकारने खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या धोरणांचा स्विकार केला. १९९१ पर्यंत आर्थिक वर्षात बॅंकाच्या ताळेपत्रामध्ये वाटप केलेल्या कर्जावरील कमविलेले परंतु प्रत्यक्षात न मिळालेले व्याज उत्पन्नात जमा घेण्यात येत होते. नफ्यातून निर्माण झालेल्या निधी इतर ठिकाणी [illegible]



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

होता. वसुल न होणारी कर्जे ताळेबंदात दाखविली जात होती व आर्थिक लेखाची पारदर्शकता नष्ट केली जात होती. त्यामुळे १९९२ मध्ये श्री. एम.नरसिंहम समितीने आपला अहवाल सादर केला. या अहवालात आर्थिक क्षेत्रातील सुधारणांचा आग्रह केला. या अंतर्गत बँकींग क्षेत्रातील सुधारणांची जबाबदारी या समितीवर सोपविण्यात आली. या समितीने नोव्हेंबर १९९१ मध्ये अहवाल सादर केला. या अहवालात एन.पी.ए.संदर्भात सुचना करण्यात आल्या. त्यानुसार बँकाच्या मालमत्तेचे वर्गीकरण करण्यात येते. बँकांना त्यांच्या बुडीत मालमत्तेसाठी त्यांनी मिळविलेल्या नफयातून तरतूद करावी लागते हे निकष लागु केल्यानंतर बँकाची आर्थिक स्थिती सुधारण्यातीला ढासळली. परंतु कालांतराने त्यात पारदर्शकता निर्माण झाली व बँका सुदृढ होण्यास मदत झाली.

या एन.पी.ए.वरुन अशक्त बँका व आजारी बँका असे वर्गीकरण करण्यात आले. ज्या बँकाचे प्रमाण रिझर्व बँकेने ठरवून दिलेल्या प्रमाणापेक्षा ७५ टक्के हून कमी आहे अशा बँकांना अशक्त बँका तर ज्या बँकाचे अनुत्पादक कर्जाचे प्रमाण १५ टक्के अधिक आहे त्यांना आजारी बँका म्हणण्यात येऊ लागले. एन.पी.एचे बँकाच्या व्यवसायावर विपरीत परिणाम होतात हा परिणाम फक्त भारतातील बँकावरच झाला असे नव्हे अमेरिकेतील बँकांवरही झाला. भारतातील बँकाच्या एकूण वितरीत कर्जाच्या तुलनेमध्ये एन.पी.ए.चे प्रमाण २००१ मध्ये १२ टक्के होते ते सुधारुन २००७-०८ मध्ये २.४ टक्के आले परंतु त्यानंतर ते पुन्हा वाढत गेले. सन २००८-०९ मध्ये ६८,२२० कोटी रुपये, २००९-१० मध्ये ८१,८१३ कोटी रुपये, २०१०-११ मध्ये ९४,०८४ कोटी रुपये तर २०११-१२ मध्ये हे प्रमाण ९७.२२२ कोटी रुपये इतके होते. म्हणजेच २०११-१२ मध्ये देशातील बँकाचे एकत्रित थकीत कर्जाचे प्रमाण २५.५ टक्के पोहचले. सर्व बँकामधील एन.पी.ए.चे प्रमाण ३.८ ३१ लाख कोटीवर गेले.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या सध्याच्या नियमानुसार (खालील निकषावर) बुडीत कर्जे जाहीर करावे लागते. बुडीत कर्जे म्हणजे काय तर

अ) कर्जाचे व्याज/मुद्दल सलग ९० दिवसात परतफेड केल्या गेली नाही.

ब) मुदत कर्ज खाते यासाठी तारण म्हणुन दिलेल्या मालमत्तेची किंमत कर्जापेक्षा कमी असल्यास

क) एका खातेदाराचे कर्ज बुडीत झाले असता त्या ग्राहकाची इतर सर्व खाली सुध्दा बुडीत ठरविली जातात.

ड) रोख पत खात्याच्या मर्यादा मंजुरीचा कालावधी ९० दिवसापेक्षा जास्त उलटून गेल्यावर खाते बुडीत होते.

बँकेचे महत्व :

आधुनिक काळात बँका हया केवळ पैशाचा साठा करणाऱ्या नसून आर्थिक विकासाला आवश्यक असणाऱ्या साधन सामुग्रीचे खनिजे आहे त्याचे महत्व हे खालील मुद्यांवरुन स्पष्ट होते.

- भारतासारख्या कृषिप्रधान अर्थव्यवस्थेत शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करुन शेतीच्या उत्पन्नात व उत्पादकतेत वाढ करुन आणि शेतकऱ्यांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी बँकींग यंत्रणा अधिक श्रेष्ठ व प्रभावी ठरते.
- बँका सर्वसामान्य नागरिकांच्या बचत वृत्तीला व गतिशिलतेला चालना देण्याचे काम करते.
- बँकाची प्रगती झाल्यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळून लोकांच्या दृष्टीकोनात बदल घडून आणणे शक्य होते.

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

४. लोकांना बँकींग व्यवहाराचे शिक्षण देऊन अर्थव्यवस्थेत काटकसर व बचतीचे महत्व पटवून देण्याचा कार्य करतात.

५. बँकांमुळे पैशाचे हस्तांतरण व स्थलांतरण सहजतेने होते

६. या व्यवसायामुळे औद्योगिकरणाला चालना मिळते.

**भारतातील बुडीत कर्जाची कारणे :**

आज देशातील बँकींग क्षेत्र वाढत्या एन.पी.ए.च्या समस्येतून जात आहे. या बँकांचा एन.पी.ए.अधिक वाढविण्याकरिता खालील बाबी कारणीभूत ठरतात.

**अनुत्पादक कारणासाठी कर्ज :**

ग्रामीण व विशेषत: शेती क्षेत्रामध्ये दिसून येते की, उत्पादक कार्यासाठी घेतलेले कर्ज अनुत्पादक कारणासाठी खर्च होत असल्यामुळे त्याची परतफेड होऊ शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यावरील बुडीत कर्जाचा प्रमाण वाढते. अनेक कर्जदार जाणून–बुजून कर्ज परत करीत नाही. गेल्या काही वर्षात शैक्षणिक कर्जाचा अनुत्पादक कर्जात सुध्दा वाढ झाली आहे. मार्च २०१२ मध्ये देशभरातील एकूण शैक्षणिक कर्जापैकी ५.२० टक्के कर्जे ही अनुत्पादक होती तर डिसेंबर २०१६ मध्ये हेच प्रमाण ८.७६ टक्के झाले.

**नैसर्गिक आपत्ती :**

एन.पी.ए. चे प्रमाण वाढविण्यासाठी हा सुध्दा एक महत्वाचा घटक आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक वेळा केलेली गुंतवणूक ही डुबल्या जाते. त्यामुळे कर्ज फेडण्याची क्षमता नाहिशी होते ते बँकाचे कर्ज वेळेवर परत करु शकत नाही.

**व्यावसायिक अपयश :**

लघु व मध्यम उद्योजकांचे उद्योगातील अपयश हे सुध्दा मोठ्या प्रमाणात एन.पी.ए. वाढण्यासाठी कारणीभूत ठरत असते. व्यावसायिकांना आलेल्या अपयशामुळे उद्योग बुडीत निघाल्यामुळे ते कर्ज परत करण्यासाठी सक्षम नसतात. त्यामुळे कर्जाचे प्रमाण वाढत जाते. आज साथीचा रोग पसरावा तसे अनेक उद्योग साथीच्या रोगाच्या तडाख्यात सापडत आहे. गुंतवणूकदार आशावादी असतात ते मोठमोठे प्रकल्प उभारत करतात परंतु आर्थिक मंदी आल्यात नफा क्षमता अंदाजापेक्षा कमी होते व थकीत कर्जाचे प्रमाण वाढते.

**नोटबंदी :**

१६ नोव्हेंबर २०१६ साली सरकारने ५०० व १००० च्या नोटा रद्द केल्यानंतर बँकांची मोठी नाचक उडाली. सामान्य माणूस व लघु उद्योजकांचे कंबरडे मोडले त्यामुळे त्यांच्याकडून जी परतफेड अपेक्षित होती ती झाली नाही नोटबंदीमुळे अर्थव्यवस्थेचे कंबरडेच मोडले. खुद्द रिर्व्ह बँक ऑफ इंडियाचा नफा कमी झाला तिथे इतर बँकांची काय दशा ?

**हेतुपुरस्सर थकीत करणे :**

काही उद्योगपती / व्यापारी हे हेतुपुरस्सर आपले खाते थकीत करतात. हजारो रुपयाचे कर्ज घेवून स्वच्छेने दिवाळखोर होतात. मी स्वत:च दिवाळखोर झालेलो आहे, कर्ज परत करु शकत नाही असे ते जाहीर करतात. आजही देशामध्ये विजय माल्ल्यासारखे (Willful defauter) तसेच वेगवेळया क्षेत्रामध्ये दिसून येतात. अशा (Willful defauter) मुळे सुध्दा बँकाचे एन.पी.ए. चे प्रमाण वाढते.

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

४. लोकांना बँकींग व्यवहाराचे शिक्षण देऊन अर्थव्यवस्थेत काटकसर व बचतीचे महत्व पटवून देण्याचे कार्य करतात.

५. बँकांमुळे पैशाचे हस्तांतरण व स्थलांतरण सहजतेने होते

६. या व्यवसायामुळे औद्योगिकरणाला चालना मिळते.

**भारतातील बुडीत कर्जाची कारणे :**

आज देशातील बँकींग क्षेत्र वाढत्या एन.पी.ए.च्या समस्येतून जात आहे. या बँकांचा एन.पी.ए.अधिक वाढविण्याकरिता खालील बाबी कारणीभूत ठरतात.

**अनुत्पादक कारणासाठी कर्ज :**

ग्रामीण व विशेषत: शेती क्षेत्रामध्ये दिसून येते की, उत्पादक कार्यासाठी घेतलेले कर्ज अनुत्पादक कारणासाठी खर्च होत असल्यामुळे त्याची परतफेड होऊ शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यावरील बुडीत कर्जाचे प्रमाण वाढते. अनेक कर्जदार जाणून–बुजून कर्ज परत करीत नाही. गेल्या काही वर्षात शैक्षणिक कर्जाचा अनुत्पादक कर्जात सुध्दा वाढ झाली आहे. मार्च २०१२ मध्ये देशभरातील एकूण शैक्षणिक कर्जांपैकी ५.२० टक्के कर्जे ही अनुत्पादक होती तर डिसेंबर २०१६ मध्ये हेच प्रमाण ८.७६ टक्के झाले.

**नैसर्गिक आपत्ती :**

एन.पी.ए. चे प्रमाण वाढविण्यासाठी हा सुध्दा एक महत्वाचा घटक आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक वेळा केलेली गुंतवणूक ही डुबल्या जाते. त्यामुळे कर्ज घेणाऱ्याची क्षमता नाहिशी होते ते बँकाचे कर्ज वेळेत परत करु शकत नाही.

**व्यावसायिक अपयश :**

लघु व मध्यम उद्योजकांचे उद्योगातील अपयश हे सुध्दा मोठ्या प्रमाणात एन.पी.ए. वाढण्यासाठी कारणीभूत ठरत असते. व्यावसायिकांना आलेल्या अपयशामुळे उद्योग बुडीत निघाल्यामुळे ते कर्ज परत करण्यासाठी सक्षम नसतात. त्यामुळे कर्जाचे प्रमाण वाढत जाते आज साथीचा रोग पसरावा तसे अनेक उद्योग साथीच्या रोगाच्या तडाख्यात सापडत आहे. गुंतवणूकदार आशावादी असतात ते मोठमोठे प्रकल्प जाहीर करतात परंतु आर्थिक मंदी आल्यात नफा क्षमता अंदाजापेक्षा कमी होते व थकीत कर्जाचे प्रमाण वाढते.

**नोटबंदी :**

१६ नोव्हेंबर २०१६ साली सरकारने ५०० व १००० या नोटा रद्द केल्यानंतर बँकांची मोठी नाचक्की उडाली. सामान्य माणूस व लघु उद्योजकांचे कंबरडे मोडले त्यामुळे त्यांच्याकडून जी परतफेड अपेक्षित होती ती झाली नाही नोटबंदीमुळे अर्थव्यवस्थेचे कंबरडेच मोडले. खुद्द रिझर्व बँक ऑफ इंडियाचा नफा कमी झाला तिथे इतर बँकांची काय दशा ?

**हेतुपुरस्सर थकीत करणे :**

काही उद्योगपती / व्यापारी हे हेतुपुरस्सर आपले खाते थकीत करतात हजारो रुपयाचे कर्ज घेवून स्वच्छेने दिवाळखोर होतात. मी स्वत:च दिवाळखोर झालो आहे, कर्ज परत करु शकत नाही असे ते जाहीर करतात. आजही देशामध्ये विजय माल्ल्यासारखे (Willful defauter) तसेच वेगवेळया क्षेत्रामध्ये दिसून येतात. अशा (Willful defauter) मुळे सुध्दा बँकाचे एन.पी.ए. चे प्रमाण वाढते.

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 87(D)- Indian Financial Sector : Challenges and Prospects
UGC Approved Journal
E-ISSN : 2348-7143
January-2019

आर्थिक स्थितीवर परिणाम :

बुडीत कर्जाचे प्रमाण वाढल्यास त्याचा बॅंकेच्या विकासावर तसेच देशाच्या आर्थिक विकासावर परिणाम होण्याची शक्यता असते बॅंकच्या वित्तीय व्यवस्थेतील पत खालावत जाते.

याचा अर्थ असा की, बॅंकांच्या थकीत व मोठया कर्जामुळे बॅंकांचा नफा कमी होऊन त्याचा विपरीत परिणाम उत्पन्नावर होतो. थकीत कर्जाची तरतुद ही बॅंकाच्या नफ्यातून होत असल्यामुळे बॅंकांचे नफ्याचे प्रमाण कमी होत आहे. बॅंकींग ऐज्युकेशन ट्रेनिंग व रिसर्च अकाडमी यांच्या सर्वेक्षणानुसार भारतातील २६ सरकारी बॅंकांनी २०१३ ते २०१५ या कालावधीत कर्जासाठी थकीत कर्जासाठी केलेल्या रकमेची तरतुद व त्याचा नफा याची आकडेवारी दिली आहे. खालील तक्त्यावरुन या स्थितीची कल्पना येते.

बॅंकांचा नफा व बुडीत कर्जे

| वर्ष | बॅंकांचा नफा (कोटी रुपये) | बुडीत कर्ज (कोटी रुपये) | निव्वळ नफा (कोटी रुपये) |
|---|---|---|---|
| २०१२–१३ | १,२१,८३८ | ७१,२५६ | ५०,५८३ |
| २०१३–१४ | १,२७,६५३ | ९०,६३३ | ३७,०१९ |
| २०१४–१५ | २,८९,५८८ | १,००,२७७ | ३७,८२० |
| एकूण | ३,८७,५८८ | २,६२,१६६ | १,२५,४२२ |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, २०१३ ते २०१५ या कालावधीत २६ सार्वजनिक बॅंकांनी ३,८७,५८८ कोटी रुपये नफ्यातून २,६२,१६६ कोटी रुपयाची तरतुद बुडीत कर्जासाठी केली व १,२५,४२२ कोटी रुपये निव्वह शिल्लक नफा राहीला. अशा या थकीत कर्जाची समस्या दूर करायचा असेल तर काही उपाययोजना करणे आवश्यक असते.

उपाययोजना :

१. अनुत्पादक कर्जाचे प्रमाण वाढत असतांना ज्या बॅंका निष्क्रिय राहिलेल्या आहेत अशा बॅंकाबाबत सरकारने कठोर व वास्तवावादी विचार करायला हवा.
२. बॅंकांचे संचालनात तज्ञ संचालक, अर्थ, बॅंक, व्यापार, उद्योग इत्यादी तज्ञ घ्यावे
३. ज्या ग्राहकांवर / व्यावसायिकांवर कर्ज असेल त्यांच्या तारण म्हणून ठेवलेल्या मालमत्तेचा लिलाव करुन थकीत कर्जे भरुन काढावी.
४. बॅंकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ प्रमाणे रिझर्व बॅंक ऑफ इंडियाने केलेली कोणतीही कृती कारवाई आक्षेप घेता येणार नाही.
५. कर्जदाराला नोडयु, योग्य तारण, कर्जाचे कारण व कर्जाचे मुल्यांकन कर्ज वाटप करावे
६. कर्ज वसुली करतांना कर्जाचे हप्ते कमी करण्याकरिता परतफेडीची मुदत वाढवावी, तसेच [illegible] तयार करुन त्यामार्फत कर्ज वसुल करावे.
७. बॅंकांनी मोठे कर्ज न देता लहान–लहान कर्जाचे वाटप करावे जेणे करुन कर्ज वसूल करणे [illegible] होइल.
८. ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सोई–सवलती याविषयी आकारण्यात येणारे शुल्क कमी करुन ग्राहकांचे समाधान होईल अशा उत्तम प्रकारच्या सुविधा पुरविण्यास ग्राहकांचे समाधान होऊन ग्राहकांचा बॅंकांचा विश्वास वाढेल व ठेवीत वाढ घडून येईल.



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

आर्थिक स्थितीवर परिणाम :

बुडीत कर्जाचे प्रमाण वाढल्यास त्याचा बॅंकेच्या विकासावर तसेच देशाच्या आर्थिक विकासावर परिणाम होण्याची शक्यता असते बॅंकच्या वित्तीय व्यवस्थेतील पत खालावत जाते.

याचा अर्थ असा की, बॅंकांच्या थकीत व मोठया कर्जामुळे बॅंकांचा नफा कमी होऊन त्याचा विपरीत परिणाम उत्पन्नावर होतो. थकीत कर्जाची तरतुद ही बॅंकाच्या नफ्यातून होत असल्यामुळे बॅंकांचा नफ्याचा प्रमाण कमी होत आहे. बॅंकींग ऐज्युकेशन ट्रेनिंग व रिसर्च अकादमी यांच्या सर्वेक्षणानुसार भारतातील २६ सरकारी बॅंकांनी २०१३ ते २०१५ या कालावधीत कर्जासाठी थकीत कर्जांसाठी केलेल्या रकमेची तरतुद व त्यामुळे नफा याची आकडेवारी दिली आहे. खालील तक्त्यावरुन या स्थितीचा कल्पना येते.

बॅंकांचा नफा व बुडीत कर्जे

| वर्ष | बॅंकांचा नफा (कोटी रुपये) | बुडीत कर्जे (कोटी रुपये) | निव्वळ नफा (कोटी रुपये) |
|---|---|---|---|
| २०१२–१३ | १,२१,८३८ | ७१,२५६ | ५०,५८३ |
| २०१३–१४ | १,२७,६५३ | ९०,६३३ | ३७,०१९ |
| २०१४–१५ | २,८९,५८८ | १,०१,२७७ | ३७,८२० |
| एकूण | ३,८७,५८८ | २,६२,१६६ | १,२५,४२२ |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, २०१३ ते २०१५ या कालावधीत २६ सार्वजनिक बॅंकांना ३,८७,५८८ कोटी रुपये नफ्यातून २,६२,१६६ कोटी रुपयाची तरतुद बुडीत कर्जासाठी केली. १,२५,४२२ कोटी रुपये निव्वळ शिल्लक नफा राहीला. अशा या थकीत कर्जाची समस्या दूर करण्यासाठी असेल तर काही उपाययोजना करणे आवश्यक असते.

उपाययोजना :

१. अनुत्पादक कर्जाचे प्रमाण वाढत असतांना ज्या बॅंका निष्क्रिय राहिलेल्या आहेत अशा बॅंकांवर सरकारने कठोर व वास्तवावादी विचार करायला हवा.
२. बॅंकांचे संचालनात तज्ञ संचालक, अर्थ, बॅंक, व्यापार, उद्योग इत्यादी तज्ञ घ्यावे
३. ज्या ग्राहकांवर / व्यावसायिकांवर कर्ज असेल त्यांच्या तारण म्हणून ठेवलेल्या मालमत्तेचा लिलाव करुन थकीत कर्जे भरुन काढावी.
४. बॅंकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ प्रमाणे रिझर्व बॅंक ऑफ इंडियाने केलेली कोणतीही कृती कायद्याने आक्षेप घेता येणार नाही.
५. कर्जदाराला नोडयु, योग्य तारण, कर्जाचे कारण व कर्जाचे मुल्यांकन कर्ज वाटप करावे
६. कर्ज वसुली करतांना कर्जाचे हप्ते कमी करण्याकरिता परतफेडीची मुदत वाढवावी, असेल [illegible] तयार करुन त्यामार्फत कर्ज वसुल करावे.
७. बॅंकांनी मोठे कर्ज न देता लहान–लहान कर्जाचे वाटप करावे जेणे करुन कर्ज वसुल करण्यास सोपे होइल.
८. ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सोई–सवलती याविषयी अवगत करण्यात येणारे शुल्क कमी करुन योग्य समाधान होईल अशा उत्तम प्रकारच्या सुविधा पुरविण्यात. ग्राहकांचे समाधान होऊन ग्राहकांचा [illegible] विश्वास वाढेल व ठेवीत वाढ घडून येईल.

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 87(D)- Indian Financial Sector : Challenges and Prospects
UGC Approved Journal
E-ISSN : 2348-7143
January-2019

प्रभावहिन / वाढती निष्क्रियता :

बॅंकाच्या अनुत्पादक कर्जामध्ये वाढ होऊनही कर्ज वसुलीचे मार्ग मर्यादित व संकुचित आहेत. अनुचित मार्गाने कर्ज मंजुर होते. कर्ज मंजुरीला योग्य निकषाची खात्री करुन न घेता कर्ज देणे. शासनाकडून कर्जमाफी होईल या आशेवर कर्ज न फेडणे तसेच या वसुलीकरिता विशेश न्यायालयाची निर्मिती केलया गेली परंतु याबाबतचा अधिकचा ताण यामुळेही प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात.

भ्रष्ट अधिकाऱ्यांची समस्या :

भारतीय अर्थव्यवस्थेत भ्रष्टाचाराची किड आज सर्वच क्षेत्रात दिसून येते. बॅंकींग क्षेत्रात देखिल लाचखोर व भ्रष्ट अधिकाऱ्यांचे वर्चस्व वाढल्याने कर्जवाटप आणि कर्ज वसुली मोठया प्रकारे केली जात नाही व त्याची परतफेड केल्या जात नाही.

तत्वामधील विसंगती :

यशस्वी अधिकोषपणाची सुरक्षितता, तरलता, लाभता ही तत्वे आहेत. या तत्वांमध्ये विसंगती निर्माण झाल्यास बॅंकांच्या एन.पी.ए.मध्ये वाढ होण्यास मदत होते. याशिवाय तंत्रज्ञानातील कमतरता त्याचा अयोग्य वापर या कारणांमुळे बॅंकाचा एन.पी.ए.वाढत आहे.

कर्जमाफी व सरकारी योजना :

सरकारव्दारे बऱ्याच वेळा अनेक योजना आखल्या जातात. सरकारतर्फे अनेक वेळा कर्जमाफीची घोषणा केली जाते. या योजना कर्जदारासंबंधीच्या असल्यास कर्जवसुली होत नाही व त्याची जबाबदारी बॅंकांना स्विकारावी लागल्यास बुडीत कर्जाचे प्रमाण वाढत जाते.

एन.पी.ए.चे बॅंकांवर होणारे परिणाम :

एन.पी.ए.हा बॅंकांच्याा लाभप्रदतेवर परिणाम करणारा महत्वाचा घटक आहे. त्याचा परिणाम बॅंकांच्या आर्थिक परिस्थितीवर होत असतो तो पुढीलप्रमाणे

उत्पन्न व उत्पादन क्षमतेवर परिणाम :

कर्जदाराने कर्ज न भरल्यास त्याच्या एका बुडीत खात्याबरोबर सर्व खाती सुध्दा बुडीत होत असल्यामुळे या सर्व बुडीत खात्यावरील व्याजरुपी उत्पन्नात बॅंकेला मुकावे लागते. तसेच उत्पन्न घटल्यामुळे बॅंकेची माणसी उत्पादकता मोठया प्रमाणात वाढते.

व्यवस्थापन खर्चात वाढ :

बुडीत कर्जाचे प्रमाण वाढल्यास बुडीत खात्याच्या कर्ज वसुलीसाठी बॅंकेला अधिक खर्च करावा लागतो त्यामुळे त्यांच्या व्यवस्थापन खर्चात वाढ होते.

भांडवलाची कमतरता :

एन.पी.ए.मुळे भांडवल उभारणीवर विपरीत परिणाम होतांना दिसून येतो. कर्जाचे वाटप करुन कर्जाची रक्कम वसुल झाली नाही तर बचतीचे प्रमाण कमी होऊन बॅंकांना नफा कमी होते अशावेळी बॅंकांना नवीन किंवा जास्तीचे कर्जवाटप करता येत नाही.

ठेवीमध्ये घट :

एन.पी.ए.चे प्रमाण वाढल्यास बॅंकांच्या ठेवीत वाढ होत नाही. बुडीत खात्यात वसुल न झालेले व्याज उत्पन्नातून अधिकोषाला वजा करावे लागते, त्यामुळे बुडीत खात्याकरिता व्याजाची रक्कम भविष्यात बॅंकांना उत्पन्न म्हणून ग्राह्य धरता येत नाही. कर्जदार वर्ग आपल्या ठेवी जमा करीत नाही.

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

अशाप्रकारे थकीत कर्जे ही व्यापारी बँकापुढील मोठी समस्या ठरली आहे. हा प्रश्न गंभीर आहे व तो जास्त अवघड होत आहे यात दुमत नाही. बुडीत खात्यामुळे बँका डबघाईस आल्या आहेत. म्हणून लाखो ठेवीदारांचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्याकरिता या आजारी बँकांना आर्थिक अडचणीतून सोडविणे आवश्यक आहे. यासाठी बँकाना अधिक सुदृढ राहावे लागेल. बँकींग विषयक धोरण हे अर्थव्यवस्थेची प्राथमिकता लक्षात घेऊन ठरविण्यात यावी. कारण हे धोरण निर्यातीशी सांधा जोडणारे आहे. बँकांचे कर्ज जाणून–बुजून बुडविणे हा फौजदारी गुन्हा ठरवून त्याची यादी जाहीर करावी. संचालकांनी दिलेल्या Do's आणि Don't चे कसोशीने पालन केले पाहिजे. सरकारी बँकामध्ये राजकारणी सत्ताधारी लोकांचा होणारा हस्तक्षेप टाळला पाहिजे. बँकींग हा व्यवसाय आहे. कुणालाही थकबाकी असते, आजमितीला ॲनस्थेशिया देऊन शस्त्रक्रिया केलयावर हा एन. पी.ए.चा प्रश्न पूर्णपणे संपेल असे नाही. त्यासाठी बँकेला सतत डोळयात तेल घालून रात्र–दिवस जागरुक राहणे गरजेचे आहे असे करणाऱ्या बँकेलाच यश मिळते. बँकर ते कसून कामाला लागले पाहिजे तरच बुडीत कर्जाचे प्रमाण कमी करता येईल.

संदर्भ ग्रंथ :

1. जहागिरदार वि. व्य. (संपा) 'भारतातील आर्थिक सुधारणांची २५ वर्षे' सेंटर फॉर ॲकानोमिक ॲन्ड सोशल स्टडीज सेंटर, अमरावती २०१७.
2. प्रा.रायखेलकर/डॉ. दामाजी भारतातील अर्थव्यवस्था विद्या बुक्स पब्लिशेअर्स, औरंगाबाद, जाने. २०१३
3. जाधव तुकाराम, मुळीक, डॉ. सुरासिंगे, घोडके अमोल (संपा) 'बुलेटीन ऑफ युनिक ॲकॅडमी' पुणे वर्ष ४, अंक ६, सप्टें.२०१५
4. लोकसत्ता, अर्थसत्ता ३ जाने. २०१२ पेज नं. १०
5. गोविलकर विनायक, 'आर्थिक संकल्पना' डायमंड प्रकाशन, पुणे २००८.
6. गोडबोले अच्युत, 'अर्थात' राजहंस प्रकाशन प्रा.लि.पुणे–२०१२
7. lokstta.com
8. googleweblight.com
9. dailyhant.in

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

2018-19

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - III

Ajanta Prakashan

IMPACT FACTOR /
INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहीची सद्यस्थिती<br>**प्रा. डॉ. मा. म. गायकवाड** | १-९ |
| २ | संविधान आणि सामान्य माणूस<br>**सहा. प्राध्या. पवन द. महंत** | १०-१६ |
| ३ | डॉ. आंबेडकरांचे भारतीय लोकशाहीत योगदान<br>**प्रा. प्रमोद चंद्रभान वानखेडे** | १७-१९ |
| ४ | प्रजासत्ताकोत्तर मराठी साहित्यातील ठळक प्रवाह<br>**प्रा. डॉ. राजेश चवरे** | २०-२३ |
| ५ | भारतीय संविधान व स्त्री<br>**प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर** | २४-२७ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय लोकशाही<br>**प्रा. राजेश अनंतराव कांबळे** | २८-३२ |
| ७ | भारतीय संविधानात शिक्षणाचे स्थान<br>**डॉ. राजेश शंकरराव पत्तीवार** | ३३-३५ |
| ८ | भारतीय राज्यघटना आणि धर्मनिरपेक्षता<br>**प्रा. डॉ. ज्ञानेश्वर यावले** | ३६-३८ |
| ९ | भारतीय संविधान आणि स्त्रियांना मिळालेला सामाजिक व आर्थिक न्याय : एक अभ्यास<br>**प्रा. गायकवाड पी. के.** | ३९-४३ |
| १० | भारतीय संविधानाची उद्देशिका व व्यक्ती<br>**प्रा. डॉ. रजनिश बांबोळे** | ४४-४६ |
| ११ | भारतीय प्रजासत्ताकापुढील आव्हाने व संधी<br>**प्रा. लक्ष्मण एफ. शिराळे** | ४७-५१ |
| १२ | भारतीय प्रजासत्ताक आणि भारतीय संविधान<br>**प्रा. आचार्य व्ही. डी.** | ५२-५६ |
| १३ | धर्मस्वातंत्र्य आणि धर्मनिरपेक्षता<br>**श्री विलास आत्माराम देऊलकर** | ५७-६१ |




Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

# १०. भारतीय संविधानाची उद्देशिका व व्यक्ती

**प्रा. डॉ. रजनिश बांबोळे**
भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि. अमरावती.

**प्रस्तावना .**

ब्रिटीशांच्या पारतंत्र्यातून भारत देश स्वतंत्र होण्यापूर्वी संविधान सभेची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी दिल्ली येथे घेण्यात आली. भारतीय संविधानाला आकार देण्याचे प्रत्यक्ष स्वरूपात सुरवात झाली. भारतीय संविधान हे १८५६ च्या स्वातंत्र्य उठावापासून ते स्वातंत्र्य चळवळीतील जनसामान्यांच्या सहभागापर्यंत साऱ्याच घडामोडीतून आकारास येत होते. या प्रत्येक टप्या वरील जनसहभाग अर्थात लोकसहभाग आणि लोकांचे वैविध्य प्रश्न समोर ठेवून लोकांचे राज्य लोकांकरीता निर्माण केले आहे. भारतीय जनतेच्या आशा–आकांक्षा या सविधानाच्या माध्यमातून साक्षात रूप देण्याचे कार्य घटना समितीने केले आहे. भारतीय सविधानाच्या माध्यमातून लोकांच्या हातात राजकीय सत्ता हस्तांतरीत केल्या गेली त्यामधून भारतीय नागरीकांचे भवितव्य घडवून देणारे पहिले पाऊल ठरले. भारतीय संविधान सामाजिक क्रांती घडविण्याचे पहिले साधन ठरले असून सामाजिक क्रांतीच्या तत्वाला महत्व देवून भारतीय संविधानाने नजरेसमोर व्यक्तीला केंद्रस्थानी मानले आहे. भारताचे संविधान तयार करताना झालेल्या चर्चेतून नैतिक मूल्यांवर भर देवून लोकांनी आपापले भवितव्य घडविण्याची शक्ती देण्याचा आपल्या संविधानाने लोकशाही मूल्यांची विशेषतः न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांची वाट दाखवून देताना व्यक्ती स्वातंत्र्याचा व्यक्तीचे महत्व ओळखल्याचा भाव अंतकरणात जपून भारतीय संविधानाच्या उददेशपत्रिकेतून उहापोह केल्याचे दिसते.

**भारतीय संविधानाची उद्देशिका**

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरीकांसः

सामाजिक, आर्थिक व राजनैतीक न्यायः

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य

दर्जाची व संधीची समानता

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

आमच्या संविधानसभेस आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी याव्दारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण करीत आहोत..

वरील उद्देशिकातून भारतीय संविधान भारतीय लोकांचे भारतीय लोकांसाठी बनविले असून हे भारतीय संविधान आपलेच असले पाहिजेत या भावनेतून संविधान सभेच्या सदस्यांची तगमग होती असे दिसून येते.



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

**संशोधनाचा उद्देश**

भारतीय संविधानाच्या माध्यमातून भारतीय व्यक्तीमध्ये सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय निर्माण करणे हा मुख्य उद्देश आहे.

**परिकल्पना**

1) भारतीय समाजातील व्यक्तींमध्ये सामाजिक, आर्थिक, राजनैतिक न्याय निर्माण झाल्याचे दिसते.

भारतीय संविधानाने उद्देशिकामधून व्यक्तीला केंद्रस्थानी मानले आहे. समाजात राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला जात, धर्म, वंश, लिंग जन्मस्थान या आधारावर भेदभाव न करता अथवा पक्षपात न करता सर्वांना सामाजिक, आर्थिक, राजनैतिक विकासाची समान संधी दिल्या गेल्याचे दिसते.

आपल्या भारतीय समाजात सामाजिक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल वर्गातील लोकांना मुख्य प्रवाह आणण्यासाठी संविधानात विशेष सवलतीचा अंतर्भाव केल्या गेले आहे. संविधान निर्मात्यापुढे वैविध्य समाज आणि त्यातील ताणतणाव होते. अशावेळी तयार झालेले भारतीय संविधान अनेक बदल पचवून आजही **२९** राज्यातील **२१** भाषा आणि असंख्य बोली बोलणाऱ्या **१.२** अब्ज लोकांवर अधिराज्य करत असल्याचे दिसते. जगातील जवळपास प्रत्येक महत्त्वाच्या धर्माचे अनुयायी भारतात आहेत. हे भाषिक, धार्मिक वैविध्य पचवण्याचा संविधानात अंतविरोध मानता येईल पण अशा अनेक बाबी आहेत की भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेत हे संविधान भारतीय समाजाला साधणारे ठरले आहे.

भारतीय संविधानाच्या उद्देशिकात असे दिसते की, भारतीय समाजातील प्रत्येक व्यक्तीला सर्वांगीण विकास करता यावा या हेतूने सामाजिक, आर्थिक, राजनैतिक विकासाची संधी दिली आहे. या संधीतून प्रत्येक व्यक्ती आर्थिक, सामाजिक आणि राजनैतिक विकास करत असल्याचे दिसते.

आपल्या संविधानाला अभिप्रेत असलेल्या मानवी मुक्ती व प्रतिष्ठा यांसाठी संविधान तरतुद केल्या आहेत. त्याहीपुढे जावून असे म्हणता येईल की, भारतीय संविधानाने उद्देशिकाच्या अंतरंगातून व्यक्तीला समाज आणि राजकारणाच्यां केंद्रस्थानी मानले आहे. भारतीय संविधानाच्या आधाराने व्यक्तीचा लोकशाहीकडे प्रवास सुकर होत आहे. व्यक्तीला केंद्रस्थानी ठेवले की नाही यावर राज्यघटनेची वाटचाल अवलंबून असणार आहे.

भारतीय समाजातील व्यक्तीच्या राजकीय हिताच्या दृष्टीने देशातील सर्व व्यक्तींना राज्यकारभारात भाग घेण्याची संधी मिळाली असून देशाचा राज्यकारभार कसा चालविल्या जावा हे ठरवण्याचे स्वातंत्र्य लोकशाही व्यवस्थेत भारतीय लोकांना प्राप्त झाला आहे. मतदानातून निवडून गेलेले लोकप्रतिनिधी कायदे करत असल्यामुळे निर्वाचन प्रक्रिया निर्दोष असेल तेवढी कायदेमंडळ खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधीक ठरतात आणि जनप्रतिनिधींनी केलेल्या कायद्यात लोकांचे अंचूक प्रतिबिंब उमटते. भारतीय समाजातील व्यक्तींना स्त्री असो की पुरूष असो राजकीय विकासाच्या प्रक्रियेत राजकीय जाणीव जागृती निर्माण करण्याचे कार्य संविधानातून झाल्याचे दिसते.

भारतीय समाजातील व्यक्तीमध्ये हजारो वर्षापासून चालत आलेली सामाजिक विषमतेची उतरंड होती. परंतु भारतीय संविधानाने व्यक्तीच्या अंगी कमी–अधिक प्रमाणात असलेल्या गुणवत्ता व क्षमता ठेवून निसर्गाने केलेल्या अन्यायाचे निराकरण करणे हे सामाजिक न्यायाचे साध्य असले पाहिजेत. म्हणून समाजातील दुर्बल घटकातील लोकांना विशेष संधी दिल्या गेली तर त्या व्यक्तीचा सामाजिक स्तर उंचावल्या जात असल्याचे दिसते.



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

भारतीय संविधानाच्या चौथ्या प्रकरणात व्यक्तीची आर्थिक न्यायाची बाजू प्रकट केल्या गेली असली तरी प्रत्येक व्यक्तीला पर्याप्त आणि सुसंस्कृत माणसाला साजेसा, निरोगी जीवनमानासाठी आवश्यक असलेले अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवी जीवनाच्या अंगभूत गरजा पूर्ण झाल्याखेरीज संविधानाच्या उद्देशिकात निर्धारित केलेल्या आर्थिक न्यायाला कवडीमोल किंमत राहणार नाही असेही म्हणता येईल.

भारतीय समाजातील व्यक्तींना आर्थिक न्याय मिळवून द्यावयाचा असेल तर आर्थिक न्यायासाठी आवश्यक असलेली समाजातील आर्थिक विषमतेची दरी प्रमाणाबाहेर मोठी असून चालणार नाही. आर्थिक विकासातून निर्माण होणाऱ्या वस्तू व धनसंपदा यांचे लाभ समाजाच्या तळागाळापर्यंत न्याय प्रमाणात पोचले पाहिजेत व आर्थिक सत्तेचे अवाजवी केंद्रीकरण होण्यास प्रतिबंध घातला गेला पाहीजे. स्त्री पुरूषाच्या समान कामाला समान वेतन दिल्या गेले असले तरी किमान वेतनापेक्षा कमी रोजगार कोणालाही दिला जावू नये जेणेकरून भविष्य निर्वाह वेतनासारख्या सामाजिक सुरक्षा सेवा प्रत्येक व्यक्तीस लाभल्याचे दिसते. उत्पन्न आणि मालमत्ता या संबधित विषमता उत्तरोत्तर कमी–कमी होत जाईल अशी करपध्दती अवलंबण्यात आणली जावी असे उद्देशिकातून व्यक्तीला केंद्रस्थानी माणून व्याक्तीच्या हितासंबधी निर्णय घेतल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष**

भारतीय संविधानातील उद्देशिकांच्या न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता इत्यादी मूल्यांचे अध्ययन करताना असे दिसून येते की, भारतीय समाजातील प्रत्येक व्यक्तीला राजकीय विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी स्त्री आणि पुरूष या दोघांनाही अधिकाअधिक प्रमाणात मिळत असल्याचे दिसते. संविधानाच्या अंमलबजावणी नंतर तळागाळातील दुर्बल व्यक्तीना सामाजिक, आर्थिक, राजनैतिक या तीन्ही घटकांमध्ये विकास करण्याची समान संधी मिळाल्याचे दिसते. त्याशिवाय सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय जोपर्यंत पूर्णपणे मिळणार नाही तोपर्यंत भारतीय समाजातील दुर्बल घटकातील व्यक्तीचा अर्थात शेतमजूर, वनमजूर, कामगार, अनूसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास प्रवर्गातील व्यक्तीचा सामाजिक, आर्थिक, राजनैतिक न्याय भारतीय व्यक्तीना प्राप्त झाले असे कदापिही म्हणता येणार नाही.

**संदर्भ ग्रंथ**

१) डॉ. भोळे, भा.ल., "राजकीय सिध्दान्त" पिंपळापुरे प्रकाशन, महाल, नागपूर, जून २००३
२) डॉ. गवई, वामन, "भारतीय राजकारणाची संवैधानिक मीमांसा," विश्व पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रब्युटर्स, महाल, नागपूर, प्रथम आवृत्ती, २००८
३) डॉ.गायकवाड प्रदिप "भारताचे संविधान"समता प्रकाशन, लष्करीबाग, नागपूर एकेविसावी आवृत्ती, २०१३
४) Dr. . Pylee M.V. 'An Introduction to, "The constitution of India" Vikas Publishing House Pvt. Ltd. New Delhi, Edition 2009
५) लोकसत्ता 'लोकरंग' दि. ६ जानेवारी, २०१९



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi



प्रस्तावना 26
आली. आम्ही
म्हणायला ल
लोकशाहीचा,
भारतीय प्रजा 26
संविधान देश
प्रशासन काय
प्रत्यक्ष कारभ
संविधानाचे
भारताने ते
जाणीवांना न
बंधुता, न्याय
घडविण्याचा
शिकण्याचे,
यासारख्या
अंमलबजाव
भारतीय सम
जागतिक अ

Impact Factor – 6.261 | Special Issue - 180 | April 2019 | ISSN – 2348-7143
UGC Approved Journal List No. 40705

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

# SOCIAL AND SCIENCE INNOVATION

- EXECUTIVE EDITOR OF THE ISSUE -
Dinesh R. Jaronde

- CHIEF EDITOR -
Dr. Dhanraj T. Dhangar

Printed By : PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

For Details Visit To : www.researchjourney.net

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

४२. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बौद्धधर्म** ..... १२४
शिला विठ्ठलराव डोंगरे
४३. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान** ..... १२६
प्रा. विलास महादेवराव वानखेडे
४४. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मजुरांविषयीचे योगदान** ..... १२८
वसंत नथू हिस्सल
४५. **ग्रामीण कादंबरीतील प्रादेशिकतेनुसार बोली भाषेचे चित्रण** ..... १३१
डॉ. शिवानंद मच्छिंद्र गिरी
४६. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक बहुआयामी व्यक्तीमत्व** ..... १३४
शिवाजी रामराव कराळे
४७. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा धर्म व जातीविषयक दृष्टीकोन** ..... १३७
डॉ. मनोहर तोटरे
४८. **पुर्व विदर्भातील धान शेती** ..... १३९
प्रा. घनश्याम राऊत, डॉ. प्रदीप घोरपडे
४९. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर व धर्मांतर** ..... १४१
लता मोतीराम वाघमारे
५०. **अमरावती विभागातील संत्रा कलम उत्पादनाचे मुल्यांकन** ..... १४३
कु. प्रज्ञा रामभाऊ निंभोरकर
५१. **डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार** ..... १४६
रेणुका शिवाजी ईश्वरे
५२. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार** ..... १४९
प्रा. सोनाली खांडेकर
५३. **हिंदू कोडबिल व डॉ. बाबासाहेब आंबेडकर** ..... १५२
राजनंदिनी कैलास भालेराव
५४. **मादक पदार्थांचे कुटुंब, समाज व व्यक्तीवर होणारे परिणाम : एक समाजशास्त्रीय अभ्यास (संदर्भ: मुदखेड तालुका)** ..... १५४
प्रा. प्रकाश कोथळे
५५. **ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पुनर्वसीतांच्या पुनर्वसन धोरणाचे अध्ययन** ..... १५७
अमोल जगन्नाथ शेन्डे, डॉ. एस.एच. इंदूरवाडे
५६. **डॉ. बाबासाहेब आणि धर्मांतर** ..... १५९
वर्षा विठ्ठलराव तुरूकमाने
५७. **ग्रामीण पर्यटन आणि ग्रामिण विकास** ..... १६१
प्रा. निहार बोदेले
५८. **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वैचारिक संदर्भ आणि दलित आत्मकथने** ..... १६४
प्रा. डॉ. पदमाकर आ. पिटले
५९. **महिलांचे घटनात्मक व कायदेशीर अधिकार आणि महिला सक्षमीकरण** ..... १६८
प्रा. जगदिश रामदास चिमुरकर
६०. **महाराष्ट्रातील आदिवासी महिलांची सद्यस्थिती आणि समोरील आव्हाने** ..... १७०
ज्योती रामराव रामोड
६१. **महिला व राजकारण** ..... १७४
डॉ. राजेश्री एन. कडू
६२. **महिला व राष्ट्रीय पातळीवरील राजकारण** ..... १७७
प्रा. डॉ. आर. जी. बांबोळे
६३. **मानवी अधिकार व महिला** ..... १८०
प्रा. डॉ. रणधीर साठे
६४. **ग्रामिण महिला व सक्षमिकरण** ..... १८२
प्रा. मिलिंद हरीभाऊ ढाले
६५. **डॉ.आंबेडकराचा शैक्षणिक दृष्टीकोन** ..... १८४
प्रा. डॉ. अवथरे जयेश मो.

*Printed by* : PRASHANT PUBLICATIONS

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

RESEARCH JOURNEY Internationl Multidisciplinary E-Research Journal ISSN : 2348-7143
*Impact Factor (SJIF) - 6.261* | *Special Issue 180 :* Social and Science Innovation April 2019

# महिला व राष्ट्रीय पातळीवरील राजकारण

**प्रा. डॉ. आर. जी. बांबोळे**
सहाय्यक प्राध्यापक
भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि. अमरावती-४४४९०५

**प्रस्तावना :**

भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही प्रणाली स्वीकारणारा देश आहे. स्वातंत्र्य प्राप्तीच्या ६७ वर्षाच्या नंतरही महिला सहभागाची मूलभूत समस्या बनलेली आहे. भारतीय राजकारणात महिलांचा सहभाग अधिक वाढविल्याशिवाय महिला राजकीय सहभागाच्या विकासाची वाटचाल योग्यरितीने झाले असे म्हणता येत नाही. भारतीय महिलांच्या संदर्भात पुरूष मानसिकतेत बदल अपेक्षित आहे. भारतीय राजकारणात स्त्री-पुरूष समतेच्या आधारावर महिलांना राजकारणात विकासाची संधी देण्याची आवश्यकता असल्याचे दिसते. भारतीय समाजात महिलांना सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, शैक्षणिक, सांस्कृतिक मानवी जीवनाच्या विकासाच्या क्षेत्रात संधी न मिळाल्याने महिलांना गुलामगिरीचे भयावह जीवन जगावे लागले म्हणून महिलांना प्रत्येक क्षेत्रात संधी देण्याची गरजेचे आहे. लोकशाही प्रणालीत नागरिक आपल्या सामाजिक समुदायाशी निती निर्धारण प्रक्रियेत सहभागी होत असल्या तरी राजकारणाच्या आवश्यक असलेल्या सत्ता निर्धारण प्रक्रियेत महिलांच्या मर्यादा दिसून येतात.

आधुनिक लोकशाही प्रणालीत जोपर्यंत स्त्री व पुरूष या दोघांचाही भागीदारी राहत नाही तोपर्यंत समाजातील स्त्री व पुरूष समसमान राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्व प्रभावी दिसणार नाही. राजकीय सहभाग प्रभावी दिसणार नाही. राजकीय लोकतंत्रात स्त्री व पुरूष या दोघांनाही प्रतिष्ठा आणि राजकीय सहभागाची समान संधी आणि कायद्याचे समान संरक्षण प्रदान करण्यात आले. जगातील सर्व महिला शक्तीचे प्रदर्शन करत असल्याचे दिसते. परंतु जागतिक स्तरांवर महिलांची आंतरराष्ट्रीय संघटना प्रभावी नेतृत्व करत नसल्याचे दिसते. कोणत्याही समाजाचा विकासाचा आलेख त्या समाजातील महिला नेतृत्वाच्या विकासावरून निर्धारीत केल्या जातो. पुरूष आणि स्त्री दोघेही एकाच देवाचे अथवा ईश्वराचे लेकरे आहेत तर जगात या सर्व प्राण्यांमध्ये विषमता का केली? या विषमतेच्या समाजात पुरूष आणि महिला यांच्यात एक दुसऱ्यांपेक्षा श्रेष्ठ- कनिष्ठाची भावना कशी निर्माण झाली? असे विविध प्रश्न समाजासमोर निर्माण होतात. महिलांचा राष्ट्रीय पातळीवरील राजकारणामध्ये सहभाग लोकशाहीचा गाभा आहे. भारतातील संसदेच्या कनिष्ठ लोकसभागृहात १९५२ पासून ते २०१४ च्या सार्वजनिक निवडणूकीपर्यंत ८.४० टक्के महिलांचा राष्ट्रीय पातळीवरच्या राजकारणात प्रभाव राहीलेला आहे. म्हणून महिला आणि राजकारण या शोध लेखाच्या विषयाच्या अनुषंगाने राष्ट्रीय पातळीवर महीलांचा राजकारणात कसा प्रभाव याचे अध्ययन करणे गरजेचे आहे. सामाजिक आणि आर्थिक पातळीवर भारतीय महिलांचा दर्जा मान सन्मान आणि प्रतिष्ठा भयावह आहे असे चित्र पहावयास मिळते किंबहुना भारतीय राजकारणात विशेष महिलांच राज्य स्तरापासून तर राष्ट्रीय स्तरापर्यंत प्रभाव दिसत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने तामिळनाडूच्या दिवंगत मुख्यमंत्री जयललिता, उत्तर प्रदेशात माजी मुख्यमंत्री मायावती, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, सद्याचे विदेशमंत्री सुषमा स्वराज, संरक्षणमंत्री निर्मला सितारामन महाराष्ट्रातील सुप्रिया सुळे आणि लढाउ नेत्या मृणाल गोरे काही असे नावे भारतीय राजकारणाच्या संदर्भात महिलांचे घेणे आवश्यक वाटत असल्याचे दिसून येते.

राज्य विधीमंडळ आणि केंद्राच्या संसदेतील महिला आरक्षण विधेयक बील मंजूर झाले तर महिलांची राष्ट्रीय पातळीवरील राजकारणाची स्थिती बदलू शकते. भारतीय समाजात महिलांना क्रांतीकारक कार्य करण्यास हिस्सा मिळू शकतो. भारतीय महिला प्रतिनिधी प्रभावी नेतृत्व करू शकतात. म्हणून भारतीय राजकारणात महिलांना विकासाची संधी देणे गरजेचे ठरले आहे. सत्ताधारकांच्या निर्णय निर्धारण प्रक्रियेत महिला आपला प्रभावी ठसा उमटवून ध्येय धोरणांची अंमलबजावणी शासकीय योजना योग्य पध्दतीने राबवू शकतात. पंचायतराज व्यवस्थेतील ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या स्थानिक संस्थेमध्ये आणि शहरी भागातील नगरपालिका आणि महानगरपालिका या संस्थेमध्ये राजकीय विकासाच्या प्रक्रियेत महिलांना पाहिजे त्या प्रमाणात राजकीय नेतृत्वाची संधी मिळाली नव्हती. अर्थात स्थानिक पातळीपासूनसंसदेच्या वरच्या राजकारणाच्या पातळीपर्यंत महिलांना वगळण्यात आले होते.

१९५२ च्या सार्वजनिक निवडणूकीच्या काळात जवळजवळ तीस लाख महिलांची नावे मतदारांच्या यादीत नोंदवली नव्हती. मताधिकाराचे महत्व थोड्या फार प्रमाणात शहरी महिलांना जाणीव झाली होती पाहिजे त्या प्रमाणात मताच्या परिणामाची जाणीव महीलांमध्ये झाली नव्हती. १९७१ च्या निवडणूकीत महिलांच्या राजकीय नेतृत्व विषयक दृष्टीकोन मोठ्या प्रमाणात बदल्याचे दिसते. हिंदी भाषिक राज्यात महिलांनी गरिबी हटाव घोषणेला मते. दिल्या गेली. इंदिरा हटाव घोषणा देणाऱ्याच्या मते नोंदवली होती. जनसंघाचे नेते इंदिरा गांधी सरकारचे वर्णन विधवेचे सरकार असे करत असायचे. ते महिलांना अजिबात पचनी पडत नव्हते. पेटीकोट गव्हर्नमेन्ट अशी पुरूषसिंहानी केलेली चेष्ठा महिला मतदारांना जिव्हारी लागणारी होती. इंदिरा माताजी म्हणण्यात येवू लागले ते १९७१ च्या बांग्लादेश युध्दानंतर आणीबाणीच्या काळात संजय गांधी कुटुंब नियोजनाबाबतसक्ती करण्याचे धोरण अवलंबिले. ते मात्र हिंदी भाषिक राज्यांना आवडले नाही. १९९१ पासून महीला मतदारांचे प्रमाण वाढत गेले.

**विषयाची उद्दिष्टये :** महिला व राष्ट्रीय पातळीवरील राजकारण शोध लेखाच्या अनुषंगाने भारतीय राजकारणातील महिलांचा सहभाग कितपत वाढला आहे? या हेतूने काही उद्देश खालीलप्रमाणे ठरविण्यात



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

आले आहेत.

१. भारताच्या राष्ट्रीय राजकारणातील महिला स्थितीच्या वास्तविकतेचा अध्ययन करने हा आहे.

२. भारतीय राजकारणात महिला मतदारांच्या प्रभावाचे अध्ययन करने हा आहे.

**परिकल्पना :**

१. भारतीय राजकारणाच्या राष्ट्रीय पातळीवर महिलांचा सहभाग वाढविण्याकरिता प्रयत्न न केल्याचे दिसते.

भारताच्या राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात १९९६ ते २००९ पर्यंत पक्षनिहाय महिला पुरूष मते कितपत प्रमाणात मिळाले आहे ते खालील तक्त्याच्या आधारे दिसून येते.

**पक्षनिहाय महिला पुरूष मते**

| अ.क्र. | वर्ष | राष्ट्रीय कॉंग्रेस | | +/- | भाजप | | +/- | डावी आघाडी | | +/- |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरूष | महिला | | पुरूष | महिला | | पुरूष | महिला | |
| 1 | 1996 | 28 | 29 | +1 | 22 | 19 | -3 | 09 | 09 | 00 |
| 2 | 1998 | 24 | 27 | +3 | 28 | 23 | -5 | 06 | 07 | +1 |
| 3 | 1999 | 26 | 31 | +5 | 25 | 22 | -3 | 07 | 08 | +1 |
| 4 | 2004 | 26 | 27 | +1 | 23 | 22 | -1 | 07 | 09 | +2 |
| 5 | 2009 | 28 | 29 | +1 | 20 | 18 | -2 | 07 | 08 | +1 |

**संदर्भ :** योगेंद्र यादव व राजेश्वरी देशपांडे
(निवडणूक २००४ ते २००९)

१९९१ च्या निवडणूकीमध्ये ४२.९ टक्के महिला मतदार होत्या. १९९६ च्या निवडणूकीमध्ये ४४ टक्के महिला मतदार होत्या. १९९८ च्या निवडणूकीमध्ये ४६.९ टक्के महिला मतदार होत्या. १९९९ च्या निवडणूकीमध्ये ४७.७ टक्के महिला मतदार होत्या. २००४ च्या निवडणूकीमध्ये ५५.६ टक्के मतदान महिलांनी केले होते. अर्थात ५० टक्याहून अधिक महिलांनी मतदानाच्या अधिकाराचा वापर केल्याचे दिसते. महिलांनी भारतीय जनता पक्षाच्या तुलनेत राष्ट्रीय कॉंग्रेस आणि डाव्या आघाडीला झुकती मते दिल्या गेल्याचे दिसते. त्यामुळे महिला या लिंगभेद घटकावर आधारित मतदाराचे विश्लेषण योगेंद्र यादव आणि राजेश्वरी देशपांडे यांनी केले आहे. यामधून असा कल दाखवून दिला आहे की, भारतीय जनता पक्षाच्या तुलनेत राष्ट्रीय कॉंग्रेस आणि डाव्या आघाडीला महिलांनी जास्त मतदान केल्याचे दिसते.

भारताच्या राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात अर्थात राज्य विधीमंडळ ते संसदेपर्यंत महीलांना समान स्वरूपाची संधी देण्यात यावी याकरीता अनेक प्रयत्न केल्या गेले असले तरी १९५२ ते २०१४ च्या लोकसभेच्या निवडणूकीत महिला संधीच्या वाटामध्ये अधिक बदल न झाल्याचे खालील तक्त्यामधून दिसून येते.

**१९५२ ते २०१४ पर्यंत संसदेत महिला प्रतिनिधित्वाची निर्धारित संख्या**

| अ.क्र. | वर्ष | लोकसभेत निर्वाचित सदस्य संख्या | लोकसभेत निर्वाचित महिला प्रतिनिधीची संख्या | लोकसभेत निर्वाचित महिलांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | १९५२ | ४९९ | २२ | ४.४० |
| २ | १९५७ | ४९४ | २७ | ५.४६ |
| ३ | १९६२ | ४९४ | ३४ | ६.८८ |
| ४ | १९६७ | ५२० | ३१ | ५.७६ |
| ५ | १९७१ | ५१८ | २२ | ४.०५ |
| ६ | १९७७ | ५४२ | १९ | ३.५० |
| ७ | १९८० | ५४२ | २८ | ५.२९ |
| ८ | १९८४ | ५४३ | ४४ | ७.७ |
| ९ | १९८९ | ५४३ | २७ | ५.११ |
| १० | १९९१ | ५४३ | ३९ | ७.४८ |
| ११ | १९९६ | ५४३ | ४० | ७.१८ |
| १२ | १९९८ | ५४३ | ४३ | ७.९१ |
| १३ | १९९९ | ५४३ | ४५ | ८.२८ |
| १४ | २००४ | ५४३ | ४५ | ८.२८ |
| १५ | २००९ | ५४३ | ५९ | १०.१ |
| १६ | २०१४ | ५४३ | ६२ | ११.४१ |

१९५२ च्या सार्वजनिक लोकसभा निवडणुकीमध्ये २२ महिला प्रतिनिधी लोकसभा सभागृहात निवडून आल्याचे दिसते. महिला प्रतिनिधी प्रमाण लोकसभा सभागृहात निर्वाचित सदस्य संस्थेच्या प्रमाणात ४.४० टक्के प्रमाणात होते. सद्यस्थितीत भारताचा प्रत्येक राजकीय पक्ष महिलांना राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात संधी देण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसते. यावरून असे म्हणता येईल की, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताच्या राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात जास्तीत जास्त ८ ते १० टक्के महिला प्रतिनिधींना राजकीय विकासाची संधी दिल्या गेल्याचे दिसते.

**निष्कर्ष :**

भारतीय राजकारणाच्या प्रवाहात मुख्यत: पुरूष वर्चस्वाचा प्रभाव दिसते. महिला प्रतिनिधींना कौटुबिक हितसंबंधाची जबाबदारी स्वीकारावी लागत असल्याचे दिसते. त्या कारणास्तव महिलांना राजकारणापासून दूर रहावे लागत असावे कारण भारतीय राजकारणाच्या सत्ता निर्धारित करणाऱ्या प्रक्रियांमध्ये महिलांना पुरूष सहभागी करत नसल्याचे दिसते.. ज्यावेळेस भारतीय संसदेत महिला आरक्षण विधेयक मंजूर होईल त्यावेळेस अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि खुले प्रवर्गातील महिलांचा राजकारणात अधिक सहभाग वाढू शकते आणि सर्वच पातळीवरील महिलांमध्ये राजकीय जागृती, जाणीवा निर्माण होवून राजकारणाच्या मुख्य प्रवाहात स्वप्रेरणेने सहभागी होवू शकतात असे झाले तर भारतीय राजकारणाचा उत्कर्ष झाल्याशिवाय राहणार नाही आणि भारतीय लोकतंत्राचा मोठी जीत झाले असे म्हणता येईल.

**उपाय :**

१. भारतीय राजकारणाच्या मुख्य प्रवाहात महिलांना आणण्यासाठी राज्य विधिमंडळ आणि संसदेत राखीव जागा निर्धारित करावेत.

२. राजकारणाच्या संदर्भात महिलांमध्ये जागृती निर्माण



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

करण्यासाठी लोकजागृती कार्यक्रम महाविद्यालय व विद्यापीठातून देण्यात यावे.

३. भारतातील राजकीय पक्षांनी महिलांना निवडणूकीत उमेदवार महणून जास्तीत जास्त प्रमाणात संधी देण्यात यावी.

४. भारतीय राजकारणातील महिलांकडे पुरूषाचा पाहण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे.

**संदर्भ :**

१. बंग, के. आर., 'महाराष्ट्र शासन व राजकारण', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती, २०१३.

२. चौधरी सुनिता ''भारतीय समाज मे आरक्षण'', सुमित इन्टर प्राहिजेस, नई दिल्ली, २०१०.

३. देशपांडे राजेश्वरी, ''महिला सहभाग निवडणूक'', २००४ ते २००९, ईपीडब्ल्यु १८ डिसेंबर, २००४.

४. लोकराज्य मासिक मार्च २०१४

५. पांडे दया, ''डिसीजन अॅण्ड अॅक्शन रिसर्च जर्नल'', डिसेंबर, २०१५.

६. पवार वैशाली, ''महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख'', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, २०१२.

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

2018-19
(1)

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - IV

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ASSISTANT PROFESSOR
S.M.V. MORSI

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

9404689783

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - IV January - March - 2019

## Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2018 - 5.5**
**www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ३१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीव्यवस्थाउ निर्मूलन विषयक विचार

**डॉ. संदिप मनोहरराव राऊत**
इतिहास विभाग प्रमुख, भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि. अमरावती.

आपल्या भारत देशामध्ये प्राचीन काळापासून जाती व्यवस्था अस्तीत्वात आहे. आजच्या दशकात भारत देशात पाच ते सहा हजार जाती, जनजाती नांदत आहे. जाती मध्ये पोटजाती तर हजारोंने आहे त्याची गणना करण शक्य नाही आज मात्र औद्योगिक कारणामुळे पुर्वीला जो खालच्या जातीला स्पर्श करणे पाप समजल्या जात होते. त्याच प्रमाण सार्वजनिक ठिकाणी पुरते कमी झाले. मात्र अजुनही जाती व्यवस्थेला आधुनिक रूप आताची पिढी देताना दिसत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्वी अनेक विचारवतांनी आपले विचार जाती व्यवस्था निर्मूलन विषयक मांडले त्यामध्ये महात्मा ज्योतीबा फुले, शाहू महाराज, स्वामी श्रध्यानंद, लाल लजपत राय, राजाराममोहन रॉय, भाई परमानंद, आचार्य पी. सी.रे, सी दल जदुनाथ सरकार, लाला हरदयाळ इ. आपले मत माडले. जाती भेदामुळे हिंदू एक राष्ट्रीयत्त्वाच्या भावनेस मुकले आहे. जाती भेद राष्ट्रीय ऐक्याचा वैरी आहे. असे इतिहासकार जदुनाथ सरकार यांचे मत आहे.[१] लाल हरदयाळ म्हणतात की, जाती व्यवस्था हा भारता एक शाप आहे. जोपर्यंत आपन जाती भेद पाळत आहो. तोपर्यंत भारत स्वतंत्र्य राज्य स्थापन करणे कधी शक्य नाही. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती व्यवस्था निर्मूलन विषयक आपले विचार मांडून भारतातील जाती, त्यांचा उगम, विकास आणि वास्तविकता यांचे विश्लेषण करून भविष्यातील जाती व्यवस्थेचे धोके याविषयी संशोधनपूर्ण मांडणी करून जाती निर्मूलना विषयी उपाय सांगितले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दोन निबंध अनुक्रमे ९ मे १९१३ साली कोलंबिया विद्यापीठात त्यांनी भारतातील जाती त्यांचा उगम, विकास आणि वास्तविकता या नावाने वाचलेला निबंध व १९३५ साली लाहोरच्या जातपात तोडक मंडळाच्या संमेलनासाठी बाबासोबांनी जो निबंध तयार केला होता तिथे वाचला गेला नाही. १९४४ साली बाबासाहेबांनी हे दोनही निबंध एकत्रकरून नवीन प्रबंध लिहीला. मात्र काही काळातच तो डॉ. बाबासाहेबांनी तो प्रकाशित केला.[२] यावरून असे दिसून येते की, डॉ. बाबासाहेब जाती निर्मूलन विषय चिंतन व मनन विद्यार्थी दसे पासुनच सुरू होते.

जाती भेद हा हिंदू धर्मावरील असलेला सर्वात मोठा कलंक आहे. त्यामुळे देशाचे आर्थिक, राजकिय, सामाजिक, मानसिक नुकसान तर होतेच पण ही जाती व्यवस्था मानसाला साधे मानुसपण देत नाही यांची बाबासाहेबांना जन्मभर खंत होती. जाती भेदाचे चटके त्यांनी जवळून अनुभवले होते. हिंदू समाजात जाती का निर्माण झाल्या त्यांना अभेद चिरबंदी कोणी केल्या कशा केल्या ही दुष्ट जाती प्रथा नष्ट करण्यासाठी काय करायली हवे.[३] यावर डॉ. बाबासाहेबांनी जेवढा दिर्घ व सखोल अभ्यास केला तेवढा आजवर कोणी केला नाही.



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

डॉ. बाबासाहेब हे जाती संस्थेविषय मांडणी करतांना काही निवडक विचारवंताचे विचार मांडतात.

१) मि. सेनार्ट :- फ्रेंच विद्वान जाती लक्षण विषय सांगतो की, "जात ही अनुवंशिकतेच्या दृढ बंधनानी तत्वशः बाधलेली एक घनिष्ठ संस्था होय."

२) मि. नेसफिल्ड :- "जात हा असा लोकसमुह असतो की, इतर लोक समुहातील लग्न व खाने पिने याबाबतीत परस्पर संबंध मुळीच नसतो."

३) सर एच.रिस्ले :- मते, "जात ही काही कुटूंब किंवा कुटूंबसमुह यांच्या एकत्रीकरणाने तयार होते"[४]

हे काही निवडक विचार जाती विषयी माडल्यानंतर डॉ. बाबासाहेबांनी परिक्षण करून पुढील विषयाची मांडणी केली आहे. भारतीय जाती ह्या एकसंघ समजाचे कृत्रीमपणे लचंके तोडून निर्माण केलेली निश्चित व स्थिर असे घटक होत या प्रत्येकावर जात्यंतर्गत विवाहाच्या रुढी द्वारे परस्पर मिसळून जाण्याची बंदी घालण्यात आली आहे. अशा तऱ्हेणे अपरिहार्यपणे निष्कर्ष निघतो की, जात्यंतर्गत विवाह हेच जातीचे व्यवस्थेदक लक्षण ठरते. आणि जात्यंतर्गत विवाहची रूढी ही जर आपण नष्ट करू शकलो तर आपण जातीची घडण व उगम प्रत्यक्षपणे सिध्द केल्यासारखे होईल. पुढे डॉ. बाबासाहेब म्हणतात की, जाती व्यवस्थेच्या गुहेची जात्यंतर्गत विवाह ही गुरूकील्ली आहे.

डॉ. बाबासाहेब पुढे म्हणतात की, भारतात प्राचीन काळी पुढील वर्ग होते १) ब्राम्हण किंवा उपाध्याय वर्ग २) क्षत्रिय किंवा सैनिकी वर्ग ३) वैश्य किंवा व्यापारी वर्ग ४) शुद्र किंवा शेतकरी, शेतमजुरांचा वर्ग ही वर्ग पध्दती होती.[५] ही गोष्ट विशेषत्वाने लक्षात घ्यायला हवी. या पध्दतीत पात्रता मिळल्यानंतर त्याला वर्ग बदलवता येवू शकत होता. त्यामुळे वर्गातील व्यक्ती बदलत राहत असत. केव्हा तरी उपाध्याय वर्गाने आपल्याला सामाजिक संबंधाच्या बाबतीत स्वतः वेगळे करून घेतले. श्रम विभागणीच्या तत्वानुसार बाकी वर्गाची विभागणी झाली. यांचे कारण पुढील प्रमाणे डॉ. बाबासाहेब देतात, अंतर्गत विवाह व प्रवेशबंद पध्दती ही उपाध्याय वर्गाकडून सुरवात झाल्यामुळे सर्व अब्राम्हण पोटविभागणी किंवा वर्गानी अतःकरणपुर्वक तिचे अनुकरण केले व पाळीपाळीने तेही अंतर्गत विवाह पाळणाऱ्या जातीत रूपांतरीत झाले. विभाजनाच्या प्रक्रीयेत वाटचाल करत असताना या अनुकरणाचा साथीचा संसर्ग सर्वच पोट विभागाना झाला त्यांने सर्वांना जातीचे रूप दिले. अनुकरणाची प्रवृत्ती मानवी मनात खोलवर रूजवीलेली असून भारताच्या विभिन्न जातीच्या घडणीत अपुरे स्पष्टीकरण आहे असे वाटू नये या विषयी डॉ. बाबासाहेब वॉल्टर बँगहांट यांची अनुसरण पध्दती ची व्याख्या सागतात.

वॉल्टर बँगहोट म्हणतो की, अनुकरण प्रवृत्ती ऐच्छिक किंवा जाणीव पूर्वक असते असे आपण मुळीच समजता कामानये या उलट तिची बैठक मुख्यतः मनाच्या अत्यंत सुप्त भागात असते व या सुप्त मनातील भावनांचा जाणीव होण्याच्या दृष्टीने या भावना इतक्या गुढ असतात की कार्य होत असतांना सुध्दा त्या जानावत नाही. आपल्या स्वभावातील अनुकरणप्रियतेचा मुख्य आधार म्हणजे आपली श्रध्दा होत. यावरून जातीची निर्मिती हा अनुकरणाच्या सिध्दातूनच झाली असून समाजाच्या अनुकरणातूनची व्यवस्था घट्ट होत गेली.[७]



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

जाती व्यवस्था हा भारतीय समाजाला लागलेला कलंक आहे. मात्र ही जाती व्यवस्था अनुकरणातून निर्माण झाली आहे. असा अनुकरण सिध्दीत डॉ. बाबासाहेबांनी मांडला. सामाजिक जिवना मध्ये जातीव्यवस्था ही वाईट प्रथा आहे. त्याची काही लक्षण बाबासाहेबांनी मांडली असून ती पुढील प्रमाणे.

१) **जन्मावर आधारीत व्यवस्था** :- डॉ. बाबासाहेबाचे मते चार वर्गाचे विभाजन हे जन्मावर आधारीत आहे. त्यामुळे व्यक्तीमधील गुण व प्रेरणा याला जाती व्यवथेमध्ये कुठले ही स्थान नाही या व्यवस्थेमुळे मणूष्याच्या प्रेरणा आणि उत्साह नष्ट होतो.

२) **कार्यकुशलतेचा अभाव :-** जाती व्यवस्था ही जन्मावर आधारीत असल्याने जन्मताच त्याचे कार्य निर्धारीत केलेले असते. त्याच्या अंगी असलेले स्वाभाविक गुण, क्षमता यावर आधारीत नसुन वंश आणि माता पित्यांचा सामाजिक स्तर यावर अधारीत असते. त्यामुळे त्याच्या स्वाभाविक गुण व क्षमता नष्ट पावतात व कार्य कुशलता कमी होते.

३) **स्थिरता :-** डॉ. बाबासाहेबांच्या मते, कोणताही व्यक्ती जाती व्यवस्थेच्या कारणाने वंशपंरपरेने प्राप्त व्यवसाय आपल्या इच्छेनुसार बदलु शकत नाही या कारणामुळे जाती व्यवस्थेला सामाजिक स्थिरता प्राप्त झाली आहे. या स्थिरतेमुळे समाजातील उद्योगशिलता व गतीशिलता नष्ट होऊन बेरोजगारी निर्माण होते.

४) **संकोचित वृत्ती :-** डॉ. बाबासाहेबाच्या मते, प्रत्येक जाती ह्या आपल्या अस्तित्वासाठी नेहमी चिंतीत असतात याचा परिणाम असा होतो की, विविध जातीच्या सदस्यामध्ये सहयोगाची भावना राहत नाही. तर ते परस्परापासून वेगळे राहतात. यामुळे हिंदू समाजातील राष्ट्रीयत्वाची भावना नष्ट होण्यास संकोचित वृत्ती हे प्रमुख कारण आहे.

५) **रूढी पंरपरा :-** डॉ. बाबासाहेब म्हणतात की, प्रत्येक जाती मध्ये अनेक रूढ़ी पंरपरा व वाईट चालीरिती आहे. जाती व्यवस्थेमुळे त्याचे अनुकरण केले जाते कारण की, जर जातीतील परंपरा पाळल्या नाही तर आपल्याला समाजातून बहिष्कृत करण्याची भावना त्याच्या मनात निर्मात होते.

६) **विवाह संबंधातील संकोचित वृत्ती :-** डॉ. बाबासाहेब म्हणतात की, जाती व्यवस्थेमुळे विवाह संबंध हे जाती अंतर्गत विवाहाला मान्यता आहे. परिणामी आंतरजातीय विवाहाला वाईट दृष्टीतून पाहल्या जाते. विवाह जर आंतरजातीय केला तर समाजातून बहिष्कृत करण्याची भिती लोकांना वाटते म्हणून आंतरजातीया विवाहाला आजही हिंदू समातात मान्यता नाही.

७) **जाती जाती मधिल भेदभाव :-** डॉ. बाबासाहेब म्हणतात, जाती व्यवस्थेमध्ये सर्वात वाईट गोष्ट कोणती असेल तर एक जाती दूसऱ्या जातीची घृणा करते त्यामुळे असहिष्णुता मोठ्या प्रमाणात वाढत आहे. प्रत्येक जातीतील लोक आपल्या जातीचा गौरव करून दुसऱ्या जातीला हिन समजून आनंद घेतात. या जाती अभिमानामुळे समाजातील परस्पर सौदाहर्य व विकास नष्ट पावत आहे.[८]

जन्मावर आधारीत व्यवस्था, स्थिरता, संकोचित वृत्ती व परस्पराबंद्दल असाहीष्णुता हे जाती व्यवस्थेचे महत्वाचे लक्षन आहेत. त्यामुळे समाजात एकीचा अभाव व राष्ट्रीय एकात्मतेचा अभाव निर्माण होऊन देश प्रगती करून शकत नाही हे बाबासाहेबांचे मत होते.



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

| 87 | रोजगाराच्या दृष्टीकोणातून प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्व | के.जी.राजपूत | 243-244 |
| 88 | FDI IMPACT ON INDIAN ECONOMY | D. P. Bele and M. M. Pimple | 244-247 |
| 89 | GROWTH OF FDI | K. V. Dhawale | 248-249 |
| 90 | ग्रामगीता आधारीत शतोन्नती करीता थेट परकीय गुंतवणूकीचे महत्व | ए. ए. नांदगावंकर | 249-250 |
| 91 | RURAL DEVELOPMENT AND DIGITAL VILLAGE | S.B.Kadu and S.K.Rodde | 250-253 |
| 92 | IMPACT ON FOREIGN DIRECT INVESTMENTS IN INDIA | S. T. Kute | 253-256 |
| 93 | F.D.I. IN VARIOUS SECTOR OF INDIAN ECONOMY | G.N. Gajbhiye and B. R. Oberoi | 257-258 |
| 94 | IMPACT OF FDI ON GDP | P. V. Pohare | 259-262 |


Principal
Bharatiya Mahavidyalaya
Morshi, Dist. Amravati (M.S.)

# भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचे परीणाम

दिपक एन. काळे
भारतीय महाविद्यालय, मोर्शी
dipakkale99@gmail.com

## प्रस्तावना

कोणत्याही अविकसित व विकसनशील देशात मुळात राष्ट्रीय उत्पन्न मर्यादित असते. म्हणुन बचत मर्यादित असते. त्याचा स्वाभाविकच परीणाम म्हणजे भांडवल निर्मिती कमी होते. परंतु औद्योगिकीकरणासाठी तर भांडवलाची मोठी आवश्यकता असते. अशा विषम परिस्थितीत देशाबाहेरुन आलेल्या भांडवलाचे स्वागत करणे हा मार्ग असु शकतो.

देशाबाहेरुन आलेले भांडवल म्हणजे विदेशी गुंतवणूक होय. काही देशाच्या सरकारकडे, उद्योजकाकडे, वित्तीय संस्थाकडे, भरपुर भांडवल असते. त्याचा वापर देशात करता येतो. तसाच विदेशातही करता येतो. हे भांडवल जेव्हा विदेशात उद्योग व्यापारासाठी किंवा केवळ उत्पन्न मिळविण्यासाठी (जसे व्याज, लाभांश, रायल्टी, भाडवली नफा ई.) गुंतविले जाते. तेव्हा त्याला विदेशी गुंतवणूक म्हणतात.

गुंतवणुकदाराच्या देशाबाहेरील दुसऱ्या देशातील उद्योगात दिर्घकाळासाठी हितसंबंध निर्माण करणाऱ्या गुंतवणूकीला थ्रू असे संबेधतात. एक पालक उद्योग (गुंतवणूकदार) विदेशातील सहयोग कंपनीत गुंतवणूक करुन बहुराष्ट्रीय कंपनीत रुपांतरीत होते. अर्थात, अशी गुंतवणुक केल्यानंतर पालक उद्योगाकडे सहयोगी कंपनीचे नियंत्रण येते.

## विदेशी भांडवलाची आवश्यकता :

अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीने परकीय भांडवलीची भुमिका अत्यंत महत्वाची असते. विकास विषयक आधुनिक दृष्टीकोन स्विकारणाऱ्या अर्थतज्ञाच्या मते उपलब्ध साधने व गरजा यामध्ये समन्य साधण्याच्या दृष्टीने परकीय भांडवलाची आवश्यकता असते. जगातील बहुतांश देशानी परकीय भांडवलाची विकासातील भुमिका महत्वाची मानुन परकीय भांडवलाच्या देण्या घेण्यास सुरुवात केली. विशेषता अविकसीत व विकसनशील राष्ट्रांना विकासाचा वेग वाढविण्यासाठी परकीय भांडवलाची आवश्यकता निर्माण झालेली दिसून येते. विविध मार्गानी येणारे परकीय भांडवल देशाच्या आर्थिक विकासात महत्वाची भुमिका पार पाडते. परकीय भांडवलाची विकासातील भुमिका काही मुद्यांचा आधारे स्पष्ट करता येईल.

**१) नैसर्मिक सांधनांचा पर्याप्त वापर :**

भारताचे वर्णन "जेथे गरीब जनता राहते असा श्रीमंत देश" या शब्दाला करण्यात आली आहे. भारता सारख्या विकसनशिल देशामध्ये नैसर्गिक साधन सामुग्री विपुल प्रमाणात मोठया प्रमाणावर भांडवलाच्या उपलब्धतेमुळे हा प्रश्न सोडविता येते. आर्थिक विशमता कमी, दारीद्रय निर्मुलन, रोजगार वाढ ई. बाबी साध्य होवुन आर्थिक विकासाला मदत होवुन विविध उपक्रम व योजना राबविणे शक्य होते.

**२) दृष्टचक्र तोडण्याकरीता सहाय्यक :**

प्रत्येक देशाच्या अर्थकारणाची जडणघडण निश्चित करणारे काही महत्वाचे घटक असतात. उदा. उत्पादनाच्या साधानाची उपलब्धता उत्पन्नाची पातळी, वस्तूकरीता एकुण मागणी देशातील एकुण बचत, भांडवल निर्मितीचा दर, विभीन्न क्षेत्रातील भांडवली गुंतवणूक, हया सर्व घटकाचा सामुहीक अस्तित्वाला दृष्टचक्र असे म्हणतात. असे दृष्टचक्र तोडण्याकरीता विदेशी भांडवलाची गरज असते.

**३) आधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता, तांत्रीक प्रगती :**

भारतासारख्या विकसनशिल देशात भांडवलाप्रमाणे आधुनिक तंत्रज्ञानाची कमतरता प्रकर्षने जागणते. उदा. जलद विकासाचे दृष्टीने विदेशी भांडवलाचा व्यवस्थित उपयोग करुन घेतल्यास विकसनशिल देशाला विदेशी भांडवलाप्रमाणेच आधुनिक तंत्रज्ञान सुध्दा उपलब्ध होते. हया विशिष्ट स्थितीला मुद्रा विस्तार असे म्हणतात. काही वेळा अर्थवयवस्थेवर प्रतिकुल परिणाम होतात. परंतु उत्पादनात वाढ झाल्यामुळे गरीब जनतेला रोजगार मिळुन अर्थव्यवस्थेत चलन वेग वाढतो.

**४) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ :**

अविकसित देशानी विदेशी भांडवलाचा महत्तम उपयोग करुन घेल्यास अर्थव्यवस्थेच्या विभिन्न क्षेत्रामध्ये विकसाचे अनेक महत्वकांक्षी कार्यक्रम राबविता आले. शेती उद्योग वाहतूक दळणवळण, व्यापार या क्षेत्रामध्ये विदेशी गुंतवणूकीचा वापर केल्यामुळे राष्ट्रीय उत्पादनात वाढ होते. पुर्वीपेक्षा सामान्य व्यक्तीचे उत्पादनात वाढ होवुन राहणीमानाचा दर्जा वाढण्यास मदत होते.

**५) अंर्तगत बचतीला प्रोत्साहन :**

अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात मोठया प्रमाणात गुंतवणूक केल्यामुळे उत्पादनात वाढ. त्यामुळे अंतर्गत बचती वाढण्यास मदत होत. बचतीच्या वाढीमुळे भांडवल निर्मितीत वाढ. तसेच चैनीच्या वस्तु, प्रतिष्ठेच्या वस्तुत वाढ, अशा अनेक कारणामुळे विदेशी भांडवचलाचा फायदा मिळतो.

**६) उद्योजक वर्गास प्रोत्साहन :**

अविकसित देशामध्ये काही वयक्ती श्रीमंत असतात परंतु हया व्यक्ती व्यापारी मनोवृत्तीच्या असतात. त्यामुळे हया व्यक्तिव्दारे उद्योगात पैसा गुंतविला जात नाही. परंतु अशा कालावधीत विदेशी गुंतवणूकीकरीत परवानगी देणे राष्ट्रीय हिताचे ठरते. विदेशी गुंतवणूकदारांना परवानगी दिल्यामुळे विदेशी तंत्रज्ञानाचा वापर होतो. त्याचे अनूकरण आपल्या देशातील उद्योजक करुन विकासाची पावले उचलुन उद्योगात गती निर्माण होते. नविन उद्योजक तयार होतात.

**७) आर्थिक नियोजनात यश :**

आधुनिक काळात अविकसित व गरीब देशाच्या दृष्टीने आर्थिक नियोजन ही विकासाची गुरुकिल्ली आहे. शेवटी आर्थिक नियोजनाचे यश हे भांडवलाच्या उपलब्धतेवर अवलंबुन असते. म्हणून अशा



Principal
Bharatiya Mahavidyalaya
Morshi Dist. Amravati (M.S.)

देशांनी विदेशी भंडवलाचा उपयोग करुन घेतलयास नियोजनातील अमलबजावणीत होणारा सर्वात महत्वाचा अडथळा सहजपणे दुर होतो.

८) आंतरराष्ट्रीय सहाकार्यात वाढ :

समाजातील उत्पादक साधनावर मालकी असणारा वर्ग नेहमी श्रीमंत असतो. सामान्य जननतेची पिळवणूक करुन अधिक श्रीमंत होण्याचा प्रयत्न तो करित असतो. दोन वर्ग निर्माण होतात. या वर्गामध्ये विषमता सतत वाढत जाते. अशा समाजात दिर्घकाळ टिकणारी शांतता निर्माण होवु शकत नाही. यामध्ये गरीबाचे शेषण होते.

परंतु विदेशी गंतवणूकीमुळे नविन उद्योगाचा विकास होवून उत्पादनात वाढ, रोजगारात वाढ होते. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होवून दोन देशामधील तंत्रज्ञानात वाढ होते. आर्थिक सहकार्य निर्माण होते. शोषणाची गती थांबते. नविन विकासात महत्वाची सामाजीक शांतता निर्माण होते.

| सेक्टर | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | मर्यादा | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|
| सेवाक्षेत्र | २६५८९ | २८४११ | २०९५८ | १५८१ | १,०६,९९२ | २१: |
| कम्प्युटर, सॉफ्टवेअर व हार्डवेअर | ५८२३ | ७३२९ | ४३५० | ७८५ | ४४,६११ | ९: |
| दुरसंचार | ५१०३ | ११७२७ | १२३३८ | १९१४ | ४२,६२० | ८: |
| रियल इस्टेट | ८७४९ | १२६२१ | १३५८६ | २४६ | ३७,६१५ | ७: |
| निर्माण क्षेत्री विभीचा | ६९८९ | ८७९२ | १३५४४ | ३४५ | ३६,०६६ | ७: |
| विज | ३८७५ | ४३८२ | ६९०८ | ५४७ | २१,४६६ | ४: |
| ऑटोमोबाईल उद्योग | २६९७ | ५२१२ | ५६०९ | १८७ | २०,८५४ | ४: |
| धातु उद्योग | ४५८५ | ४१५७ | १९३५ | ४०४ | १३,८४५ | ३: |
| पेट्रोलियम गॅस | ५७२९ | १९३१ | १३२८ | ५२२ | १२,०२८ | २: |
| रबाबर | ९२० | ३४२७ | १७०७ | ११५ | ११,३९० | २: |

वरील गुंतवणूकीनंतर २०१४–१५ आर्थिक वर्षानंतर या विदेशी गंतवणूकीत वाढ झाली. उद्योग क्षेत्रात प्रत्यक्ष विदेशी गंतवणूकीवर फायदा होत आहे.

### प्रत्यक्ष विदेशी गंतवणूकीचे फायदे खालीलप्रमाणे आहेत.

१) कुटीर व लघु उद्योजकांना चालना मिळुन त्याचा भांडवल मयदित वाढ झाली.

२) किरकोळ व्यापार क्षेत्रात सुधारणा होवून उत्पादनात वाढ होते.

३) किरकोळ वस्तुच्या किंमतीत घट झाली.

४) नविन तंत्रज्ञानामुळे उत्पादन खर्चात घट होईल.

५) रोजगारात वाढ होते.

६) बचत दर आणि गुंतवणूकदर यातील अंतर कमी होत जाते.

७) आंतरीक संसाधनाचा पुरेपुर वापर झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते.

८) नैसर्गिक संसाधनाचा पुरेपुर वापर होईल.

९) ग्राहकाच्या गरजा व आवडी–निवडी पुर्ण होईल.

१०) लहान व्यापारांना स्पर्धेमुळे चालना मिळते.

### प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचे तोटे

१) मध्यस्थ व अडते यांचे अस्तित्व संपुष्टात येते.

२) विदेशी मक्तेदारी वाढु शकते.

३) विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीवर विश्वास ठेवणे नुकसानकारक होईल.

४) विदेशी गुंतवूणकीमुळे आत्मनिर्भरता व संतूलित विकास साधणे कठीण होईल.

५) सार्वभौमत्वाला धोका निर्माण होवु शकतो.

६) नफेखोरीचे प्रमाण वाढु शकते.

### विदेशी गुंतवणूकीचे महत्व पुढीलप्रमाणे

१) आर्थिक विकासाकरीता भांडवलाची आवश्यकता असते.

२) जागतिकीकरणच्या स्पर्धेत अनुभवाची गरज आहे.

३) क्षेत्रीय परकीय थेट गुंतवणूकीमुळे क्षेत्राचा विकास होतो.

४) आर्थिक विकासाच्या सुरुवातीला विदेशी भांडवलाची गरज असते.

५) जागतीक स्पर्धेत उद्योगाला टिकण्याचा दृष्टीने आवश्यक.

६) महागाई निर्देशांक कमी करणाच्या दृष्टीने विदेशी भांडवल आवश्यक आहे.

प्रत्येक गोष्टींचे सकारात्मक आणि नकारात्मक परीणाम होत असतो तरी काळानुरुप तुलनात्मक दृष्टया प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीवर कोणी प्रतिबंध लावुन विदेशी गुंतवणूक स्विकारली तर देशाला फायदेशीर ठरु शकतो.

### संदर्भ

१) भरतीय आर्थिक समिक्षा

२) भारतीय आणि जागतीक आर्थिक विकास– प्रा. डॉ. एस. के. पगार प्रा. डॉ. एन. एन. गाढे.

३) आर्थिक संकल्पना– डॉ. विनायक गोविलकर.

४) इंडियन जरनल– आर्थिक व्यापार व भारतीय अर्थव्यवस्था

*****

Principal
Bharatiya Mahavidyalaya
Morshi Dist Amravati (M.S.)

VIDYABHARATI SHAIKSHANIK MANDAL AMRAVATI'S

# S.S.S.K.R. INNANI MAHAVIDYALAYA

KARANJA (LAD) DIST. WASHIM,MAHARASHTRA, 444 105

REACCRIDATED BY NAAC AT LEVEL 'A'(CGPA3.24)

AWARDED CPE STATUS BY UGC NEW DELHI

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**U.G.C. sponsored National Conference on**

**FOREIGN DIRECT INVESTMENT RELATED GROWTH OF INDIAN ECONOMY**

**(NCFDI-2017)** 28 February 2017




## CERTIFICATE

Prof./Dr./Mr./Mrs. D.N. Kale of

Bharatia Mahavidyalaya, Morshi

has Participated/Presented a paper entitled भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचे परीणाम

in UGC sponsored National Conference on Foreign Direct Investment Related Growth of Indian Economy, organized by Departments of Economics & Commerce S.S.S.K.R. Innani Mahavidyalaya Karanja (Lad) on 28th February 2017.

| Mr.R.H. Mathurkar | Dr. K.G. Rajput | Dr. P. R. Rajput |
|---|---|---|
| Organizing Secretary | Convener | Chairman |

Principal
Bharatiya Mahavidyalaya
Morshi, Dist.Amravati(M.S.)

2019-20 07 S




**CHIEF EDITOR,**
Dr. Anil Dodewar

**EDITOR,**
Prof. Akash Bele

**EXECUTIVE EDITOR,**
Dr. Chandrashekhar Gitte

**PUBLISHED BY :**
UPA Group Publication In Association with University Professors' Association. 38, Mitra Nagar, Manewada Cement Road, Nagpur-24.

**CORPORATE OFFICE:**
38, Mitra Nagar, Manewada Cement Road, Nagpur-24.

**PUBLICATION :**
The UPA Interdisciplinary e-journal is published Bi-annually.

© All Rights Reserved.
The views expressed in this publication are purely personal judgments of the authors and do not reflect the views of Journal or the body under whose auspices the journal is Published.

**For downloading the Issue, Click the link given below**

**http://upa.org.in/ejournal_april_2020**

**Visit : www.upa.org.in**

**Share your valuable feedback at,**

**upanagpur@gmail.com**

**upajournal@gmail.com**

## UPA National Peer-Reviewed Interdisciplinary e-Journal

**Published By**

**UPA Group Publication**

**In Association With**

**University Professors' Association**

**April - 2020**



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

# UPA National Peer-Reviewed Interdisciplinary e-Journal

**Published by,**

UPA Group Publication

In Association with

University Professors' Association

**April-2020**

**Issue – VII**

**(Social Science, Commerce, Science, Education, Law, Languages and Computer Science)**

## *Editorial Board*

| **Dr. Anil Dodewar** (Chief-Editor, UPA Interdisciplinary E-Journal) | |
|---|---|
| **Prof. Akash Bele** (Editor) UPA Interdisciplinary e-journal | **Dr. Chandrashekhar Gitte** (Executive Editor) UPA Interdisciplinary e-journal |

**ACKNOWLEDGEMENT**

**The editors have tried their level best to review the articles and tested out to impede the secretive literature. However, the authors of the respective research papers shall remain accountable for originality of the paper and rigorous thoughts contained therein. The UPA journal has also exalted with imperial members of Advisory Committee who have provided their valuable guidance for the betterment of the issue. On behalf of the entire UPA team, I therefore thank and extend my sincere gratitude to each and every one for their contributions and suggestions offered for the welfare of the journal.**

**Chief Editor**

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

# UPA National Peer-Reviewed Interdisciplinary e-Journal

**Published by,**

UPA Group Publication

In Association with

University Professors' Association

## Advisory Board

| | |
|---|---|
| **Dr. Kalpana Pande**<br>Dept of Mathematics<br>V.M.V. College,<br>Nagpur | **Dr. Devendra Bhongade**<br>Principal<br>Jivanvikas Mahavidyalaya, Devgram<br>Dist. Nagpur |
| **Dr. Sanjay Dudhe**<br>Academic Council Member<br>R.T.M. Nagpur University,<br>Nagpur | **Dr. Abdul Bari**<br>Principal<br>G. S. College of Commerce,<br>Wardha |
| **Dr. D. S. Rajput**<br>Head, Dept of Sociology<br>Dr. Harisingh Gour University,<br>Sagar (M.P.) | **Dr. Pradeep Khedkar**<br>Management Council Member<br>Sant Gadge Baba Amravati<br>University, Amravati |
| **Dr. Ambika Prasad**<br>Director, School of Management,<br>Symbiosis University of Applied<br>Science,<br>Indore (M.P.) | **Dr. Sunita Sharma**<br>Associate Professor<br>Faculty of Management Studies<br>The M.S. University of Baroda<br>Vadodara (Gujarat) |
| **Dr. Poonam Singh**<br>Professor, Dept of Commerce<br>Acropolis Institute of Management<br>Studies & Research, Indore(M.P.) | **Dr. Radheshyam Choudhari**<br>Associate Professor<br>Shivramji Moghe, Arts, Commerce &<br>Science College, Kelapur, Amaravati |
| **Dr. Nirzar Kulkarni**<br>Professor & Dean<br>Dr. Ambedkar Institute of<br>Management Studies &<br>Research, Nagpur | **Prin. Dr. Suwarna Rawal**<br>Member, Management Council<br>S.N.D.T. University,<br>Mumbai |
| **Dr. Nirmalkumar Singh**<br>Professor<br>Dept. of Public Administration,<br>RTM Nagpur University,<br>Nagpur | **Dr. Debabrata Mitra**<br>Professor<br>North Bengal University, Darjeeling<br>West Bengal<br>India |
| **Dr. Dewashish Mukharjee**<br>Principal<br>Mahant Laxminarayan Das<br>College, Raipur (C.G.) | **Dr. Sopandeo Pise**<br>Associate Professor<br>Sevadal Mahila Mahavidyalaya<br>Nagpur |

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

# UPA National Peer-Reviewed Interdisciplinary e-Journal

Published by

UPA Group Publication

In Association with

University Professors' Association

## Peer-Review Board

| | |
|---|---|
| **Dr. Manjushree Sardeshpande**<br>Head, Dept. of English<br>R. S. Mundle College, Nagpur | **Dr. M. R. Wagh**<br>Dept. of English<br>Taywade College Koradi, Nagpur |
| **Dr. Anup Gumble**<br>Dept. of English<br>Arts, Commerce & Science College, Arvi | **Dr. Sanjay Poharkar**<br>Principal & Head, Department of Marathi<br>Samarth Mahavidylaya, Lakhni, Nagpur |
| **Prof. Sandip Saraiya**<br>Dept. of English<br>Samarth Mahavidylaya, Lakhni, Nagpur | **Dr. Anant Rindhe**<br>Dept. of History<br>Yashvant Mahavidylaya, Seloo, Wardha |
| **Dr. Dattatray Watmode**<br>Head Dept. of Marathi<br>Sharadchandra College, Butibori | **Dr. Sadashiv Sarkate**<br>Associate Professor & Senate Member<br>B. A. M. University, Aurangabad |
| **Dr. Kamalkishor Gupta**<br>Dept. of Hindi<br>D.R.D. Sindhu College, Nagpur | **Dr. Gajanan Polenwar**<br>Head, Dept. of Hindi<br>Taywade College, Koradi, Nagpur |
| **Prin. Dr. Rajesh Ingole**<br>Dean, Commerce Faculty<br>Gondwana University Gadchiroli | **Dr. Pramod Fating**<br>Head, Dept. Of Commerce<br>Yashoda Girl's College, Nagpur |
| **Dr. Asawari Durge**<br>Head, Dept. of Commerce<br>Taywade College, Koradi (Nagpur) | **Dr. Sadanand Dhakite**<br>Head, Dept. Of Commerce<br>S.B. City College, Nagpur |
| **Dr. Shubhangi Morey**<br>Dept. of Commerce<br>G. S. Commerce College, Nagpur | **Dr. Sanjivkumar Agrawal**<br>Head, Dept. of Commerce<br>Toshniwal ACS College, Sengaon |
| **Dr. Tapesh Gupt**<br>Dept. of Commerce<br>Govt. J.Y. Yoganandam College, Chattisgarh | **Dr. V. M. Dandekar**<br>Dept. of Commerce<br>Govt. MMRPG College Bilaspur (C.G.) |
| **Prin. Dr. Gajanan Patil**<br>Dept. of Economics,<br>A. G. College, Nagpur | **Dr. Sumit Mahure**<br>Dept. of Economics<br>PGTD, RTM Nagpur University, Nagpur |
| **Dr. G. N. Nimbarte**<br>Dept. of Humanities<br>V.N.I.T. College, Nagpur | **Dr. Anuradha Khade**<br>Head, Dept. of Sociology<br>Late N. P. Waghaye College, Lakhni |
| **Dr. Sanjay Kavishwar**<br>Head, Dept. of Management<br>Tirpude College of Management, Nagpur | **Dr. Vinod Wanjari**<br>Dept. of Management<br>Zulekha College, Nagpur |
| **Dr. Subrato Dey**<br>School of Management<br>Symbiosis University of App.Science, Indore | **Dr. Satish Chafale**<br>Head, Dept. of History,<br>R. S. Mundle College, Nagpur |
| **Dr. Shuchismita Mishra**<br>Head, Dept. of History<br>V.M.V. College, Nagpur | **Dr. Narayan Balpande**<br>Head, Dept. of Political Science,<br>S. N. P. Mahavidyalaya, Mowad |

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Wardhi

| | |
|---|---|
| **Dr. Vitthal Mandulwar**<br>Head, Dept. Of Political Science,<br>Sharadchandra College, Butibori | **Dr. Laxmikant Deshpande**<br>Dept. of Social Work<br>Vivekanand Social Work College, Nagpur |
| **Dr. Arti Padole**<br>Dept. of Social Work<br>P. Thote Social Work College, Nagpur | **Prin. Dr. Rajratna Durge**<br>Dept. of Physical Education<br>N. S. S. College, Nagpur |
| **Prin. Dr. Rajesh Chandanpath**<br>Dept. of Education<br>Narsimma College, Amravati | **Dr. Rajkumar Khapekar**<br>Head, Dept. of Botany,<br>DRD Sindhu College, Nagpur |
| **Dr. Yogesh Bhute**<br>Dept.of Zoology<br>DRD Sindhi College, Nagpur | **Dr. Umesh Palikundwar**<br>Dept. of Physics<br>PGTD, RTM Nagpur University, Nagpur |
| **Dr. Nitin P Gaikawad**<br>Head, Dept. of Mathematics<br>M.P. Deo Memorial Science College, Nagpur | **Dr. Bharti Burande**<br>Head, Dept. of Chemistry<br>Priyadarshani College of Engg., Nagpur |
| **Prof. Reena Satpute**<br>Assistant Professor,<br>G. S. College of Commerce, Wardha | **Dr. Bharti Katekhaye**<br>Head, Dept. of Home Economics<br>S. N. Mor College, Tumsar, Nagpur |
| **Dr. Kaveri Dabholkar**<br>Head, Dept. of Geography<br>Govt. Bilasa Girl's College, Bilaspur (C.G.) | **Dr. Digambar Samarth**<br>Head, Dept. of Geography<br>Taywade college, Koradi, Nagpur |
| **Dr. Ishwar Wagh**<br>Dept. of Economics<br>B. T. Mahavidyalaya, Mouda | **Dr. Pravina Nagpurkar**<br>Dept. of Marathi<br>Mahila Mahavidyalaya, Nagpur |
| **Dr. Avinash Talmale**<br>Dept. of Geography<br>Vasantrao Naik Govt. Institute, Nagpur | **Dr. Tanuja Nafde**<br>Head, Dept. of Music<br>R. S. Mundle College, Nagpur |
| **Dr. Ravi Mor**<br>Dept. of Law<br>Dr.B. Ambedkar Law College (RTMNU) | **Dr. Anita Sable**<br>Dept. of Law<br>Raisoni Law College, Nagpur |
| **Dr. Charita Patil**<br>Associate Professor, Dept. of Chemistry<br>L.A.D. College for Women, Nagpur | **Dr. Hemant Yavlikar**<br>Head, Dept. of Psychology<br>Hislop College, Nagpur |
| **Dr. Mangala Gore**<br>Dept. of History<br>Mahila Mahavidyalaya, Nagpur | **Dr. Prince Ajaykumar T. Agashe**<br>Dept. of Library Science<br>Matruseva Sangh Institute, Nagpur |
| **Dr. Dhananjay Deote**<br>Dept. of Library Science<br>Bar. Sheshrao Wankhede College, Mohpa | **Prof. Parag Bansole**<br>Dept. of Physical Education<br>Mahila Mahavidyalaya, Nagpur |

*"While writing is like a joyful release, editing is a prison where the bars are my former intentions and the abusive warden my own neuroticism."*

*– Tiffany Madison*

**Note** : All research papers have been reviewed by the peer-review committee to check the plagiarism. However, the views expressed in this publication are purely personal judgments of the authors and do not reflect the views of the Journal or the body under whose auspices the journal is published. Hence, the authors themselves shall be responsible for the originality of papers and thoughts contained therein.

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

## Index


| Sr.No. | Name of Contributor | Title of Research Papers Download |
|---|---|---|
| 41 | श्री. आकाष संतोष थानथराटे<br>संशोधक, भंडारा. | महाराष्ट्र राज्य मार्ग परीवहन महामंडळातील वाहक पदावर कार्य करणाÚया स्थायी महिला कर्मचाÚयांच्या कार्यस्थितीचे अध्ययन |
| 42 | डॉ. अमित अषोकराव झपाटे<br>एम.ए., पीएच.डी. (अर्थषास्त्र), हिस्लॉप कॉलेज, नागपूर<br>अमित म. तितरे<br>संषोधक विद्यार्थी, धनवटे नॅषनल कॉलेज, नागपूर | नागपूर जिल्ह्यातील जलसंपदा विभागाच्या सहकारी पतसंस्थेतील भाग भांडवल, एकूण निधी, गुंतवणूक आणि नफा यांचे आर्थिक अध्ययन (कालावधीः 2010 ते 2015) |
| 43 | प्रा.डॉ. आनंद चोखाजी वेले<br>कार्यकारी प्राचार्य, लक्ष्मीबाई राजगडकर स्मृती कला महाविद्यालय, शिरपूर, ता. वणी, जि. यवतमाळ | आधुनिक काळातील 'आर्दष राज्य' ही संकल्पना |
| 44 | डॉ. अंकूष ना. बारमाटे<br>सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग प्रमुख, श्री चक्रपाणी कला महाविद्यालय, हुडकेष्वर रोड, नागपूर | नागपूर जिल्हा◌ातील गळीतधान्याखालील सोयाबीन पिकाचा क्षेत्रीय अभ्यास |
| 45 | प्रा. डॉ. भगवान जालमसिंग साबळे<br>मराठी विभाग प्रमुख, भारतीय महाविद्यालय, मोर्शी जिल्हा.अमरावती | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील ष्टस्टीपरिवर्तन पंचकातील समाजप्रबोधनपर विचार : एक आकलन |
| 46 | प्रा.चंद्रमणी काषीनाथ भोवते<br>सहा.प्राध्यापक राज्यषास्त्र, स्व.नि.पा. वाघाये महाविद्यालय, एकोडी, जि. भंडारा. 441802 | भारतीय लोकशाहीची वाटचाल |
| 47 | डॉ. चंदु रामभाऊ पाटील<br>सहायक प्राध्यापक, आठवले समाजकार्य महाविद्यालय, भंडारा | बेकारी व समाजकार्याची भुमिका |


Principal
Bhartiya Mahavidyalaya

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील 'दृस्टीपरिवर्तन पंचका'तील समाजप्रबोधनपर विचार : एक आकलन

**प्रा.डॉ.भगवान जालमसिंग साबळे,**
**मराठी विभाग प्रमुख,**
**भारतीय महाविद्यालय, मोर्शी जिल्हा-अमरावती**
bhagwan.j.sable@gmail.com

**प्रास्ताविक :**

'मराठी साहित्याचे सामाजिक योगदान' या विषयाच्या अनुषंगाने वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीता' या ग्रंथामध्ये 'दृस्टीपरिवर्तन पंचका'त अभिव्यक्त झालेल्या समाजप्रबोधनपर विचारांचा उलगडा प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केलेला आहे.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी रचलेला 'ग्रामगीता' हा ग्रंथ आजच्या काळातील अभिनव ग्रंथराज असून विज्ञानयुगातही सदर ग्रंथातील विचारसंपत्तीने मानवाच्या अंतःकरणाचे परिवर्तन होऊन विचारांची समृद्धी लाभते. याच हेतूने सदर शोधनिबंधामध्ये राष्ट्रसंताच्या समाजप्रबोधनपर विचारांचे आकलन करण्यात आले. विवेकाच्या बैठकीवर नव्या व जुन्या विचारांचा,श्रद्धाचा राष्ट्रसंतांनी केलेल्या समन्वयाने नवी दृस्टी लाभते. अनुभवाच्या विशाल दृष्टीकोणातून समाजाच्या, राष्ट्राच्या निर्मितीतील ग्रामसुधारणेचे महत्त्व, अरोग्य, सदधर्ममंथन, लोकवशीकरण, दृष्टीपरिवर्तन, संस्कारशोधन, प्रेमधर्म स्थापन, आदर्श जीवन आदी पंचकामधून राष्ट्रसंतांनी मौलिक विचार अभिव्यक्त केलेत. म्हणूनच महाराजांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या वैचारिक भरभक्कमपणाने, आध्यात्मिक अनुभूतीप्रमाणेच सामाजिक अनुभूतींनी संपन्न आहे याचा प्रतय येतो त्यामुळेच खेड्यापाड्यातून पसरलेल्या बहुजनांपर्यंत त्यांच्या ग्रामगीतेतील हाक पोहचणे सहज शक्य झाले आहे. कारण पौराणिक ग्रंथाप्रमाणे 'ग्रामगीते'ची पारायणे खेड्यापाड्यातून चाललेली आढळतात हे राष्ट्रसंताच्या विचारांचे सामर्थ्य आहे असे म्हणावे लागेल.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे महाराष्ट्रातील आधुनिक संत, कवी व समाजसुधारक म्हणून ओळखल्या जातात. महाराजांचे कवित्त्व अस्सल असून किर्तने, खांजेरी भजने यांच्या माध्यमातून समाजसेवा, समाजप्रबोधन हेच तुकडोजींचे ध्येय होते. त्यासाठीच त्यांनी परांपरागत रूढी, प्रथा, परंपरा, जाती, भेदाभेद व अंधश्रद्धा आदी समाजविघातक गोष्टींवर प्रहार करून मानवता, मानवधर्म, देशभक्तीचा प्रचार करण्याकरिता 'गुरुदेव सेवा मंडळे' स्थापली. राष्ट्रसंतानी ग्रामगीता, अनुभवासागर, भजनावली, सेवाधर्म व राष्ट्रीय भजनावली आदी



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

ग्रंथरचना साकारली. सदर शोधनिबंधामध्ये राष्ट्रसंताचे ग्रामगीतेतील 'दृस्टीपरिवर्तन पंचका'कामध्ये व्यक्त झालेले समाजप्रबोधनपर विचार सोदाहरणपुढीलप्रमाणे अधोरेखित केलेत.

**'दृस्टीपरिवर्तन पंचक' :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी रचलेला 'ग्रामगीता' हा ग्रंथ अतिशय वैशिट्यपूर्ण आहे. भारतीय समाजव्यवस्थेत भागवत गीतेचे जे महत्त्व आहे. हे लक्षात घेऊन राष्ट्रसंतानी ग्रामगीतेची रचना केली. ग्रामगीतेत एकुण एकेचाळीस अध्याय असून त्यामध्ये चार हजार पाचशे बेचाळीस ओव्या आहेत. सदर शोधनिबंधामध्ये 'दृस्टीपरिवर्तन पंचका'कातील वेश-वैभव, गरीबी-श्रीमंती, श्रम-संपत्ती, जीवन शिक्षण व महिलोन्नतीच्या संदर्भात राष्ट्रसंताच्या समाजप्रबोधनपर विचारांचा उलगडा संक्षिप्त स्वरुपात अधोरेखित करण्यात आला आहे.

**वेश - वैभव :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी 'ग्रामगीते'तील सोळाव्या अध्यायात 'वेश-वैभव' संदर्भात विचार व्यक्त करताना जनसामान्यांचा विकास व्हावा, त्यांनी सत्कार्याने मार्गक्रमन करून जीवनातील स्वैराचार, अवास्तवतेला, स्वार्थी व ढोंगीपणाला फाटा देत सात्विकतेनेच जीवनाचे कल्याण साधू शकते असा संदेश दिला. राष्ट्रसंत 'वेश-वैभवा'मध्ये या संदर्भात म्हणतात की,

"ईश्वरास मान्य जे सत्कार्य । जे सांगोनी गेले संतवर्य ।
ते आचरणे यातचि सौंदर्य । खऱ्या जीवनाचे ॥१॥" १

सात्विक आहार, विचार, संगती व व्यवहार हेच विधात्यास मान्य असून यातच खऱ्या जीवनाचे सौंदर्य आहे असे प्रतिपादन केले.

"वेशभूषेची चढावोढ । आज जीवनास झाली अत्यंत जड ।
गरजा,चिंता, रोगांची वाढ । यात कसले मोठेपण ॥२५॥"

आचार-विचारांमध्ये सुसंगती न साधता केवळ बाह्य देखावा हेच खरे जीवन नाही तर यामुळे केवळ चिंता व रोगाची वाढ होणार आहे. त्यामुळे भ्रमिष्टपणाचा अट्टहास त्यागून सदवर्तन साधावा.त्याकरिता खऱ्या धर्माची कास सोडू नये. असा मौलिक सल्लाही जनसामान्यांना दिला. यासंदर्भात राष्ट्रसंतानी जे विचार व्यक्त केले ते असे,

"हौसेसाठी सोडला धर्म । किळसवाणे करिती उद्दम ।
नानाप्रकारे व्यभिचार कर्म । करिती आणि करविती ॥६३॥"



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

अधर्म व व्यभिचारी वर्तन मानावच्या अधोगतीस कारणीभूत आहे. ते पुढे असे म्हणतात की, गरजेप्रमाणे खर्च करून अवाजवी खर्च टाळावा. व्यवहारी वर्तन हाच खरा उन्नतीचा मार्ग आहे. असा संदेश राष्ट्रसंतानी दिला.

मानवाने रूढी-प्रथा, परंपरांमध्ये न गुंतता, तिर्थाटनाकरिता कर्ज न घेता प्रपंचात काटकसर करावी व शुद्द अंत:करण हाच हिताचा मार्ग आहे. असा मौलिक सल्लाही राष्ट्रसंतानी दिला. यासंदर्भात ते म्हणतात की,

"शेवटी मनुष्याचा निर्मळ व्यवहार । हाची ठेवतो हृदयी आदर ।
जो परस्परांचा हिताचा विचार । आत्मत्वाने चालवी ॥९७॥"

सदवर्तन, सदाचार, सेवाभावी वृत्ती यानेच ग्रामजीवनाचा विकास घडू शकतो.याकरिता 'साधी राहणी उच्च विचारसारणी' हीच जीवनाची खरी गुरुकिल्ली होय असा मूलमंत्र राष्ट्रसंतानी अभिव्यक्त केला.

**गरीबी - श्रीमंती :**

राष्ट्रसंतानी सतरावा अध्यायात 'गरीबी - श्रीमंती' संदर्भात विचार व्यक्त करताना समाजातील आर्थिक कुचंबना, विवंचनेवर मार्मिक भाष्य केले. ते म्हणतात, धन, संपत्ती असतानाही लोकांमध्ये सुख-समाधान नाही तर क्लेश, विषमता असल्यामुळे समाजस्वास्थ स्थिर राहत नाही. त्यामुळेच समाजात कलह निर्माण होतात. यासंदर्भात राष्ट्रसंत 'गरीबी - श्रीमंती'मध्ये म्हणतात की,

"श्रीमंत-गरिबांचा वाद । गावास करील बरबाद
म्हणोनी ही दूर करावा ब्याद । जाणत्यांनी ॥६॥"

धनाढ्य, जमीनदारांनो, दिन-दुबळयांनो, रोजगारांनो हिनतेची दिलेली वागणूक अथवा त्यांना नडणे, छळणे आदी दुष्परिणामाने समाजामध्ये कलह निर्माण होण्यास कारणीभूत आहे. याचाच परिणाम तरुण पिढीवर होतो. तरुण पिढी व्यसनाधीन बनते. याचे दुष्परिणाम होतात ते असे,

"हा तो राहतो महाली शहरी । मुले गाडी नेती सिनेमादारी ।
शिकती व्यभिचार,व्यसने, चोरी । लुटती कारभार खेडुता ॥२३॥"

भव्य वाडा पण हरवलेली मानवता, अमानुषता, सरंजामशाहीचे वजन यामुळे विकोपाचे वाद होणे व विनाशाकडे वाटचालीस कारणीभूत ठरते. त्यामुळेच राष्ट्रसंत असे म्हणतात की,

"सगळ्यांनी मिळोनी वागावे । सर्वांचे समजोनि कार्य करावे ।
श्रीमंत-गरीब दिसोची न द्यावे । बहिरंग जीवनी ॥७०॥"



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

सामोपचाराचे वर्तन व समानतेची वागणूक, सहकार्याची भावना लोकांचा, गावाचा विकास घडविण्याकरिता सहाय्यभूत ठरू शकते. तसेच शिक्षणाचा प्रसार व्हावा पुढाऱ्यांनी ज्ञानकण पेरून परिवर्तन साधावे, श्रमाची प्रतिष्ठा व कार्यनिष्ठा बाळगूण स्वत:चा, कुटुंबाचा व गावाचा विकास साधावा. यासंदर्भात राष्ट्रसंत पुढील ओव्या खूपच सूचक आहे

"एरव्ही उद्योगाविण जे भोगावे । ते मानवासि लाजिरवाणे ।
आळशासि खाणेपिणे । देणे असे महत्पाप ॥९७॥"

आळस झटकून कर्तव्यास, कर्मास प्राधान्य द्यावे. तसेच गावातील आठरापगड जातीतील लोकांना गावात समानतेची वागणूक मिळणे व गावात एकोपा नांदणे गावाच्या विकासाकरिता हिताचे. समतेच्या संदर्भात राष्ट्रसंत म्हणतात की,

"एक शेती कामाचा कामगार । एक बेलदार, सुतार, लोहार ।
शिंपी, धोबी, कुंभार, चांभार । सारिखेचि उपयुक्त ॥१०३॥"

समाजातील गरीब-श्रीमंतीचा भेदाभेद मिटवून एकोपा, सदभावना, बंधुता जोपासण्याचा सल्ला राष्ट्रसंतानी दिला. त्याशिवाय समाजोन्नती साधता येणार नाही म्हणून 'गरीब-श्रीमंती' या अध्यायाच्या शेवटी राष्ट्रसंत म्हणतात की,

"अरे ! उठा उठा श्रीमंतांनो ! अधिकाऱ्यांनो ! । पंडितांनो !
शुशिक्षितांनो ! साधुजनांनो ! । हाक आली क्रांतीची ॥११४॥
गावा-गावाशी जागवा । भेदभाव हा समूळ मिटवा ।
उजळा ग्रामोन्नतीचा दिवा । तुकड्या म्हणे ॥११५॥" [२]

गरीब - श्रीमंतीचा भेद टाळून समाजातील सर्वच क्षेत्रातील मानवांनी एकोपाने, एकजुटीने क्रांतीची हाक देऊन गावास समृद्द बनवावे. हाच मानवाच्या व समाजाच्या उद्धाराचा मार्ग होय असे निक्षून सांगितले.

**श्रम - संपत्ती :**

राष्ट्रसंतानी अठरावा अध्यायात 'श्रम - संपत्ती' संदर्भात विचार व्यक्त करताना श्रमाचे व कर्माचे महत्त्व विशद केले. कर्माच्या संदर्भात 'श्रम - संपत्ती'मध्ये राष्ट्रसंत म्हणतात की,

"काही कर्म स्वत:करिता । काही कुटुंबाचिया हिता ।
काही कर्म गावलोकांकरिता । सेवाधर्मरूप ॥८॥"

स्वत:चे हित साधतानाच लोकांचे हित साधावे.गावातील लहान-थोरांनी श्रमाचे महत्त्व जाणावे, सत्ता, संपत्तीचा लोभ करू नये. हिच खरी माणुसकी व मानवता आहे. प्रत्येकाच्या हाताला काम मिळावे, गावातील कलावंताचा सन्मान व्हावा, एकमेकाचे हित जोपासावे, श्रमाला महत्त्व



Principal
Rashtriya Mahavidyalaya
Morshi

द्यावे हिच खरी श्रम-संपत्ती. त्यामुळे गावा-गावाचा विकास होईल. गावातील लोकांना कामधंदाकरिता शहराकडे जावे लागणार नाही. आज तर कोव्हिड-१९(कोरोना) या रोगाने तर अक्षरश: जगात थैमान घातले आहे. भारतातही सद्दस्थितित सदर आजाराचा फैलाव रोखण्याकरिता मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी २५ मार्च ते १४ एप्रिल २०२० प्रर्यत लॉकडाऊन घोषित केला. अशा परिस्थितीत शहराकडे नोकरी, व्यवसाय व रोजगाराच्या निमित्ताने गेलेली खेड्यातील लोकं गावाकडे परतली.पुन्हा एकदा गावाचे, ग्रामविश्वाचे महत्त्व लोकांना कळले. यासंदर्भात राष्ट्रसंताच्या पुढील ओव्या तर अधिकच सूचक आहेत. ते म्हणतात,

"खेडेची शहराचे जनक । शहर भोक्ते, खेडे उत्पादक ।
शहराकडे न जाता लोक । धावावे उलट खेड्याकडे ॥१०६॥"

खरा भारत खेड्यातच आहे नव्हे, खेडी हिच शहराचे जनक होय. असा गावाचा यथोचित सन्मान राष्ट्रसंतानी व्यक्त केला.म्हणूनच तर आदर्श गावासंदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, "सहकारिता, सदभावना, सदगुण, सत्प्रेम यांचे पवित्र वातावरण गावभर निर्माण करून गावाला एक आदर्श कुटुंब बनविणे हेच महान पुण्यकार्य आहे.हाच खरा धर्म आहे ! अशा धर्माने रसरसलेले छोटे-मोठे आदर्श गाव पाहून कोणाच्याही हृदयात नवचैतन्य निर्माण होईल, असे कार्य आपण आपआपल्या गावी करू शकलो तर तिर्थोतीर्थी जाण्याऐवजी लोक आपल्या गावाचे दर्शन घ्यायला वारंवार येतील." ३ अशाप्रकारे 'श्रम - संपत्ती' अध्यायात श्रमाचे महत्त्व विशद करीत असतानाच ग्रामविश्वाचे महत्त्व अधोरेखित करून समाजमनात जागृती निर्माण करण्याचे महान कार्य राष्ट्रसंतानी केले हे उल्लेखनीय होय.

**जीवन - शिक्षण :**

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी एकोणाविसावा अध्यायात 'जीवन - शिक्षण' संदर्भात विचार व्यक्त केले. खेडी जारी शहराहून महान असली तरी उच्च शिक्षणाच्या बाबतीत मात्र शहराकडे जावे लागेल असा प्रश्न निर्माण झाला असता राष्ट्रसंतानी या संदर्भात जे विचार व्यक्त केलेत ते असे,

"ऐका ऐसी जयांची भावना । लक्ष द्यावे त्यांनी या वाचना ।
येथे शिक्षणाची मूळ कल्पना । तीच चुकली आपुली ॥४॥"

केवळ दिखाऊपणाने अथवा नोकरपेशी थाटामाटाने शिक्षणाचे उद्दिष्ट्य साध्य होणार नाही. जीवनानुभूती युक्त शिक्षणच मानवास परिपूर्ण बनवितो राष्ट्रसंत म्हणतात, 'कष्टिक, बलवान हाच खरा भारताचा सुपुत्र होय.' म्हणूनच तर त्यांच्या पुढील ओव्या अंतत्य बोलक्या आहेत. राष्ट्रसंत असे म्हणतात की,



Principal
Shartiya Mahavidyalaya
Morshi

"शिक्षणातची जीवनाचे काम । दोन्हींची सांगड व्हावी उत्तम ।
चिंता नसावी भोजनासाठी दाम । मागण्याची भीक जैसी ॥१०॥"

जीवनाच्या गरजा पूर्ण करु शकणारे शिक्षणच परिपूर्ण शिक्षण होय, निर्वाहाचे साधन होय म्हणून शिक्षणामध्ये जीवनातील गरजांचा समावेश असावा असा मनोदय व्यक्त केला. "शिक्षण हे आपल्या जागृतीचे साधन आहे साध्य नव्हे. शिक्षण आणि कला, शिक्षण आणि उद्यम, शिक्षण आणि व्यापार यांचे नाते जोडले गेले. शिक्षण आणि व्यवहार यांचा संबंध जोडला गेला तरच त्या शिक्षणाचा उपयोग अन्यथा शिक्षण हे कुचकामाचे आहे. शिक्षणात कला अभ्यास असेल तर माणूस उद्योगशील होईल. ज्याला कला येतो तो माणूस कधीच उपासी मरु शकत नाही." ४ शिक्षणाने अहंकार अभिमान न बाळगता स्वाभिमान व कर्तव्याची भावना जागृत व्हावी. यासंदर्भात राष्ट्रसंत म्हणतात की,

"विद्येअंगी व्हावा विनय । विद्या करी स्वतंत्र, निर्भय ।
शिक्षणाने वाढावा निश्चय । जीवन - जय करावया ॥२०॥"

जीवनानुभवाच्या शिक्षणामध्ये ज्ञानासोबत निर्भयता, धनुर्विद्या, मल्लविद्या, आयुर्वेद, शस्त्रास्त्रविद्या, चित्रकला, चर्मकला, कुंभारकामादी चौसस्ट कला अवगत असाव्यात यासोबत संगीतशास्त्र, स्वयंपाकशास्त्र, गृहस्थापनेचे तंत्र, अश्वपरिक्षा, रत्नपरिक्षा हिच खरी जीवनविद्या होय असे प्रतिपादन केले. जीवनानुभूतीतून प्राप्त झालेले शिक्षण तरुणांना स्वावलंबी बनवेल व तेच तरुण देश घडवेल असा आशावाद व्यक्त करताना राष्ट्रसंत म्हणतात की,

"जन्म देण्याचे काम मातापित्याचे । शिक्षणाचे काम विद्यागुरुचे ।
ते आसक्तीचे पुत्रधन देशाचे । बिघडवू नये लाडवोनी ॥४५॥"

'मानवी जीवन घडविणारे, समाजविकास साधणारे व देशहित जपणारे शिक्षण हेच खरे शिक्षण होय.' हा विचार राष्ट्रसंतानी जीवन - शिक्षणातून अधोरेखित केला.

**महिलोन्नती :**

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी विसावा अध्यायात 'महिलोन्नती' संदर्भात विचार व्यक्त करताना बालंकावर गर्भापासूनचे संस्कार हे मातेचे उपकार आहे म्हणून 'स्त्रीची उन्नती हिच राष्ट्राची उन्नती होय' असा उपदेश केला. ग्रामोन्नतीचा पाया शिक्षण आहे. उद्याचे राष्ट्र व आजचे संतान घडविण्याकरिता आदर्श गुरुजनांचे योगदान महत्त्वाचे तर आहेच परंतु बालकांना घडविणारी माता हिच त्यांची पहिली गुरु आहे. यासंदर्भात राष्ट्रसंत 'महिलोन्नती' मध्ये म्हणतात की,



Principal
Bharti[illegible] Mahavidyalaya
Morshi

"विद्या गुरुहून थोर। आदर्श मातेचे उपकार ।
गर्भापासूनि तिचे संस्कार । बालकांवारी ॥२॥
'जिच्या हाती पाळण्याची दोरी । तीच जगा उद्धारी' ।
ऐसी वर्णीली मातेची थोरी । शेकडो गुरुहूनिहि ॥३॥" ५

नारीशक्तीचा यथोचित सन्मान राष्ट्रसंतानी त्यांच्या विचारातून साकारतानाच स्त्रीचा सन्मान करणे, स्त्रीला शिक्षण देणे ह्या गोष्टींचा संदेश समाजमाणसात

रुजविण्याचा प्रयत्न त्यांच्या रचनेतून केला. स्त्रीच्या तेजावारीच पुरुषाचे मोठेपण अवलंबुन असून मातृशक्तीनेच बालकांचा विकास घडू शकतो. वेदांमध्येही महिलांचा यथोचित गौरव करण्यात आल्याचा संदर्भ राष्ट्रसंतानी 'महिलोन्नती'मध्ये विशद केला तो असा,

"याच गुणे 'मातृदेवो भव' । वेदाने आरंभीच केला गौरव ।
नररत्नांची खाण अपूर्व । मातृजाती म्हणोनिया ॥८॥"

'मातृदेवो भव', 'नररत्नांची खाण', असा महिलांचा वेदग्रंथामध्ये केलेल्या सन्मानाचा उल्लेख राष्ट्रसंतानी ग्रामगीतेमध्ये करणे निश्चितच समाजामध्ये नारीशक्तीबद्दल सकारात्मक दृस्टीकोन निर्माण व्हावा. स्त्रियांवरील अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्याचे व लोकमनांत स्त्रियांबद्दल सहानुभूती, आस्था निर्माण व्हावी असा संदेश राष्ट्रसंतानी दिला.

आजवर देशामध्ये जी आदर्श पुरुष म्हणून गणल्या गेली त्यांना घडविणारीही स्त्रीच होती.या संदर्भातही राष्ट्रसंतानी 'महिलोन्नती'मध्ये उल्लेख केला तो असा,

"प्रल्हादाची कयाधु आई । छत्रपतींची जिजाबाई ।
कौशल्या, देवकी आदि सर्वही । वंदिल्या ग्रंथी ॥९॥"

धर्मग्रंथामध्ये असा स्त्रियांचा यथोचित सन्मानपूर्वक उल्लेख होणे हिच स्त्रीची महती आहे हे राष्ट्रसंतानी निक्षून सांगितले. माय - माऊलीचे स्वभावधर्म, तिचे उत्कट प्रेम, तिची दक्षता, चातुर्यता, सहशिलता, समन्वयताच संस्कारामध्ये महत्त्वपूर्ण आहे. म्हणून राष्ट्रसंत म्हणतात,

"स्त्रीलाच भक्ति, स्त्रीलाच ज्ञान । तिलाच संयम, शहाणपण ।
तिच्यानेच हालती वाटे संपूर्ण । संस्कारचक्रे ॥३३॥"

प्रपंचातील सुखदु:खाचे मेळ, व्यवहारदृष्टी, आंतर्बाह्य प्रकृतीचे वेढे, स्थळकाळपरत्वे वैरिणीचे स्विकारलेले रूप ही स्त्री शक्तीची महती होय. याकरिताच महिलांची उन्नती हिच समाजोन्नती असल्याचा संदेश लोकमाणसाला राष्ट्रसंतानी दिलेला आहे. यावरून स्त्रीला अबला समजून तिची होणारी कुचंबणा, गळचेपी, अन्याय-अत्याचार व हेळसांड थांबावी असा उपदेश



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

गावास समृद्ध बनवावे. त्यामुळे ग्रामीण भागातील आर्थिक कुचंबना व विवंचनेवर मात करता येईल असे मार्मिक भाष्य केले.

राष्ट्रसंतानी 'श्रम - संपत्ती' या अध्यायात विचार व्यक्त करताना श्रमाचे व कर्माचे महत्त्व विशद केले. खेडेची शहराचे जनक, शहर भोक्ते तर खेडे उत्पादक व्हावे. स्वत:चे हित साधतानाच गावातील लहान - थोरांच्या श्रमाचे महत्त्व जाणावे, सत्ता व संपत्तीचा लोभ करू नये. माणुसकी व मानवता जोपासावी, गावातील कलावंताचा सन्मान व्हावा, श्रमाला महत्त्व द्यावे हिच खरी श्रम-संपत्ती होय. त्यामुळेच गावा-गावाचा विकास साध्य होईल. गावातील लोकांना कामधंदाकरिता शहराकडे जावे लागणार नाही. आज तर कोव्हिड-१९(कोरोना) या रोगाने तर अक्षरश: जगात थैमान घातले आहे. भारतातही सद्दस्थितित सदर आजाराचा फैलाव रोखण्याकरिता मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी २५ मार्च ते १४ एप्रिल २०२० प्रर्यंत लॉकडाऊन घोषित केला. अशा परिस्थितीत शहराकडे नोकरी, व्यवसाय व रोजगाराच्या निमित्ताने गेलेली खेड्यातील लोकं जीव मुठीत घेऊन गावाकडे परतली. यानिमित्ताने आज पुन्हा एकदा खेडेची शहराचे जनक असून देशाच्या विकासामध्ये ग्रामविश्वाचे महत्त्व लोकांना कळले.

राष्ट्रसंतानी एकोणाविसावा अध्यायात 'जीवन - शिक्षण' संदर्भात विचार व्यक्त करताना जीवनानुभूतीतून घेतलेले जीवनाच्या गरजा पूर्ण करु शकणारे शिक्षणच परिपूर्ण शिक्षण असून निर्वाहाचे साधन होय असे प्रतिपादन केले. म्हणून शिक्षणाने अहंकार, अभिमान न बाळगता स्वाभिमान व कर्तव्याची भावना जागृत व्हावी. चौसष्ट कलांचे गुण अवगत करून देणारे, जीवनानुभूतीतून प्राप्त झालेले शिक्षणच तरुणांना स्वावलंबी बनवेल व तेच तरुण देश घडवेल असा आशावाद व्यक्त करताना 'मानवी जीवन घडविणारे, समाजविकास साधणारे व देशहित जपणारे शिक्षण हेच खरे शिक्षण होय.' असा रोख-ठोक विचार राष्ट्रसंतानी मांडला.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी विसावा अध्यायात 'महिलोन्नती' संदर्भात विचार व्यक्त करताना नारीशक्तीचा, स्त्रीत्वाचा यथोचित सन्मान व्हावा, स्त्रीला शिक्षण मिळावे कारण बालंकावर गर्भापासूनचे संस्कार हे मातेचे उपकार आहे म्हणून 'स्त्रीची उन्नती हिच राष्ट्राची उन्नती होय' असा उपदेश केला. प्रपंचातील सुख - दु:खाचे मेळ, व्यवहारदृष्टी, आंतर्बाह्य प्रकृतीचे वेढे, स्थळकाळपरत्वे वैरिणीचे स्विकारलेले रूप ही स्त्री शक्तीची महती होय. याकरिताच महिलांची उन्नती हिच समाजोन्नती असल्याचा संदेश लोकमानसाला राष्ट्रसंतानी दिलेला आहे. याशिवाय 'मातृदेवो भव', 'नररत्नांची खाण', असा महिलांचा वेदग्रंथामध्ये केलेल्या सन्मानाचा उल्लेख राष्ट्रसंतानी ग्रामगीतेमध्ये करणे हे निश्चितच समाजामध्ये नारीशक्तीबद्दल सकारात्मक दृस्टीकोन निर्माण व्हावा हा हेतू आहे. तसेच स्त्रियांवरील अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्याचे व लोकमनांत स्त्रियांबद्दल सहानुभूती



Principal
Shartiya Mahavidyalaya
Morshi

राष्ट्रसंतानी केला. याशिवाय स्त्रियांना शिक्षण द्यावे जेणेकरून त्यांचा विकास घडु शकेल. म्हणूनच राष्ट्रसंतानी 'महिलोन्नती'मध्ये उपदेश केला तो असा,

"आदर्श ऐसे माता-पिता । जन्म देतील आदर्श सुता ।
ते वैकुंठ बणवितील भारता । तुकड्या म्हणे ॥१११॥"

आदर्श जन्मदात्याच्या पोटी जन्म घेणारी बालकच या देशाचा भावी नागरिक असून तेच या देशाचे वैकुंठ बणवितील असा मौलिक संदेश देत राष्ट्रसंतानी आशावाद व्यक्त केला. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेमध्ये महिलांच्या उन्नतीबद्दल, स्त्रीच्या अस्तित्वाबद्दल नव्हे देशाच्या जडणघडणीमध्ये महिलांच्या महतीचे महत्त्व महत्त्वपूर्णतेने अधोरेखित करणे हा महिलांचा केलेला सन्मान होय.

**निष्कर्ष :**

'मराठी साहित्याचे सामाजिक योगदान' या विषयाच्या अनुषंगाने वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीता' या ग्रंथामध्ये 'दृस्टीपरिवर्तन पंचका'त अभिव्यक्त झालेल्या समाजप्रबोधनपर विचारांचा सोदाहरण उलगडा प्रस्तुत शोधनिबंधामध्ये करून राष्ट्रसंताचे विचार समाजहिताकरिता कसे उपयुक्त आहे हे अधोरेखित केले. 'साहित्य हा समाजाचा आरसा होय.' समाजाशिवाय साहित्याचे वेगळेपण सिद्द होऊ शकत नाही. मानवी भाव-भावना, मानवता, लोकजीवन व लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या साहित्याने समाजप्रबोधनामध्ये मौलिक भूमिका साकारली व साकारित आहे. यात दुमत असण्याचे कारण नाही. याच विचाराचा धागा सोदाहरण स्पस्ट व्हावा याकरिता वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील 'दृस्टीपरिवर्तन पंचका'तील समाजप्रबोधनपर विचारांचा परामर्श घेण्याच्या हेतूने प्रस्तुत शोधनिंबधाचे लेखन करण्यात आले. राष्ट्रसंताच्या समाजप्रबोधनविषयक विषयक विचारांचा सोदाहरण विवेचन करताना आवश्यक तेथे ग्रामगीतेतील ओव्यांचा संदर्भही दिला.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेतील 'दृस्टीपरिवर्तन पंचका'तील 'वेश - वैभव' या अध्यायात आचार - विचारामध्ये सुसंगती साधावी, जीवनामध्ये स्वैराचाराला महत्त्व न देता सत्यस्थितीशी संघर्ष करूनच मानवाचे जीवन समृद्ध बनू शकते असा मौलिक विचार व्यक्त केला. तर मानवाने स्वार्थीपणा, ढोंगीपाणा, कपटीपणाचा त्याग करून सदवर्तन, सदाचार व सेवाभावीवृत्तीनेच समाजस्वास्थ लाभू शकते हा संदेश जनमानसात रुजविला.

'गरीबी - श्रीमंती' या अध्यायात विचार व्यक्त करताना राष्ट्रसंतानी गरीब-श्रीमंतीचा भेदाभेद, विषमता, द्वेषभावनेचा त्याग करून एकोपा, सदभावना व बंधुभावनेचा स्वीकार करावा. समाजातील सर्वच क्षेत्रातील लोकांनी एकत्र येऊन एकजुटीने क्रांतीची हाक देऊन



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

आस्था निर्माण व्हावी याकरिता व समाजात स्त्रीची अबला समजून होणारी कुचुंबणा गळचेपी, अन्याय-अत्याचार व हेळसांड थांबवून स्त्रियांना शिक्षण द्यावे जेणेकरून त्यांचा विकास घडु शकेल.असा मौलिक सल्लाही दिला.

देशाच्या जडणघडणीमध्ये महिलांचे योगदान महत्त्वपूर्ण असेल हा राष्ट्रसंतानी महिलांचा केलेला सन्मान होय. 'महिलोन्नती हिच समाजोन्नती होय' असा मौलिक संदेश राष्ट्रसंतानी दिला.

अशाप्रकारे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीता' या ग्रंथातील 'दृस्टीपरिवर्तन पंचका'त व्यक्त झालेले समाजप्रबोधनपर विचार समाजातील जनमानसांमध्ये वैचारिक परिवर्तन घडविण्याच्या दृष्टीने मौलिक तर आहेच याशिवाय 'ग्रामगीता' या ग्रंथाची ग्रामविश्वातील महतीही अधोरेखित होते. राष्ट्रसंत आजही ग्रामजीवनातील लोकजीवनामध्ये भजनावलीच्या रूपाने मौलिक संदेश रुजवत आहे.

**संदर्भ सूची :**


१) संपा. स्व.सुदामजी सावरकर,श्री गुरुदेव मुद्रण मंदिर,गुरुकुंज आश्रम, मोझरी,जि.अमरावती, वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचीत 'ग्रामगीता',तेवीसावी आवृत्ती, ऑक्टोबर २०११, पृ.क्रं. १४३.

२) ऊ.नि., पृ.क्रं. १६१.

३) संपा. प्रमोद त्र्यं. नलावडे, 'माझ्या स्वप्नातील आदर्श गाव', राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, लोकराज्य अंक, एप्रिल- २०१२, पृ.क्रं.०६.

४) श्रीगुरूदेव मासिक, गुरुकुंज मोझरी, सप्टेंबर २००३, पृ.क्रं.०२.

५) तत्रैव, पृ.क्रं. १८१.


2019-20




**CHIEF EDITOR**
**Dr. Anil Dodewar**

**EDITORS**
**Prof. Akash Bele**

**EXECUTIVE EDITORS**
Dr. Radhesham Choudhari
Prof. Naresh Mahajan
Prof. Suyog Mankar

**PUBLISHED BY :**
UPA Group Publication In Association with University Professors' Association. 38, Mitra Nagar, Manewada Cement Road, Nagpur-24.

**CORPORATE OFFICE:**
38, Mitra Nagar, Manewada Cement Road, Nagpur-24.

**PUBLICATION :**
The UPA Interdisciplinary e-journal is published Bi-annually.

© All Rights Reserved.
The views expressed in this publication are purely personal judgments of the authors and do not reflect the views of Journal or the body under whose auspices the journal is Published.

## SPECIAL ISSUE – III : JUNE - 2020

**For downloading the Issue, Click the link given below**
**http://upa.org.in/ejournal_june_2020**
**Visit : www.upa.org.in**

**Share your valuable feedback at**
**upanagpur@gmail.com**
**upajournal@gmail.com**

## UPA National Peer-Reviewed Interdisciplinary e-Journal

**Published By**
**UPA Group Publication**
**In Association With**
**Shivramji Moghe Arts, Commerce & Science College**
**Kelapur (Pandharkawada)**

**June - 2020**

# UPA National Peer-Reviewed Interdisciplinary e-Journal

**Published By**
UPA Group Publication
In Association with
Shivramji Moghe Arts, Commerce & Science College
Kelapur (Pandharkawada)

**June - 2020**

**Special Issue – III**

**(Social Science, Commerce, Science, Education, Law, Languages and Computer Science)**

## Editorial Board

| Dr. Anil Dodewar (Chief-Editor, UPA Interdisciplinary E-Journal) | | | |
|---|---|---|---|
| **Prof. Akash Bele** (Editor) UPA Interdisciplinary e-journal | **Dr. Radhesham Choudhari** (Executive Editor) UPA Interdisciplinary e-journal | **Prof. Naresh Mahajan** (Executive Editor) UPA Interdisciplinary e-journal | **Prof. Suyog Mankar** (Executive Editor) UPA Interdisciplinary e-journal |

## ACKNOWLEDGEMENT

**The editors have tried their level best to review the articles and tested out to impede the secretive literature. However, the authors of the respective research papers shall remain accountable for originality of the paper and rigorous thoughts contained therein. The Advisory Committee of the journal has provided their valuable guidance for the betterment of the issue. On behalf of the entire UPA team, I therefore thank and extend my sincere gratitude to each and every one for their contributions and suggestions offered for the welfare of the journal.**

**Chief Editor**



# UPA National Peer-Reviewed Interdisciplinary e-Journal

**Published By**
UPA Group Publication
In Association with
Shivramji Moghe Arts, Commerce & Science College
Kelapur (Pandharkawada)

## Advisory Board

| | |
|---|---|
| **Dr. Devendra Bhongade**<br>**Principal**<br>**Jivanvikas Mahavidyalaya**<br>**Devgram, Dist. Nagpur** | **Dr. Shankar Warhate**<br>**Principal**<br>**Shivramji Moghe Arts, Commerce & Science College**<br>**Kelapur (Pandharkawada)** |

## Peer-Review Committee

| | |
|---|---|
| **Dr. Anup Gumble**<br>Dept. of English<br>Arts, Commerce & Science College<br>Arvi | **Dr. Yogesh Sarode**<br>Dept. of English<br>Jivanvikas Mahavidyalaya<br>Devgram |
| **Dr. Anant Rindhe**<br>Dept. of History<br>Yashvant Mahavidylaya<br>Seloo, Wardha | **Dr. Arti Padole**<br>Dept. of Social Work<br>Purushottam Thote Social Work College<br>Nagpur |
| **Prof. Sandip Saraiya**<br>Dept. of English<br>Samarth Mahavidylaya, Lakhni, Nagpur | **Dr. Pravina Nagpurkar**<br>Dept. of Marathi<br>Mahila Mahavidyalaya, Nagpur |
| **Dr. Anuradha Khade**<br>Head, Dept. of Sociology<br>Late N. P. Waghaye College, Lakhni | **Dr. Mangala Gore**<br>Dept. of History<br>Mahila Mahavidyalaya, Nagpur |
| **Prof. Amol Mendhe**<br>Dept. of English<br>P. W. S. College, Nagpur | **Dr. Ankush Barmate**<br>Dept. of Geography<br>Chakrapani Mahavidyalaya, Nagpur |
| **Prof. Parag Bansole**<br>Dept. of Physical Education<br>Mahila Mahavidyalaya, Nagpur | **Dr. Ishwar Wagh**<br>Dept. of Economics<br>Baburao Tidke Mahavidyalaya, Mouda |

**Note** : All research papers have been reviewed by the peer-review committee to check the plagiarism. However, the views expressed in this publication are purely personal judgments of the authors and do not reflect the views of the Journal or the body under whose auspices the journal is published. Hence, the authors themselves shall be responsible for the originality of papers and thoughts contained therein.

**UPA National Peer-Revied Interdisciplinary e – Journal**
**Issue-III June 2020**

# Index



| Sr.No. | Name of Contributor | Title of Research Papers Download | Page No. |
|---|---|---|---|
| 170 | Prafullkumar N. Tayade | "ROLE AND IMPACT OF E-COMMERCE IN BUSINESS AND TRADES" | 877 - 882 |
| 171 | Dr Sangeeta V. Ghuikhedkar | COVID-19 - THE PANDEMIC HITTING LIVES | 883 - 887 |
| 172 | Dr. Hemant Sudhakar Dalal | WORLD SCENARIO: AFTER COVID-19 | 888 - 893 |
| 173 | प्रा. पी. डी. डोंगरवार | पर्यावरणाचा शेतीवर होणारा परिणाम | 894 - 897 |
| 174 | डॉ. ललित नाफडे | ग्रामीण कच-याचे व्यवस्थापन – एक शंशोधनात्मक अभ्यास | 898 - 905 |
| 175 | डॉ. मंजुषा समर्थ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर युगप्रवर्तक पत्रकार | 906 - 911 |
| 176 | Dr. Komal Rohit Nabira | ROLE OF UNORGANISED SECTOR IN INDIAN ECONOMY | 912 - 920 |
| 177 | Dr. Mrs Mithila B Wakhare | IMPACT OF LOCK DOWN ON RETAILERS | 921 - 924 |
| 178 | प्रा. राहूल एस. खंडारे | पर्यावरण शेती | 925 - 927 |
| 179 | R. S. Palaspagar | SYNTHESIS AND SPECTRAL CHARACTERISTICS OF CE3+ACTIVATEDALUMINO-BORATE LI2ALBO4 | 928 - 933 |
| 180 | डॉ.भगवान जालमसिंग साबळे | कोरोनोत्तर सद्दस्थितीचे लोकजीवनातील बदलते संदर्भ : एक दृष्टक्षेप | 934 - 939 |

# कोरोनोत्तर सद्यस्थितीचे लोकजीवनातील बदलते संदर्भ : एक दृष्टिक्षेप

डॉ. भगवान जालमसिंग साबळे
मराठी विभाग प्रमुख,
भारतीय महाविद्यालय,
मोर्शी, जि. अमरावती
Email : bhagwan.j.sable@gmail.com

---

प्रास्ताविक :–

जगात सद्यस्थितीत कोरोना–19 विषाणूच्या प्रादूर्भावाने थैमान घातले आहे. कोरोनाचा हा कहर मानवी जीवनावर अधिराज्य गाजवित आहे. 'कोरोनामय वावाटळी' ने आज जगातील विकसित देशही हतबल होताना दिसत आहे. अशा या कोरोनामय काळात मानवी जनजीवन अक्षरशः ढवळून निघाले. 'कोरोना–19' या विषाणूचा उगम, प्रादूर्भाव, लक्षणे व त्यावरील उपाययोजना यासंदर्भात प्रसारमाध्यमांसह सर्वत्र चर्चा होत असून लोकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. आज जगासमोर एक यक्ष प्रश्न निर्माण झाला तो ' कोरोना–19' या विषाणूवर कशी मात करायचीध कोरोनाच्या प्रादुर्भावाला कसे राखायचेध याच कोरोनोत्तर सद्यस्थितीतील मानवी जनजीवन, भावजीवनाची होणारी घुसमट तसेच सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे बदलते संदर्भ, शैक्षणिक क्षेत्रातील आवाहन, आर्थिक क्षेत्रात निर्माण होऊ पाहणारे जागतिक मंदिचे सावट व कोरोना एक आवाहन की, संधी अशा एक नव्हे, तर अनेक घटकांवर तज्ज्ञांकडून, विचारवंत व संशोधक अभ्यासकांकडून मत–मतांतरे, भाकिते व उपायांबाबत चर्चा घडून येत आहे. याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयीन स्तरावर ई–परिषद (वेबिनार) चे आयोजन करुन तज्ज्ञ प्राध्यापकांकडून व विचारवंतांकडून वैचारिक चर्चा घडत आहे. कोरोनोत्तर सद्यास्थिती व भविष्याची भाकितेही वर्तविल्या जात आहे. कोरोनोत्तर सद्यस्थितीचा नेमक्या हयाच प्रश्नाची उकल करण्याच्या हेतूनेच 'कोरोनोत्तर सद्यस्थितीचे लोकजीवनातील बदलते संदर्भः एक दृष्टिक्षेप' या विषयावरील शोधनिबंधाचे लेखन करण्याचा मानस आहे.

'कोरोना–19' विषाणूचा प्रादुर्भाव : एक नवा पेच

चीन देशाच्या वूहान शहरातून उदयाला आलेल्या 'कोरोना–19' विषाणूचा प्रादुर्भाव आज जगभर पसरलाय. अन ध्यानीमनी नसणाऱ्या या महामारीच्या आजाराने जगासमोर एक नवा पेच निर्माण केलाय. सद्यस्थितीस विज्ञानालाही या विषाणूवर प्रतिबंधीत लस शोधता आलेली नाही. त्यामुळे विकसनशिल देशही हतबल होताना दिसत आहे. भारतातील पुणे येथिल 'सीरम इन्स्टिटयुट ऑफ इंडिया' ने ऑक्सफोर्ड विश्वविद्यालयासमवेत कोरोनावर प्रतिबंधित लस बनविण्याच्या कार्यास प्रारंभ केलेला आहे. शिवाय आयुर्वेदिक औषधांचा पर्यायही शोधला जातोय. परंतु या कार्यास पूर्तता लाभण्यास बराच अवकाश आहे. गुणाकार पध्दतीने वाढत्या प्रादुर्भावास रोखणे एक आवाहन आज जगासमोर निर्माण झाले आहे. कित्येकांनी तर याला 'वैश्विक महामारी' असे संबोधले आहे. साहजिकच ' कोरोना–19' या विषाणूने अनेक प्रश्न

निर्माण केले. यात महत्त्वाचा यक्ष प्रश्न हा की, 'सर्वसामान्य मानवाची जगण्यासाठीची केविलवाणी धडपड होय.' लोकजीवन एकप्रकारे विस्कळीत झाले असून मजुरांचे स्थलांतर, उपासमार, जगण्याच्या संदर्भातील निर्माण झालेली अस्थिरता यामुळे निर्माण झालेला नवा पेच. याच कारोनामय सद्यस्थितीसंदर्भात दि. 27 मे 2020 रोजी मराठी विभाग, अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे आयोजित 'राष्ट्रीय वेबिनार' प्रसंगी विचार व्यक्त करताना डॉ. पृथ्वीराज तौर (मराठी विभाग, स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड) असे म्हणाले की, 'मी उभा आहे महाभयंकराच्या दारात. काय आहे हा भयानक वारा, ज्याने समष्ट मानव जीवनालाच हादरुन टाकले माणसं परिस्थितीने गांगरुन गेलीत. एकूणच हा संकटाचा काळ. अशा काळात माणसं आपल्या माणसाचा आश्रय शोधत असतो.' म्हणूनच शहरात कामाच्या शोधात गेलेले मजुरांचे जत्थेच्या जत्थेच खेडयाकडे स्थलांतर होत आहे. यातच शासनास विलगीकरणाची करावी लागणारी व्यवस्था, प्रशासनाचा वाढलेला ताण, लघुउद्योगांचे अचानक कोलमडणे, तळहातावर पोट असणाऱ्यांचा भूकेचा प्रश्न असे सामान्य वाटणारे प्रश्न परंतु यामुळे गंभीर समस्या उद्‌भवल्याने शासनही कोंडीत सापडले. तसेच मोठ–मोठे उद्योगधंदे, कंपन्याना ताळेबंदीची सोसावी लागणारी झळ, आयात–निर्यात बंदी, ठप्प झालेली वाहतूक व्यवस्था, शासनास प्राप्त होणारा महसूल व वेगवेगळया वस्तुंवरील प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे मिळणारा कर, सेवा शुल्क याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला. अन आज जागतिक मंदिचे सावट निर्माण झाले. असा हा संकटमय पेच देशालाच नव्हे तर जगालाही भेडसावतोय.

मानवी जीवनाचा विस्कटलेपणा–

